
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५८९
१६६५

REFBK-0014374

# मयूर विलास



वसंत गो. देशमुख

स्वस्त पुस्तक योजना : ६

३८७००
निबंध
१०/७/६५
सं.शा.
१५८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१८३५६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८७०० वि: निबंध
सं.शा. १५८
१०/७/६५

# मयूरविलास

वसंत गोविंद देशमुख

REFBK-0014374

मूल्य

जय हिंद प्रकाशन
झावबावाडी : मुंबई २

प्रथमावृत्ति :
१ मे १९६५

•

मुद्रक :
व्ही. बी. खळे
जयगुजरात प्रिंटिंग प्रेस
गांवदेवी, मुंबई ७

•

प्रकाशक :
ग. का. रायकर
जय हिंद प्रकाशन
झावबावाडी : मुंबई २

अकालीं कालवश झालेल्या

**माझ्या ताईस—**

( सौ. सरला मोरेश्वर जयवंत )

**थोडेंसेंच!**

कांहीं प्रकाशित आणि अप्रकाशित लेखांचा हा संग्रह आहे.

१ मे १९६५ —वसंत गोविंद देशमुख

## मयूरविलास


- बायको–पत्नी–भार्या
- आठव्या वर्षांत
- दिवाळीची साडी
- संस्कृति आणि डोकेदुखी
- चंदेरी किनार–विक्षिप्तपणा
- हा माझा महाराष्ट्र
- कुबेराच्या मर्यादा
- एक नवें संकट
- शब्दरंजन
- तिला चुकवा नि जीव वांचवा
- कलावंतांची उपेक्षा
- सासऱ्यांना वेसण
- भाळीं चंद्र असे धरिला
- आमच्या स्मशानयात्रा
- गहिंवराचे दहिंवर
- ना. गव्हर्नरसाहेबांसमवेत न्याहारी
- उंबरठ्यावर
- भाईसाहेब
- आम्हांला झालं आहे तरी काय !
- दीपकंदिलांचा दीपोत्सव
- आम्ही तरुण माणसं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८३७८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७००
क्रमांक ९५८८

# १ बायको, पत्नी, भार्या !

" अण्णा ! ही माझी बायको ! "
" आबा ! हें आमचें कुटुंब ! '
" भाई ! ही माझी पत्नी ! "
" शास्त्रीबुवा ! ही माझी भार्या ! "
" पाटीलबुवा ! ही माझी घरवाली ! "
" माई ! [ लांबची कळलावी नातेवाईक ! ] ही माझी ही ! "

प्रभु रामचंद्राप्रमाणं एकपत्नीव्रत पाळणारा मी, संसाराचं गांडीव धनुष्य लीलया उचलणारा मी, माझ्या गृहिणीसंबंधीं, माझ्या भार्येसंबंधीं, माझ्या पत्नीसंबंधीं, माझ्या बायकोसंबंधीं, थोडक्यांत म्हणजे माझ्या हिच्यासंबंधीं उल्लेख करतांना जी परिभाषा वापरतों ती वेळोवेळीं अशी वेगळी कां असते याचा जेव्हां मी विचार करूं लागतों तेव्हां सागराकडे पाहून स्तिमित झालेली चिपळूणकरी मुद्रा माझ्या चेहऱ्यावर झळकते.

## " अप्पा ! ही माझी बायको ! "

" अप्पा ! ही माझी बायको ! " हा परिचय तसा आहे बालबोध ! ह्यांतले अप्पा वयानं जरी माझ्यापेक्षां बरेच वडील असले तरी मनमिळाऊ आहेत. थोडे विनोदीहि असावेत. म्हातारपणांत प्रकर्षानं उद्‌भवणारा खाष्ट-

पणा त्यांनीं पचविला आहे. अन् म्हणूनच कीं काय, त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या मिस्कीलपणें हंसतात. हातांत अडकित्ता! सुपारी कशी बारिक कातरतात. जणु पांढरा कांदाच चुरचुरु चिरतायत! त्यांतली मला थोडीशी देण्यांत, आपल्या वडिलकीच्या नात्यांत व्यत्यय येणार नाहीं, इतका खिळाडूपणा त्यांच्या अंगांत आहे.

अन् म्हणूनच जरा धाष्टर्यानंच मी म्हणतो–अप्पा! ही माझी बायको...! अप्पा हे हंसरे वृद्ध आहेत. किंवा वृद्ध असून हंसरे आहेत. इथं बायको शब्द वापरण्यांत आपुलकी आहे. घरगुतीपणा आहे अन् जवळीक आहे. अंतर निर्माण झालं—मानसिक अंतर–कीं शब्द कृत्रिम होतात...

**" आबा! हें माझं कुटुंब!"**

जसं ... 'आबा! हें माझं कुटुंब!' ह्यांतले आबा कोंकणांतले! खळ्यावर झोंपून त्यांचा जन्म गेला! तूसावर अंग झोकलं नाहीं तर त्यांच्या अंगाला कंद सुटेल! कोंकणांतल्या लाल मातीनं त्यांचा पंचाच काय, पण चेहेरासुद्धां तांबूस केला आहे. सर्प, फुरशी, विंचू यांना दुरून सहजतेनं हेरणारी त्यांची नजर वार्धक्यांतसुद्धां वाजवीपेक्षां चपखळ आहे. साठपासष्ट वर्षांनीं चेहऱ्यावर टांकी मारली आहे खरी, पण त्या टांकींतूनसुद्धां भिरभिरणारे तीक्ष्ण नेत्रद्वय ऐन तिशींतली नजरझेप दर्शवींत आहेत.

पण मनांत अंतर आहे. आबांच्या पोफळीच्या वाडींत पाणी झिरपत जातं ... तसे माझे शब्द जपून, हळूच झिरपत जातात. कारण इथं नातं आहे, पण ओलावा नाहीं – प्रेमाचा ओलावा नाहीं! म्हणून मी भारदस्त होतों. भारदस्त शब्द आबांच्या मुखावर झोंकून देतों ... आबा! हें माझं कुटुंब!

कुटुंब! कुटुंब हा कुटुंबदर्शक शब्द भार्यावाचक कां झाला? कुटुंबाच्या निर्मितीची ही खाण म्हणून तर नव्हे ना?

कुटुंबसंस्था म्हणजेच पत्नी – पत्नीच नाहीं तर कुटुंब कसलं? असं तर ध्वनित करायचं नाहीं ना? पण कुटुंब या शब्दांतच भारदस्तपणा सामावलेला आहे. कुटुंब या शब्दांत पोक्तपणा भरून राहिला आहे. शिवाय ठांसून ठांसून भरला आहे तो लेकुरवाळेपणा!

हें आमचं कुटुंब! म्हणजे त्यांत बंड्या पुढं, बेबी मागं, धाकटी हाताला धरून, अंगावरचं कमरेवर अन् शिवाय एक अंतर्यामीं असं एक भयानक चित्र मला दिसतं. इथं खस्ता खुपीनं खाल्ल्या जातात. जाच

बिनतक्रार सोसला जातो. बाळंतपणाकरितां नेणारी टॅक्सी भयानक नियमितपणें येते. इथं तर खोबरेल तेलाचा वास ! भालप्रदेशावर रेंगाळणारा कुंकवाचा रेळा ... इरकली घसघशीत लुगडं ... बिच्चारं निरंजन, गरीब, महाराष्ट्रीय सौभाग्य !

**" भाई ! ही माझी पत्नी ! "**

पण " भाई ही माझी पत्नी " इथवर आलों, कीं आलों उत्साहाच्या सृष्टींत ! भाई ! जुना मित्र ! शाळेंतला .... कॉलेजांतला .... व्यवसायांतला ! पण भाई म्हणजे आनंदी प्राणी ! मराठी भाषेचे – सुसंस्कृत मराठी भाषेचे संस्कार माझ्यावरहि झाले आहेत हें पटवून देण्याकरितांच कीं काय मी म्हणतों, " भाई ! ही माझी पत्नी. " इथं बायको हा शब्द वापरला तर भाई मला गांवढळ म्हणेल. कुटुंब हा शब्द त्यानं ऐकला तर कुटुंबघातच होईल. तस्मात् माझं व भाईचं वय लक्षांत घेतां पत्नी हा शब्दच योग्य !

पत्नी शब्दाच्या वापरांत विश्वविद्यालयीन शिक्षण वा त्याची झुळुक अभिप्रेत आहे. दुय्यम मध्यम वर्गातला सुशिक्षित शिष्टपणा त्यांत अवगुंठित आहे. जी पत्नी आहे तिच्या हातांत पाळण्याची दोरी नसेल, पण पर्स् आहे. हातांत भाजीची पिशवी असेल, पण तिला ' स्त्री ' मासिकाच्या नव्या अंकाची उत्कंठा अन् हुरहुर ! घरचा स्वयंपाक नीट जमत नसेल, पण करंज्याच्या प्रात्यक्षिकाला भगिनी समाजांत ती हजर ! बँकॉकुया कृत्रिम चमचमत्या खड्यांत तिच्या कर्णद्वयांची शान सामावलेली ! अल्पसंतुष्ट अन् म्हणून खळखळून हंसणारी !

**" शास्त्रीबुवा ! ही माझी भार्या ! "**

आपल्यापेक्षां संस्कृतचा गाढ अभ्यास केलेले कोणीतरी आपल्या बहुतेकांच्या परिचयाचे असतात. ते येतात देशावरून ! वाईच्या परिसरांतून ! पसरणीच्या घाटावरून दगड गडगडत यावे तसे त्यांचे स्पष्ट शब्दोच्चार गडगडत, धडधडत येतात. बायका त्यांच्यापुढं यायला थरथर कांपतात. ह्या लोकांच्या एकूण दबदब्याकडं पाहिलं म्हणजे वाटतं, कीं बाई म्हणजे थरकांप कांपणारा प्राणी !

शास्त्रीबुवांचें स्नान, नैमित्तिकं वगैरे फार लौकर उरकतात. माझ्या बायकोनं–चुकलों ! भार्येनं चहा समोर ठेवलेला असतो. त्याकडं शास्त्रीबुवा अगदीं तुच्छतेनं पहातात. शंकरानं मदनाला जाळलं, तसा तो चहा,

कच्चबशीसह भस्मसात् होईल कीं काय ह्याची मला क्षणभर भीति वाटते !
" मी चहा घेत नाहीं ! " पसरणीचे गडगडणारे दगड !

" अग दूध आण ! दूध आण ! शास्त्रीबुवा कधीं चहा घेतात काय ? " दरडवायचा प्रयत्न करीत मी. ज्याची अमृततुल्य चहा म्हणून स्टेशना-स्टेशनांवर महति गायली जाते तो चहा जणु काय सॉक्रेटिसनं प्राशन केला तस्साच विषाचा प्याला आहे असं समजून आंत झटकन् नेला जातो.

" दूध आणते हं ! " सौ. चा नेहमींपेक्षां कोमल आवाज !

" जरा केशर टाक ! " मी.

" हो ! " होकारांत सूक्ष्म नापसंती !

आंत जातां जातां " काय थेर चालविले आहेत त्याचे " असा नेत्रां पल्लवीनं तांतडीचा संदेश. त्यांवर माझं दुर्लक्ष !

यथाकाल केशरमिश्रित दूध सामोरं येतं. शास्त्रीबुवा तें दुर्लक्षितात. आत-चार शब्द बोलायला योग्य वेळ म्हणून मग मी म्हणतों ...

" शास्त्रीबुवा ! ही माझी भार्या ! "

भार्या लवून नमस्कार करते. शास्त्रीबुवा आशीर्वाद दिल्याचा अभिनय करतात. भार्या ! काय शब्द आहे ! भार्या ! अरे लेका ! आमच्यासारख्याची काय कुठं भार्या असते काय ? आम्हीं काय इक्ष्वाकु वंशांतले कुणी लागून राहिलोय काय ?

काय तर म्हणे भार्या !

कां कुणास ठाऊक ? कुणीं भार्या हा शब्द उच्चारला रे उच्चारला, कीं मला आपली वनवासांतली सीताच दिसते ! ती वल्कलं, ते चरणारविंद ...तो कांचनमृग...ती लक्ष्मणरेषा...म्हणजे ज्याला भार्या हवी असेल त्याच्या मालकीचा प्रासाद तरी हवा, नाहीं तर वनवासांत जायची तरी त्याची सपत्नीक तयारी हवी ! एखादा रानडे किंवा गुप्ते किंवा नाडकर्णी सपत्नीक फार फार तर कान्हेरी उपवनांत रविवारीं जाऊन संध्याकाळीं परतेल ! ही रामायणाची व भार्या या पवित्र शब्दाची शुद्ध प्रतारणा आहे असं मला वाटतं ! कान्हेरी उपवनांत वनभोजन करण्यास गेल्या त्या रुहेल्या – छेल-छबेल्या, भार्या नव्हेत च !

## " पाटीलबुवा ! ही माझी घरवाली "

सुटी घेऊन सहकुटुंब एखाद्या उदार नातेवाईकांकडं रजा घेतल्यावर मुक्काम ठोकला आहे. पौडचं पाव्हणं — सातारचे गिरेबाज पाटील किंवा कोल्हापूरचे टरेबाज पाटील ज्या परिसरांत अनिभिषिक्त सत्ता गाजवितात, पण जी सत्ता जाचक नसून अंतिम हितकारी ठरते, ज्या मराठमोळ्या मर्दानी आवाजामुळं बिबळे वाघ टरकतात, पण ज्याच्यांत गांवठी गोडवा कांकवीसारखा कांठोकांठ भरला आहे, अशा ठिकाणीं कांहीं दिवस मजेंत जात असतांना, मुंबईत शिकलेल्या लबाडीनं मी कुणा अनोळखी पाटलाच्या गुऱ्हाळावर उसाचा ताजा रस फुकटांत घ्यायचा प्रयत्न करतों व सहकुटुंब मळ्यांत घुसतों.

पांढरपेशी माणसं आपल्याकडंच येताहेत कीं दुसरीकडे जाताहेत ह्याचा क्षणभर संभ्रम ! त्याचवेळीं माझा शहरी हल्ला !

" पाटीलबुवा ! रस मिळेल का ? "

" हात्तुच्या ! आंघोळ घालीन् रसानं. हाँ हाँ ! रऽऽऽ म्हाद्या ! शिरप्याऽऽऽ कासांडी आन... "

शिरप्या, म्हाद्या धांवले ....

" पाटीलबुवा ! ही माझी घरवाली...कारभारीण ! " पाटीलबुवांची मंडळी मग बाहेर येतात. घरवाली–कारभारीण–शब्द पाटलांच्या कानांत घुसतात–हृदयांत घर करतात. मग मी देवमाणूस होतों. " इत्का शिक्लेला मानूस... छ्या ! गर्व न्हाई ! " माझ्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव ! कां तर त्यांच्यांत बसून त्यांचाच रस मी फुकटांत प्यालों म्हणून ! रस आकंठ घेतला आहे-वा ! तिकडं तर गप्पांना रंग भरलाय् ! ही अन् पाटलीणबाई, एकमेकींना चापट्या मारीत, हंसत खिदळत आहेत. दोन घरवाल्या-दोन कारभारणी !

खरंच ! घरवाली ! कारभारीण ! काय तरंग माझ्या मनांत उठतात ? ... न्याहारी–भाकर–कांदा – शेत – रणरणतं ऊन – मोट–बैलांची जोडी – पवळ्या ढवळ्या–झूल–रंगीत खुरपं ... लावणी–पीक–मळा ... कापणी ...भात ... जोंधळा ...

कसा पिकला गहू ऽ ऽ हरभरा !

शेतकीप्रधान देशांतच पुष्ट झालेला माझा देह, सदेह अवस्थेंतच मातीला व मातींतल्या संगीताला एक गूढ साथ देतो ...

**मीट् माय मिसेस् —**

या उलट मिसेस्–हा प्रकार! सौभाग्यवति हा शब्द बदलून मिसेस् हा शब्द वापरण्याकरतां आपण फारच मोठं मोल दिलं आहे. जेव्हां आपण आपलं स्वातंत्र्यच गमावलं, तेव्हां हा शब्द आपण उचलला!

घरवाली किंवा कारभारीण हा अस्सल मराठमोळा अन् महाराष्ट्रीय शब्द! ह्या शब्दाची दुसरी व उलट बाजू म्हणजे मिसेस्! या शब्दानंसुद्धां कांहीं वेगळे तरंग माझ्या अंतर्मनांत उमटतात.

मिसेस्च्या यजमानांची आर्थिक पातळी, पत्नीवाल्यापेक्षां बरीचशी उंच असण्याचा फारच मोठा संभव असतो. मिसेस्मध्यें सुद्धां "परी" आहेत.

अगदीं वरच्या श्रेणींतल्या मिसेस् वेगळ्या! त्यांचं विश्व वेगळं! त्यांच्या काळज्या विक्षिप्त! यंदा मोटर्चं मॉडेलच नवीन मिळालं नाहीं...काय बाई ह्या सरकारची पॉलिसी? मिसेस् डिकिन्सन् ऑस्ट्रेलियाला परत जात आहेत. अग त्यांच्या पपीज् इतक्या इतक्या लव्हली ऽ ऽ आहेत! मी ठेवली असती ग...पण आतांच आमच्या घरीं तीन तीन आहेत–आहे कुठं जागा? वगैरे!

दुसऱ्या श्रेणींतल्या मिसेस् गाडी ठेवतात–म्हणजे त्यांचे मिस्टर गाडी ठेवतात पण पेट्रोलचा हिशेब ठेवून! गाडीला आंचका बसला कीं ह्यांनाहि अक्षरशः आंचका लागतो. टायर् बदलतांना ह्यांना जाणवतो!

अन् तिसऱ्या तऱ्हेच्या मिसेस् खरोखरीच फॅशनेबल् "बायका" च असतात. जीवन हौसेनं मजेंत घालवायची ह्यांची फार महत्त्वाकांक्षा असते. शिक्षण अन् वाचन यामुळं महत्त्वाकांक्षा वाढलेली असते. भावनांचा हळुवारपणा तासलेला असतो. एखादं भावगीत, सुरेख वीणकाम यांत हातखंडा असतो. पण दैव आड येतं!

पण ह्या तिन्ही प्रकारांत पाश्चिमात्यांचं अंधानुकरण करण्याची प्रवृत्ति असते.

शकुंतलेला इथं शॅकी अशी हांक मारली जाते. इंदिरेची "इडा" होते. खरवसाची गोडी इथं कसली? इथं क्रॅफ्ट चीज! मोक्षप्राप्तीकरतां "शॉर्ट कट" म्हणून दिमतीला बिच्चारे साईबाबा! फ्रीजमध्यें सत्त्वयुक्त अन्न भरपूर, पण मुलांना टॉन्सिल्स किंवा बेरीबेरी!

आंखूड कांपलेल्या केंसांखालीं बहुतेक जाडशी, गेंड्यासारखी अरुंद मान! [मानेवर क्वचित एखादा काळसर डाग!] भडक लिपस्टिक्! त्या रंगाशीं

भांडण करणारा जादा कृष्ण गहूं वर्ण! असहकार पुकारणारे केंस, अति पौष्टिक खाल्ल्यामुळं जडावलेले डोळे! खूप खोल कापलेले ब्लाऊज्!

छे! छे! छे! तें येरागबाळाचें काम नोहे! भार्या अन् मिसेस या साधारणपणें न पेलवणाऱ्याच गोष्टी आहेत. फरक इतकाच, कीं तशीच वेळ पडली तर भार्या आर्याबरोबर वनवास पत्करेल, पण मिसेस्च्या एखाद्या भयंकर कांचनमृगी हट्टामुळं, तिचा मिस्टर, एकटाच वनवास पत्करेल!

**" माई! ही माझी ही! "**

बावीस वर्षांनीं माई आली. आतांशा माईला नीटसं दिसत नाहीं. तेव्हां मी म्हटलं, " माई! ही माझी ही! "

आयुष्यांतलीं सत्तर वर्षें गेलीं. माईनीं सत्तर वाक्यंसुद्धां सरळ बोललीं नसतील. प्रत्येक ठिकाणीं माईचा एक तिरकस बाण असायचाच! माझ्या भावाच्या सुंदर मुलाकडं पाहून ती म्हणाली, " हत्! बायल्या मेला! बायकीश दिसतो! "

एका धटिंगण पोराला पाहून म्हणाली..." कुणाचं हे कारटं ? पोरटं आहे कीं जांबुवंत ? " सारांश इतक्या वर्षानं ही महामाया जेव्हां आमच्याकडं आली, तेव्हां मी ह्या चिखलफेकीची अपेक्षा करीतच होतों.

" माई! ही माझी ही! "

माईनीं डोळयांच्या म्हाताऱ्या फटी बारीक केल्या! दोन काजवे चमकल्यासारखे वाटले. " हां! ठीक आहे....वाईट नाहीं...पण काय रे ? ही माझी ही काय ? हल्लीची पोरंपोरी नांवानं हांका मारतात..." म्हातारीनं खोड काढलीच!

" ही! " अन् " हे! " हा जरा मुग्ध प्रणय आहे! जानव्यांत सरी अडकण्याचा प्रणय तो! तिथं धांगडधिंग्याच्या आधुनिक भडक प्रणयाला जागा नाहीं! भोजनोत्तर माडीवर तांब्या, फुलपात्र मंद पावलानं आणून ठेवणारी आज्ञाधारक गृहिणी त्या " ही " त आहे. स्वयंपाकघर, माजघर, अंगण, तुळसीवृन्दावन, दिवाणखाना, कोनाडे, भातानं भरलेले कणगे, सोन्यानं मढलेलीं मनगटें...जरीचीं नऊवारी लुगडीं...नथी अन् मासोळ्या, बिंदल्या अन् टिकल्या...खोपे व सोपे—कर्ण्याचा फोनोग्राफ (" मधुकर वनवन फिरत करी गुन्जारवालाऽ " हें गाणं बळवंतराव गुणगुणायला लागले,

कीं राधाबाईनीं खालीं समजायचं कीं आतां वर लौकर जायला हवेंच !) हें हें सर्व त्या " ही " त होतं !

हिची कंबर पहिल्याच बाळंतपणांत "जात" नव्हती. इवलीशीं पावलं घरांत दुडदुडायला लागल्यावर हिच्या मस्तकाचं श्रीफळ होत नव्हतं. लोन् अन् ऑर्गंडी, श्रिंकल् नायलॉन् अन् शिफॉं तिला पूर्ण अपरिचित होते, तरी इचलकरंजीकडची चंदेरी साडी जो देह शालीनतेनं अवगुंठित करायची, त्या देहीं एक विशिष्ट टिकाऊ सौंदर्य सळसळत असे.

स्वयंपाकघरांतल्या चकचकत्या पितळी डब्यांत गुळपापडीच्या वड्या आत्माहुतीची वाट पहात पडलेल्या असायच्या – कॅड्बरीची चाकलेट्स् नव्हतीं ! खमंग काकडीची जागा क्वालिटी आईस्क्रीमनं घेतली नव्हती. पुरणपोळ्या गोल व तांबूस होत–पंजाबी हॉटेलांत मिळतो, तसा परोठा घरांत घुसला नव्हता !

सणवार हंसतमुखानं साजरे होत. " आली दिवाळी ... कटकट मेली ... करकर करायचं अन् फेंकून द्यायचं–ताटं भरून पाठवायचीं – कोण खात नाहीं तें ... " असली बाजारी, भावनाशून्य भाषा तेव्हां अस्तित्वांतच नव्हती !

आजच्या आर्थिक ओढाताणीमुळं कुरबुर चालू असते असं कुणी म्हणेल, तर मी एवढंच सांगतो, कीं संपन्न घरांतूनच अशी मनोवृत्ति आजकाल जास्त दिसते. " ही " वृत्ति लुप्त होत चालली आहे. हिच्या कक्षा आधुनिक जगांत वाढल्या आहेत. गोलाकार पोळी करणारी "ही", चंद्रावर झेंपावण्या-करतां आसुसली आहे. एक नवी " ही " निर्माण होत आहे व तें अपरिहार्य आहे, जरुरीचं आहे, समाजाला आवश्यक आहे. माझ्यासारख्या एखाद्या स्वप्नाळु माणसाला किंचित् खेद होतो तो इतकाच, कीं तिच्याबरोबरच एक संपन्न, घवघवीत, सुखवस्तु, अल्पसंतोषी, निरोगी, सहिष्णु, कामसू, सांसारिक सांप्रदायच कायमचा लुप्त होत चालला...एक निरंजन गोडवा हरपत चालला ... संसारज्योति मंदावत चालली ... कुटुंबसंस्था व निरलस प्रेम आटत चाललं...जीवनयात्रेचा मूळ आधार स्त्री...तिचा कायाकल्प ... शांतादेवी आतां चामुंडेचं, चंडिकेच, कालिकेचं स्वरूप घेत आहे...

लेख लिहून मानसिक थकवा आला ! घशाला कोरड पडली आहे...

" अग एऽऽऽऽ ! चहा टाक ! "

***

## २ ८ व्या वर्षांत

आठ या आंकड्यांत मला थाट दिसत नाहीं! आठ मुळांतच आंतल्या गांठीचा असं मला वाटतं! त्याचं बाह्य स्वरूपच फसवं आहे, निसरडं आहे.

एक कसा असतो? आंत बाहेर कांहीं नाहीं! देहयष्टी मानव देहासारखी असल्यामुळं शिरोभागीं गोलाकार मस्तकहि विराजतं! पृथ्वी एक, आकाश एक, एक पत्नीव्रत...ह्या एकांत ब्रह्म सांठलं आहे अन् आठांतून हें सर्व बाहेर ओसंडतं, निसटतं!

**दोन ते सात**

दोन तर फणा उभारलेल्या भुजंगासारखा! माथ्यावर पृथ्वीच ठेवायची काय ती खोटी! बाकी शेषच! अखिल विश्व, दोननें व्यापून टाकलंय, सांधून ठेवलंय, प्रेमरज्जूनं बांधून ठेवलंय! पृथ्वी–सागर, पति–पत्नी, क्रिया–प्रक्रिया, प्रकृति–पुरुष, आत्मा–देह ह्या दोनाच्या द्वंद्वसमासामुळंच जीवनाचे तीन तेरा वाजत नाहींत!

कापलेल्या भीकबाळ्या एकावर एक ठेवल्या तर तीन होतील. सत्त्व, रजस् अन् तमस् या तीन शिलेदारांमुळं तीनचं महात्म्य फार! मी त्रिवार सांगितलं, असं एखादा बजावून सांगतो. संसारवेलीवर तिसरं पुष्प फुलतं तेव्हां तर काय, ह्या तिसऱ्याचं कौतुक अमाप!

पण आपण चारावर आलों, कीं चौकोनी दुनियेंत आल्याचा मला भास होतो. दिशा चारच असल्या, तरी विश्वाची पोकळी कांहीं चौकोनी नाहीं, याचं मला कधींकधी भान रहात नाहीं. तसं पाहिलं, तर चार ह्या आकड्याला स्वतःविषयीं तरी कुठं भान असतं ? कजाग सासरीं, काम मरमरेपर्यंत करून, थकून माहेरीं आलेली एखादी नवोढा ज्याप्रमाणं अस्ताव्यस्त पाय पसरून लोळपटत असते, तद्वतच हा चार (४) आरामांत पहुडल्यासारखा मला वाटतो. चारामध्यें विहंग फडफडतो. वैनतेयाची झेंप त्याच्यांत सामावल्यासारखी मला वाटते. सर्व आंकड्यांत अखंड शीर्षासन करणारा आंकडा हा एकच – ४ !

पंचप्राण ! पंचनद्या ! पंचामृत ! पंचमहाभूतं ! पंचगव्य...आली का पंचाईत ? अन् साऱ्या वाङ्मयाची जननी–पंचबोटं ! हो ! प्रतिभा डोक्यांत थैमान घालीत असली अन् पांच बोटंच जाग्यावर नसलीं तर ? पांचाचं महत्त्व पांचवीला पूजलेलं आहे. ६–सहा छकडेबाज आहेत ! अर्जुन भूमीवर बसून आकर्ण बाण ओढीत आहे असा भास मला सहाकडं पाहिल्यावर होतो. कीं कुणी महायोगी दंडकारण्यांत धनुरासन करतो आहे ? कुणीहि असो, पण सहा मोठा स्वरूपसुंदर आहे. जणुं मदनबाण छपून खेंचणारा अनंग ! त्याच्या झुकलेल्या शिरावर खुद्द डौल सालंकृत झाला आहे ! कसलेला व सौंदर्यवान् नर्तक (शास्त्रीय नृत्य करणारा–रोंबासोंबा नव्हे !) एखादा पल्लेदार अंग-विक्षेप करतो, तसा हा सहा !

सात अर्धगोलाकार असल्यामुळं उदार उदराचा ! सप्तसमुद्र ! सप्तपदी ! सप्तर्षी ! सप्तरंगी इंद्रधनुष्य ! सप्तस्वर्ग ! मोठमोठी मंडळी नातेवाईक ! सूर्याच्या महाप्रखर भट्टीवर ह्या साताची [ ७ ] कढई आपली लावून ठेवलेली ! आंकडेविश्वांतील जणुं द्रौपदीची थाळी ! कांहींही टाका ! स्वाहा !

**नऊ आणि दहा**

आजचा नायक आठ असल्यामुळं एकदम नवाकडं जाऊं ! नवग्रह ! रामनवमी ! नवखंड ! नवरात्र ! नवलाख दिव्यरमणी ! नाकीं नऊ येतात ! स्वारी आळशी, विलासी, गादीप्रधान ! सारखी आडवी होण्यास लालचावलेली ! नवाकडं पाहिलं कीं मला आपली शेषावर पहुडलेल्या भगवान् विष्णूची आठवण येते ! मोठा राजबिंडा प्राणी ! त्या नवांतल्या शून्यांत मला भगवान् विष्णुचा किरीट झगमगतांना दिसतो. पुढच्या दहाचा आंकडा पचवून ह्यांनीं शेषाच्या फणेवरच लावून दिला ! पुढच्याची उगाच हुश्शारी नको !

दहा ! दहाचं मी काय सांगावं ? दशग्रंथी ब्राह्मण, दशमुख ( देशमुख नव्हे ! ) रावण ! दशमान पद्धत, दशावतार, किती तरी...सर्वांची जिरवायला गोलाकार सेवक ! तो बिचारा ह्यांच्या सान्निध्याशिवाय निष्प्रभ, निस्तेज...चंद्रासारखा ! एकांतलं मानव्य अन् शून्यातलं ब्रह्म ह्यांचा मुलायम संगम म्हणजे दहा !

## आठची महती

पण आठ ? ...पाढे पाठ करतांना होणारे कष्ट या आठांत आहेत. विलीन झालेल्या संस्थानांतल्या भाटांची लाचारी ह्याच्या वक्रदेहीं दिसते आहे ! भाटांतली क्षणभंगुरता यांत आहे ! तरी तसं पाहिलं तर त्याची संगत कांहीं लहान सहान नाहीं बरं का ? अष्टग्रही, अष्टप्रधान, अष्टांग, खुद्द भगवान् कृष्णच आठवे ! आठवे ना ? कीं नाहीं ! पण...पण आठ हा बिचारा शापित मुनी आहे !

महत्त्वाकांक्षी, पराक्रमी, दीर्घोद्योगी अशा पुरुषांची सर्व लक्षणं आठाठायीं आहेत. बैठक मारलेली आहे. धरतीमातेशिवाय कुणाचा आधार नाहीं. प्रचंड प्रयासानं वर येण्याची धडपड ! मध्येंच फार श्रमामुळं कंबरडंच मोडलेलं ! तशा घायाळ अवस्थेंतहि सूर्यबिंबावर झेंप ! आंकड्यांतला हिटलरच तो !

मुंबईतल्या बँकेतल्या साठ रुपये पगाराच्या कारकुनाचा तीस वर्षांत तीन हजारांचा मॅनेजर व्हावा ! मुंबापुरीच्या फुटपाथवर हलकं कापड विकणारा, कालांतरानं कोट्याधिश गिरणीमालक व्हावा, चपराश्याचा मुलगा जिल्ह्याचा कलेक्टर व्हावा तसा आठ ह्या आंकड्याचं भाग्य आहे !

## आठवा अवतार

भगवान श्रीकृष्ण आठवे ! त्यांचं आयुष्य तसं किती खडतर ! तुरुंगांत जन्म ! मामा जीवावर उठलेला. यमुना नदीच्या डोहांतून तें मध्यरात्रीं चोरून केलेलं पलायन ! विजा, मुसळधार पाऊस ! तिथून गवळ्याघरीं वर्धन ! गुराख्याचं काम ! ज्यानं भगवत्‌गीता सांगून जगाला पावन केलं त्यालाहि रानावनांतून, उन्हातान्हांतून, काट्याकुट्यांतून गुरं वळावीं लागलीं होतीं, हा केवढा भयंकर दैवदुर्विलास ! एवढा चक्रधारी, चक्रपाणी पुरुषोत्तम ! पण पवळ्याढवळ्यामागं लागलेला ! केवढा प्रचंड विरोधाभास ? आठ हा अशुभ आंकडा म्हणून तर नाहींना ? छे ! शक्य नाहीं ! मी तर म्हणेन कीं आठ हाच सर्वांत शुभ आंकडा; कारण जर श्रीकृष्णाची गीता भारतांत न

होती, तर ह्या देशांत फक्त मातीच राहिली असती. इथं गीता पिकली, म्हणून ज्ञानेश्वरीचं अमृतफळ आलं अन् हें अमृतफळ आलं म्हणूनच महाराष्ट्राची पताका यावच्चंद्रदिवाकरौ डौलानं, तेजानं, दिमाखानं फडफडेल !

नाहीं म्हणायला अंग्रेज साहेबानीं आठ (8) आंकड्याची आपल्या देशांत एक महाभयंकर आठवण ठेवली आहे. १८५७ च्या स्वातंत्र्यसमरांत हजारों हुतात्मे इंग्रजी फौजेनं झाडांच्या फांद्याफांद्यावर टांगून फांसावर लटकवले ! कसे माहित आहे ? " गंमत म्हणून " त्यांच्या देहांचा इंग्रजी आठासारखा ( 8 ) आकार करून !

पण ह्या आठालासुद्धां अशुभ मी कसा म्हणूं ! कारण ह्या भारतीय हौतात्म्यांतूनच स्वातंत्र्यज्योत तेवत ठेवली गेली व कालांतरानं त्या ज्योतिचाच स्वातंत्र्यसूर्य झाला !

अवधान संभाळण्यावर माणसाची प्रगति अवलंबून असते अन् म्हणूनच महाबुद्धीवान् व्यक्तीला अष्टावधानी आहे असं आपण कधींकधीं म्हणतों. जो अष्टपैलु आहे, ज्याचं लक्ष चौफेर आहे, तो अष्टावधानी ! ज्या देशांत अष्टावधानी व्यक्ती जास्त, तो देश सांस्कृतिक दृष्ट्या पुढारलेला असण्याची शक्यता जास्त ! इथं हें लक्षांत घेतलं पाहिजे, कीं ह्या अवधानांची सांगता आठांनींच होते–सातांनीं किंवा नवानं होत नाहीं ! ह्याचा अर्थ एवढाच निघूं शकेल, कीं आठ ह्या आकड्यांत कुठंतरी पूर्णत्व दडून बसलेलं आहे !

## गोड स्वप्न

आठ वर्षाची कन्या हें तर एक गोड स्वप्न असतं ! समजत नाहीं अन् समजायला लागतं, ह्या संधिकालांतली ही रम्य, किशोरावस्था ! फ्रॉक घातला असेल तर स्कर्ट–ब्लाऊज घालावासा वाटतो, स्कर्ट ब्लाऊज घातला तर ( लग्नाला जातांना ! ) रुंद जरीकांठी परकर पोलका पेहेरावासा वाटतो, " पंजाबी ड्रेस " ची आवड मधूनच उसळी मारते अन् हें सर्व झाल्यावर मोठ्या ताईची साडी रविवारीं दुपारीं सर्व झोंपल्यावर आरशापुढं उभं राहून एकटीनंच नेसून बघण्याचा प्रयोग करून पहावासा वाटतो !

पातळांच्या व कपड्यांच्या नवनवीन रंगांत इथं डोळे विस्फारून, विस्फारून चमकतात. समवयस्क चार मैत्रिणी रस्त्यानं चालल्या तर सर्वांनीं खांद्यावर हात टाकून एकमेकींना जवळ जवळ ढकलत ढकलत, हंसत

खिदळत जायचं तें वय! भावाला खेळवायचं, आईला क्वचित कामाला मदत करायची, चोरून खोबरं खायचं, मोरीच्या बांधावर चढून कांचेच्या बरणींतली चिंच फस्त करायची, सागरगोटे खेळायचे, झिम्मा...फुगड्या... "एवढी मोठ्ठी झाली तरी लग्न नाऽऽय केलंऽऽऽ" निरंजन, बालिकासदृश विलास! अस्फुट कलिकांचा मंद सुगंध! आजची कन्या – उद्यांची माता – परवाची आजी!

काळाचा महिमा आगाध आहे! आठव्या वर्षी लग्न झालेल्या कांहीं अजून हयात आहेत. आज त्यांचं हंसू येतं. आजची आठ वर्षांची पोरं "जिंकू किंवा मरूं" चा नारा देते. आजची आठ वर्षांची बालिका महाभाग्यवान्! झगमगत्या हिंदुस्थानांत ती मोठी होणार आहे. स्त्री–समस्यांची उकल ती वयांत येईपर्यंत बऱ्याच अंशानं होणार आहे. तिच्या जबाबदाऱ्या पण वाढणार आहेत. पण त्याची काळजी आजच कशाला?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: ..................
क्रमांक ...................... नों. दि. ..............

# ३ दिवाळीची साडी

साडी अन् सासू ह्या न पटणाऱ्या गोष्टी आहेत ! आसू आणते ती सासू अन् बिल् भरतांना यजमानाच्या डोळ्यांत आसू आणते ती साडी ! त्यांतून ती दिवाळीची असेल तर प्रलयकालच !

" मला दिवाळीची साडी कुठल्या रंगाची घेणार ? " चहाचा कप पुढं करीत सौ. नं विचारलं. साडी घेणार हें ह्या उद्गारांत गृहीतच होतं. मी बचावाचं धोरण स्वीकारलं. विश्वामित्राच्या ऐटींत (फक्त हात वर न करून !) मी दुर्लक्ष केलं.

माझा चहा आणि तिचा धीर संपत होता. राजकारणी पुरुषाला साजेशा स्थितप्रज्ञाप्रमाणं मी चेहरा निर्विकार (खरं म्हणजे मख्ख !) ठेवला होता. हवेंत शीतयुद्धांतली बोलकी भयाणता वावरत होती. मुद्दा अंगावर येत असला की विषयपरिवर्तन करावं हा पेंच मीं टाकण्याचं ठरविलं.

" चहा फक्कड झाला होता ... " मी. पण कौतुकाला प्रतिसाद मिळाली नाहीं. मीं विचार केला, आतां बोलणं जरा थोपवावं.

पातळ अन् साडी यांत विशीचं अंतर असतंच ! वीस रुपयांपर्यंत मिळतं तें पातळ–कुमारिकांना शोभण्यासारखं ! विशी ओलांडली की प्रौढा साडी निर्माण होते. या साडीला नियम मात्र उलटा आहे. जितकं वय (की व्यय ?) जास्त तितकं सौंदर्य (साडीचं !) उठावदार !

" सांगा ना ? कसल्या रंगाची साडी घेणार ? " सौ. च्या उद्गारांत सत्याग्रह्याचा निर्धार होता. उगाच पेचप्रसंग निर्माण करून गृहशांति बिघडविण्यांत हंशील नव्हता. मागणी रास्त होती. दसऱ्याला घ्यायची साडी तिचा कोण नातेवाईक स्वर्गवासी झाल्याचं भावनाप्रधान निमित्त करून ( ' अग लोकं काय बोलतील ? कापडाच्या दुकानांत चार ओळखीचे लोक भेटणारच ... ' वगैरे ) मीं डावलली होती.

दसऱ्यानंतर दिवाळी दुडदुड धांवतच येते. तिचं दुःखहि पार पळाल्यासारखं वाटलं. अळंटळं करण्यांत अर्थच नव्हता.

" घेऊं की, हात्तीच्या ! साडी, साडी म्हणजे काय चीज आहे ! " – बेफिकीरपणें मीं.

" अहो, पण कसल्या रंगाची ? " प्रफुल्लित होऊन सौ. म्हणाली.

" त्यांत मला काय कळतंय्... "–मी.

" खरं ना ? " – सौ.

" हो ? " – डिवचलेला मी.

" तर काय ! पण तुम्हाला कुठला रंग आवडेल ? "

यावर मी विचार केला नव्हता. पुरुषांना असल्या गोष्टींचा विचार करायला उसंत असतेच कुठं ?

" सांगा कीं– " तिनं आग्रहच धरला.

" कोनफळी ! " मी कांहींतरी बोलायचं म्हणून हा अस्सल बायकी शब्द ठेवणींतून काढला.

" तुम्हांला काय हो हा रंग माहीत ? माझी एकहि साडी किंवा पातळ त्या रंगाचं नाहीं– " नेत्र विस्फारून सौ. नं विचारलं.

" तुझी नाहीं, पण माझ्या आईची होती ... अजून कपाटांत जपून ठेवलीय् ! "

" पण मला बाई तो रंग नाही आवडत. म्हाताऱ्या बायकांनाच शोभतो तो कोनफळी रंग ! दुसरा एखादा सांगा कीं ! "

" अंजिरी ! " मला रंगाविषयीं फारच कळतं असं दर्शविण्याकरतां, लुगड्याच्या दुकानदाराच्या डौलांत मी बोललों.

" अय्या ऽऽ ! माझं एकहि पातळ किंवा साडी अंजिरी नाहीं; तुमच्या आईची तर नाहीच नाहीं ... हा रंग तुमच्या डोक्यांत कुठून आला हो ! "

" आपला असाच – " – मी.

" आपला असाच कांही नाहीं... " सौ. नं गंभीर विचार करीत असल्यासारखा चेहरा केला.

" अस्सं ! आतां आलं लक्षांत. " उजव्या हाताचं बोट ' कसा चोर पकडला ' या आविर्भावांत नाचवीत ती म्हणाली.

" काय आलं लक्षांत ? "

" परवा माहीत आहे, आपण फिरायला चाललों होतों– "

" मग ? "

" तेव्हा ती पटवर्धनांची सुरेखा अंजिरी साडी नेसून कशी ठुमकत, ठुमकत चालली होती ... तिची साडी बघूनच– "

पटवर्धनांची सुरेखा कोण याची मला सुतराम् कल्पना नव्हती. ती ठुमकत चालली होती कीं लचकत हें मी पाहिलं नव्हतं. त्या दिवशीं सौ. बरोबर फिरत असतांना मी बोलत होतों पण माझा विचार चालला होता–मॅकमोहोन रेषेवर !

" त्या अंजिरी साडीवर सरळ रेषा होत्या– " –सौ.

" मी त्या पाहिल्या नाहीत. सुरेखा कोण ? – मी.

" ती... " नंतर सौ. नं बायकी आडवळणानं कसलंसं नातं सांगितलं. तें मला अजिबात कळलं नाहीं. पण मी बोललों– " हं, आतां आलं लक्षांत ! "

तिच्या ' आत्येच्या मावसभावाच्या मुलाची मुलगी ' हें आकलन होण्याइतकी माझी बुद्धि तीक्ष्ण नाहीं.

" तिचीच साडी घोळतेय् काय डोक्यांत ? " –पुन्हा सौ. ची चौकशी.

" अग नाहीं ! "

" मग तुम्ही कसं बरोबर बोललांत ? "

" अग, एका भावगीतांत हा शब्द आहे. " मी साळसूद उत्तर दिलं.

" सांगा पाहूं त्याच्या ओळी ! "

' तिन्हीसांजची तुला पाहिली
पाहिली दारावरनं ग ऽऽऽऽ !
हिरवी चोळी, अंजेरी साडी
पदर माथ्यावरून ग ऽऽऽऽ ! '

"छान! कुणाचं आहे हें?" सौभाग्यवतीनं गीताविषयीं जिज्ञासेनं पृच्छा केली.

"शांता शेळकेचं!" मी उत्तरलों.

"शक्यच नाहीं! स्त्री कधीं स्त्रीवर भावगीत लिहिते काय?" सौ. चा आक्षेप आला.

"आतां तिलाच जाऊन विचार कीं! आमच्या जी. एन्. जोश्यांनींच गाइलंय् तें गीत –"

इतक्या तपशिलानंतर गाडी रुळावर आली. इतक्यांत समोर खुसखुशीत चकल्या आल्या. ह्या क्षेपणास्त्राची वास्तविक गरज नव्हती. पहिल्याच हल्ल्यांत मी गारद झालों होतों.

साडी खरीदण्याचा तो भयंकर दिवस उजाडला. द्रव्यव्ययापेक्षां त्यांतल्या मानसिक कोंडमाऱ्याची मला फार चीड आहे. मी जायचं टाळलं, पण ती ऐकेचना!

दुकानांत तर शिरलों. कपड्यांच्या व दागिन्यांच्या दुकानांत शिरतांना बायकांचे डोळे असे लकलकतात, असे लकलकतात – चेहरा असा फुलतो, असा फुलतो कीं कांहीं विचारूं नका! लख्ख हंसत सौ. आंत शिरली. वालाँग, बोमडीला वगैरे माझ्या डोक्यांत घोळत होते.

"साड्या काढा पाहूं!" सौ. हुकमी आवाजांत म्हणाली. अनेक सळसळते रंग आमच्यापुढं पसरले गेले.

"अंजिरी काढा!" – वेळ वांचेल व तितकीच दुकानांतली डोकेंदुखी कमी होईल म्हणून मी सूचना केली.

"अहो, पाहूं तर या. पहायला काय जातंय्?" बायकी स्पष्टपणें सौ. नं फर्मावलं.

"हो! हो! पाहायला काय जातंय्!" तरबेज विक्रेत्यानं पुष्टि दिली.

स्त्रिया कापडाच्या दुकानांत साड्या निरखीत आयुष्यभर राहूं शकतील! सुशिक्षित अन् अशिक्षित स्त्री यांत सारखीच रममाण कां होते यावर कुणी डॉक्टरेट्करता प्रबंध लिहावा अशी कल्पना मला सुचली. प्रबंध पुरा होईल.

छापून पुस्तकरूपानं बाहेर पडेल पण हें साड्या-परीक्षण संपायचं नाहीं असं मला वाटलं.

सौ. साड्या पहातांपहातां इतर स्त्रियांच्या फॅशन्स् आपादमस्तक एक सहस्रांश सेकंदांत न्याहाळीत असे. जलद गतीच्या कॅमेऱ्याच्या काचा काढण्याची कल्पना स्त्री-नेत्रांपासूनच आली असली पाहिजे असं मला वाटलं.

कुणी साडी पसंत केली कीं सौ. त्या बाजूला ओणवायची! अंजिरी साडी हिनं मागितल्यावर इतर चार पोरींनी अंजिरी साडीच पाहण्याचा हट्ट धरला. फूटपाथवर, दुकानाबाहेरच, एक बाई अंजीर विकीत होती. वेळ जावा म्हणून मी तीं घेतलीं व पंख्यांखाली उभा राहिलों.

सौ. लगबगीनं माझ्याजवळ आली. "मी म्हणत्यें, रॉ कॉटन्‌ची घेऊंया!" सौ. म्हणाली.

"रॉ कॉटन्‌ची? चांगल्या पक्क्या कॉटन्‌ची अन् पक्क्या रंगाची घे कीं–"

सौ. हंसली तें माझ्या अज्ञानाची कींव येऊन. इतर बायका हंसल्याच! त्यांचा मला फार राग आला. आम्हीं असं हंसलों असतों तर?

अंजिरी साडी आतां मागं पडली होती. रॉ कॉटन् परिधान केलेल्या मस्त युवतींच्या जाहिराती पाहून हा बेत बदलला असणार!

"अहो, बघा –कीं"

मी पाहूं लागलों. किमती फार नि झगमग कमी! मला त्या मुळींच पसंत नव्हत्या.

"अय्या! ही पाहा कित्ती छान!", "अय्या! ही तर टॉप्!", "अय्या! ही तर वंडरफुऽऽऽल!", "अय्या! ही तर कमाऽऽल!"

"अन् ही तर सुरेख–" मी सहज बोललों.

"सुरेख? सुरेखा? पुन्हा सुरेखा?" – सौ. ची भलतीच शंका.

"चल बुवा! घ्यायची ती घे लौकर–" कंटाळलेला मी म्हणालों. मग सौ. रॉ कॉटनवर तुटून पडली. विक्रेता हैराण झाला होता. जिथं रंग पसंत तिथं त्यावरचं डिझाइन् नाजुक नसे. जिथं डिझाइन् नाजुक असे तिथं रंग नापसंत! जिथं दोन्ही एकदम पसंत तीच नेमकी साडी पांच वारांच्या वर

नसायची. ("निदान साडेपांच वार तर हवी! सहा वारांचे मेले पैसे घेतात आणि..." वगैरे!) सर्व दुकान निर्रांकॉटन् साडी तिनं केलंन्!

"दुसरीकडं बघूंया-" सौ. नं कंटाळून पर्याय काढला. हताश विक्रेता स्तब्ध झाला. मी पटकन् सटकलों. साडीवनवास संपला नव्हताच, तेव्हां सीता मागं होतीच! ह्या साडीचा कांचनमृग कसा मिळवायचा ह्या विचारांत मी चालूं लागलो.

"आपण क्रॉफर्ड मार्केटला जाऊं या."—सौ. ची सूचना.

"कां?"

"तिथं वॉटरप्रुफ साड्या मिळतात."—सौ. ची माहिती.

"अग, ओव्हरकोट असतील..." मी तिला हरवण्यासाठी म्हणालों.

"तुम्ही जगाच्या फार मागं आहांत! अहो, हल्लीं वॉटरप्रुफ साड्या निघाल्यात. गोखल्यांची शकू सांगत होती–" तिनं ताजी बातमी सांगितली.

—ही कोण शकू (कण्व मुनीप्रमाणं) मलाहि रडवायला इथं उपटली!

"क्रॉफर्ड मार्केट फार दूर आहे. गांधी मार्केटमधें जाऊंया!" मीं राजकारणांतली तडजोड सुचविली. (इतकं मागं–इतकं पुढं...मॅकमोहोन् रेषा पुन्हां मस्तकांत घुमत होती!) गांधीजींच्या नांवाच्या महिम्यामुळंच कीं काय, सौ. लगेच तयार झाली व आम्हीं टॅक्सींत स्थानापन्न झालों!

मस्तकाला धांवत्या गाडींत गार वाटलं. स्त्री या प्राण्यावर मी विचार करीत होतों. माझ्या पुरुषी मनाला कित्येक प्रश्न सुटत नव्हते–इतकीं पातळं नि साड्या पाहून बायका त्या नापसंत कशा करतात, कां करतात? त्यांना दुसऱ्या कुणींतरी नेसलेली साडी एकदम कां आवडते? ह्या बौद्धिक अस्थिरतेंत स्त्रीसुलभ विभ्रम आहे की अज्ञानजन्य पोरकटपणा आहे?

साध्या विषयांत मोठा आशय पाहावा असं म्हणतात. त्याबरहुकूम विचार असे भरकटत होते. टॅक्सी भरकटत भरकटत (म्हणजे लॉरीज्‌चा मारा चुकवीत!) गांधी मार्केटपाशी ठाकली. तिथं नायलॉन्‌च्या साड्या हिला हेलावूं लागल्या. माल दाखविण्यांत सिंधी व्यापाऱ्यांचा हातखंडा! द्रौपदीला कृष्ण जशी लुगड्यांवर लुगडीं पुरवीत होता, त्याच थाटांत ते वाकबगार व्यापारी हिला (मूळची साडी मात्र अंगावर असतांना हं!) साड्या भिरकावीत होते!

शेवटीं एक भडक गुलाबी नायलॉन् पसंत पडलं. मीं चटकन् पैसे मोजले व त्या रात्रीं थकून पण सुखानं झोपलों.

दुसऱ्या दिवशीं कचेरींतून घरीं येतांच सौ. नं एक नवीनच साडी माझ्या-पुढं उलगडली. मी सर्दच झालों.

" हें काय ? "

" हीच साडी आणली ! "

" कां ? "

" ती गुलाबी परत केली. "

" कां ? "

" वहिनी म्हणाल्या, ही नाहीं तुम्हांला शोभत ! त्या सुरेखाची कशी छान साडी आहे – अंजिरी -- " मी मटकन् खालींच बसलों.

* * *

# ४

# संस्कृति आणि डोकेदुखी

संस्कृतीची वाढ डोकेदुखीवर अवलंबून असते! डोकेंदुखी जेवढी जास्त त्यामानानं संस्कृतिवर्धन अधिक असा निष्कर्ष काढण्यास प्रत्यवाय नसावा!

हा निष्कर्ष काढण्यास कारणहि तसंच सबळ झालं. नुकतीच एक बातमी वाचण्यांत आली. १९६१ सालीं भारतानं एक लक्ष वीस हजार किलोग्रॅम् ॲस्पिरिन् वापरलं. १९६२ सालीं भारताची डोकेदुखी शांतविण्याकरितां दोन लक्ष सत्तर हजार किलोग्रॅम् ॲस्पिरिन् गिळंकृत करावं लागलं. अन् १९६३ सालीं फार वरची कमान गांठली आहे म्हणतात! तस्मात् या भारतव्यापी डोकेदुखीचा विचार करणं आवश्यक व अगत्याचं आहे, निकडीचं आहे! इतक्या झपाट्यानं देशाची डोकेदुखी वाढत राहिली तर काय म्हणावं कप्पाळ! ह्या भारतव्यापी रोगाचा नाश करण्याकरितां चार डोकींसुद्धां सहिसलामत राहाण्याची पंचाईत! म्हणजे शीर सलामत राहाणार नाहीं व पचास पगड्या घालायला डोकींच उरणार नाहींत.

**जंगलमें मंगल!**

गुहेंत राहाणारा माणूस जास्त सुखी होता का, हा प्रश्न पुनश्च विचारण्याची वेळ आतां आली आहे. आज शिकार कसली बरं मिळेल ही त्याची साधी डोकेदुखी! हरण नाहीं तर ससा, ससा नाहींतर कंदमुळं! गुहेचा दगडी

पडदा सोडून, कपारीच्या आडोशाला बसलेल्या त्याच्या बायकोची डोकेदुखी त्याहिपेक्षां भावडी !

तो शिकारीला गेला आहे ... ससा मिळतो कीं हरिण ! कांचनमृगाची अपेक्षा करण्याइतकी, वनवासांत असली तरी, ती मूळचीच निष्कांचन असल्यामुळं, अपेक्षा करीत नव्हती ! तिची नजर, दिगंबर अवस्थेंत त्याच्या माल्याच्या टोकाला लटकत येणाऱ्या खांद्याकडं असायची ! साधी डोकेदुखी... साधी संस्कृति !

लाकडाचं गोल चाक माणसानं केलं, अन् त्याच्या पायाला भोंवरा लागला ! चक्रानं संस्कृतिला गति दिली ! मानवी संस्कृतिचं तें सुदर्शनचक्र गतिमान् झालं. संस्कृति गतिमान् होऊं लागली...डोकेदुखीसुद्धां !

दिगंबर अवस्था लोपून कापसाच्या झाडांचीं बोंडं माणसाला आकर्षूं लागलीं. मानवानं आकाशाचं आभरण झुगारलं. कापसाशीं तो सूत जमवूं लागला ! आकाश काय ? वळलं तर सूत...नाहीं तर भुत ! पंचमहाभूतांपैकीं एकाचा नक्षा तर उतरलाच ! माणूस सुतावरून स्वर्गावर चढायला तयार झाला.

वस्त्र आलीं तशी डोकेदुखी वाढली ! चक्र व सूत ह्यांनीं नागरी जीवनाला जन्म दिला ! नागरी जीवनानं उल्कापात करण्यास प्रारंभ केला !

माणूस चळवळ्या ! वस्त्रांचे अनंत प्रकार निर्माण झाले. कालचक्र भरधांव चाललंच होतं. संस्कृति आधिभौतिक प्रगतिकडं झुकत होती. डोकेदुखी वाढतच होती. तरी जगावं असं पुष्कळच होतं.

**दिव्य अंगठा !**

तसं पाहिलं तर माणसांत अन् जनावरांत एक अंगठ्याचाच फरक ! माणसाचा अंगठा दोन इंच उंचावर, इतर चार बोटांशीं समांतर रेषेंत असता, तर जगांतल्या सर्व डोकेदुखी निर्माणच झाल्या नसत्या ! मारुतिरायाच्या सेनेंत आपल्यालाहि संधि मिळाली असती. हा लेखच काय—जगाचा लेखच संपला असता ! पण दोन इंचाच्या फरकानं व क्लिओपात्राच्या नासिकेनं जगाचा इतिहास बदलला. डोकेदुखी कायम व वाढती ! संस्कृति व प्रगति यांचा अहर्निश संघर्ष सुरू झाला ! आतां तर प्रकरण फारच विकोपाला गेलं आहे. संस्कृति झाली आहे कर्तबगार, खानदानी व घरंदाज सासूसारखी – पण वृद्ध होऊन आसन्नमरण झालेली ! प्रगति सुनेसारखी !

सासूबाईनं तरुणपणीं फार छळलं म्हणून उट्टं काढतेय्! आतां सून हातांत नाहीं राहिली! पृथ्वीला गवसणीही आतां ती घालूं लागलीय्!

नाव डोलूं लागली दर्यावर थयूथय्! सातासमुद्राचं आचमन अगस्त्य ऋषि अन् गोरे लोकांनीं केलं, तेव्हां नवा कपाळशूळ उठला! समुद्रपर्यटण केलं, तर शुद्ध करून त्या प्राण्याला समाजांत घ्यावा हा तर आमचा खुळा शास्त्र-दंडक, तर दोन ध्रुवांवर कुठंहि जा पण आपल्या देशाचा झेंडा फडकव, ही साहेबाची शिकवण! पंधराव्या शतकांत तर स्पेन् अन् पोर्तुगाल् या दोन देशांनीं एखादं कलिंगड दोन वेगळ्या झालेल्या भावांनीं अर्धं अर्धं घ्यावं, या थाटांत त्यांनीं वसुंधरेची फाळणी केली होती, धर्मगुरूंच्या आदेशानं ( Papal Bull )! म्हणजे असं कीं साम्राज्यपिपासा व धर्मपिपासा ह्या तहानेंत इतरांचे घसे कोरडे पडले. डोकेदुखीची आगेकूच!

## गोरी डोकेदुखी

पण जगाची खरी वाफ घालविली किटलींतल्या वाफेनं. औद्योगिक क्रांति, साम्राज्य – लालसा, धर्मप्रसार ह्या डोकेदुखी युरोपांत धुमाकुळ घालीत असतांच भारतांत चांद स्थिरावला होता – नव्हे, तो शुक्लेंदुवत्, वाढत होता. रोहिडेश्वरासमोरची शपथ पाळली गेली नसती, तर आर्यावर्ताचा “आर्यां” झाला असता. पण डोकेदुखीनें उग्र स्वरूप धारण केलं पन्हाळगडावर, सिंहगडावर ... पुढं पानपतावर! शनिवारवाड्यावरचा भगवा जरीपटका ज्या अशुभदिनीं खालीं सरसरला, त्या दिवशीं गोरी डोकेदुखी लागली. ही अर्धशिशी दीडशतक टिकली. अठरा वर्षांपूर्वीं उतार पडला! क्षणभर मस्तक हलकं झालं!

पण क्षणभरच हं! फाळणीनंतरचं हत्याकांड, काश्मीरचा यक्षप्रश्न, पूर, धरणीकंप, अपघात! डोकेदुखी बेसुमार वाढली! अन् शिवाय इतर मोठमोठ्या डोकेदुख्या आहेतच ...

## आंबा कीं कवंडळ?

इवल्याशा मस्तकानं कुठं कुठं म्हणून टक्कर द्यायची? संस्कृतीचा गळा आधिभौतिक प्रगति घोटीत आहे काय? अजस्र यंत्राखालीं संस्कृति चिरडून तिचा चेंदामेंदा झाला काय? अणुस्फोटानं संस्कृतिस्फोट होत आहे काय?

अन् अखेर संस्कृति, संस्कृति म्हणजे चीज तरी काय आहे? संस्कृति पिकलेल्या अस्सल रत्नागिरीच्या आपूस आंब्यासारखी म्हणावी, तर ती गणपतीसमोरच्या मखरामधल्या रंगीबेरंगी महिरपीच्या मध्यावर टांगलेल्या जर्द नारिंगी रंगाच्या मोहक कवंडळासारखीसुद्धां कधीं कधीं भासते. म्हणजे संस्कृतीचा बाह्य फुलोरा मनोहर व सुरंगी असला तरी अंतर्यामी तिचं स्वरूप वेगळं असूं शकतं !

संस्कृतीच्या रसरसीत आपूसच्या आंब्याचं औद्योगीकरणामुळं जें मोहक पण कडु जहर कवंडळ झालं आहे, त्यांतच वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय व जागतिक अस्थैर्य, अशांतता, असामाधान (सांघिक शब्द डोकेदुखी !) निर्माण झालीं आहेत !

## अमेरिकन डोकेदुखी

संपन्न अन् आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या अशा दोन देशांतल्या नागरिकांच्या डोकेदुखीचा परामर्ष घेणं या संदर्भात अप्रस्तुत होणार नाहीं. अमेरिकेंतला शेतकरी घेऊं ! शेतांत स्वतःचा ट्रॅक्टर आहे...तीन पीकं भरघोंस येताहेत...शेतावर दोन चार ट्रक्स धांवताहेत, घरीं दोन मोटर्स आहेत...रेफ्रिजरेटर्स, टेलीव्हीजन सेटस्, व्हॅकुम क्लीनर्स घरोंघरीं असणं ह्या कांहीं विशेष म्हणून शेजाऱ्याला दाखविण्यासारख्या गोष्टी त्या देशांत आतां राहिल्या नाहींत. पण शेतावर मजूर ठेवणं महागाडं काम ! सर्व यंत्रांची दुरुस्ती. वाजवीपेक्षां जरूर असं आर्थिक स्थैर्य आल्यामुळं निर्माण झालेला कणखरपणाचा अभाव, द्रव्यप्रधान समाजरचनेंमुळं होत असलेली जीवनाची ताणाताण व धांवपळ, सुखाच्या क्षणांचं कातरण अन् वितरण घड्याळाच्या दोन काट्यांत कातरलं गेल्यामुळं विरंगुळ्याचं होणारं समूळ विच्छेदन, या त्यांच्या डोकेदुखी !

ऐहिक सौख्याला म्हणजे समाजाच्या घटक असणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिगत सौख्याला एक काल्पनिक परिसीमा असते व नसली तर असावी. बेलगाम सुखलालसेनं समाज दुःखी होण्याचा संभवच जास्त. स्वीडन्मध्यें आतां प्रश्न उभा राहिलाय तो वेगळाच. समाजजीवनांतल्या श्रीमंतीला अन् ऐषआरामाला काबूंत कसं ठेवायचं ! काबूंत कां ठेवायचं ? कारण समाजशास्त्रज्ञ म्हणतात, कीं ऐहिक संपन्नतेच्या अतिरेकामुळं देशांत वेड्यांची, गर्भपातांची व

दुराचाराची संख्या बेसुमार फोफावत आहे म्हणून ! कालचक्र दुसरं आवर्तन घेत आहे !

## रुसलेली लक्ष्मी

आपल्या इकडचं उदाहरण घेऊं. शेतकरी, चंद्रमौळी झोपडी, चार घोंगडीं, आठ भांडीं, वरकस जमीन, पावसाचा रुसवा, परंपरागत आळशी-पणा, प्रयत्नवादाचा अभाव, दैववादाचा पगडा, अन् ह्यांचं मिश्रण म्हणजे रुसलेली लक्ष्मी ! ग्रामीण चित्रपटांतली मोटेवरची गाणीं व दृश्यं कितीहि चेतोहर असली तरी ते जीवन प्रत्यक्ष व्यतीत करणाऱ्या शेतकऱ्याच्या कष्टाळु जीवनाची कल्पना ते चित्रपट पाहून पांढरपेशा वस्तींत रहाणाऱ्या समाजास येणार नाहीं. कारण त्या डोकेदुखीची झळ त्यांना लागलेलीच नसते. एका तांदळाच्या दाण्यांत, एका मक्याच्या कणसांत, एखाद्या उंसाच्या कांडींत शेतकऱ्याचे लक्षलक्ष घर्मबिंदु व अश्रु सांठवलेले असतात ह्याची कल्पना वेगळ्या डोकेदुखी असलेल्या नागरिकांना येणं दुरापास्तच !

बैल मेला, साप चावला, दावा दाखल झाला, तारीख लागली, तगाईचा अर्ज भिजत पडला, वादळांत झोंपडंच उखडलं, बांधावर भावाभावांच्या कुऱ्हाडीनं एकमेकांचीं डोकीं फुटलीं...रक्त अन् अश्रु ! ह्या जीवघेण्या डोकेदुखी ! उतार पडतोय्...पण हळूं हळूं ! कोयनेची तार डोक्यावरून चाललीय ! त्या एकतारींतून आतां सुगम संगीत घुमूं लागलंय् ! एखादा बदसूर निघतोच...जमीन घेतली–भरपाई कमी मिळाली ! आली डोकेदुखी !

## तिखट मसाला व जीवनाचं खोबरं !

गिरगावांतले अप्पा, दादरचे अण्णा अन् सदाशिव पेठेंतले भाऊ वेगळ्याच डोकेदुखीनं ग्रासले आहेत. ज्या समाजाला "बुद्धिजीवी वर्ग" या गोंडस नांवानं ओळखलं जातं, पण वास्तविक पाहातां जो म्हणजे एक भयंकर गैरसमजाचा प्रकार आहे, त्या समाजाची डोकेदुखी वेगळ्या प्रकारची ! दोन खोल्यांची जागा आहे, त्याला तीन खोल्यांचा ध्यास लागतो. त्याकरतां, 'श्रद्धा नाहीं' असं कंठरवानं ठासून सांगत असतांनाहि तो मोठी जागा मिळावी म्हणून साईबाबांना किंवा सत्यनारायणाला इरेस घालतो. कचेरींतल्या कर्दमांत वळवळणारे महाभाग आंतरराष्ट्रीय राजकारणाची फोड, चिकूची फोड भोजनोत्तर खात खात, तावातावानं करतात. तथाकथित

सुशिक्षित समाजांत फोंफावलेल्या खोट्या इभ्रतीच्या पिंपळावर ह्यांतले कांहीं मुंजे तक्रारीचे, टीकेचे व वाकूताडनाचे चित्कार करतात. जीवतांतल्या अपेक्षाभंगामुळं निर्माण झालेली असंतुष्टता, दैवी असंतुष्टता ( Divine dissatisfaction ) या परिस्थितिरूपी तापत्याच्या शेंदरी कापडांत गुंडाळल्यामुळें जरी मोहक स्वरूपांत वावरत असली तरी त्या दोहोंतील मूलभूत फरक शेंदरी आपूस आंब्यांत व शेंदरी कवंडळांत असतो, थेट त्या थाटाचा ! असमाधान, धडपड, बौद्धिक कोंडमारा, अपुरं, अतृप्त जीवन, खोट्या आकांक्षा, भग्न महत्त्वाकांक्षा, मनोविश्लेषणात्मक साहित्य वाचून ( जें मनोविश्लेषणच मूळ चुकीचं असतं, ) दुबळं झालेलं मन, लढाऊ वृत्तींचा अभाव, सुसंस्कृत भितरेपणा ( cultured fright ) शारीरिक दुबळेपणा, पराक्रमाशिवाय आढ्यता, कारण नसतांना घमेंड मारण्याची प्रवृत्ति एवढ्या मसाल्यांनीं हा बुद्धिजीवी वर्ग आपला पिंड तयार करतो. हा मसाला तिखट असल्यामुळं जीवनाचं खोबरं होण्यास अर्थात् चांगलीच मदत होते ! डोकेदुखी खऱ्या व खोट्या असतात, त्यामुळं या वर्गातल्या मज्जातंतूंवर सर्वांत ताण अधिक; अतएव डोकेदुखी अधिक !

**काल्पनिक डोकेदुखी**

वरच्या दुय्यम वर्गाची व्याधि वेगळी, उपाध्या न्याऱ्या. ह्या वर्गांत गर्भश्रीमंतीची हांव, दुय्यम मध्यमवर्गांतली संकुचित् वृत्ति, दारिद्र्यनिर्मित कोतेपणा, श्रीमंत असं आपण ओळखलं जावं ही जळती महत्त्वाकांक्षा, त्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीकरितां सद्सद्विवेक बुद्धीला मिळणारे लत्ताप्रहार, अनीतीच्या मार्गानं एकदम पैसे मिळविण्याची प्रवृत्ति यांचा समवेश असू शकतो.

स्वतःचं शहरांत घर, गांवाला घर, मोटर, थोडी शेती, मोठी हांव यांबरोबरच माळ्याचा पगार वेळेवर दिला जात नाहीं—दिल्यास अपुरा व तोही हप्त्यानं दिला जातो अशा तक्रारी ऐकूं येण्याचा संभव असतो. दैवानं हात दिल्यामुळंच सामान्य बुद्धिमत्ता असूनहि लौकिकदृष्ट्या उत्तम चाललेलं असतं, ह्या जातीची हीं कुटुंबं. पण डोकेदुखी शुद्ध काल्पनिक !

**श्रीमंती डोकेदुखी**

खऱ्या अर्थानं श्रीमंत असतात त्यांच्या दुखण्यांची व्याप्ति तर फारच मोठी ! म्हाताऱ्याच्या किंवा म्हातारीच्या मृत्युशय्येवर शेकडों डोळे मरणापूर्वी

फारच वर्षे आधीं लागलेले असतात. इन्कम् टॅक्स, सुपर् टॅक्स, प्रॉपर्टी टॅक्स, सेल्स टॅक्स, घरपट्टी, आर्. टी. ओ., दुसऱ्यांची लग्नं व मुंजी, मोटारचे अपघात, खोटे हिशेब व ह्या सर्व यातायाती अपुऱ्या म्हणूनच कीं काय मधुमेह किंवा रक्तदाबासारखे हळुहळु मृत्युलोकाकडे खेचणारे रोग! समाजांतल्या श्रेणीपरंपरेच्या डोकेदुखींचं हें ठोकळ चित्रण! मग ह्यांत संस्कृति कुठं बसते?

जीवनाचा वेग वाढला तसा हृद्रोगाचाहि! काल होते–आज गेले! अमेरिकेंत हाच प्रश्न उभा राहिला आहे. अमेरिकन् टॉनिकूप्रिय झाला आहे. लाखों प्रति छापतात अशी मातब्बर मासिकं रोगांची शास्त्रीय चर्चा करतात. हे लेख अधाशासारखे वाचले जातात. वैद्यकीय शास्त्राची माहिती अगदींच जुजबी असणारा वाचक घाबरून मग औषधांचा मारा सुरू करतो! थोड्या-बहुत प्रमाणांत हें सर्वत्र चालूच आहे. काल्पनिक रोगांची डोकेदुखी!

ह्या सर्व बौद्धिक गोंधळांत संस्कार व संस्कृति भरडून निघत आहेत. व्यापारी वृत्तीमुळं संप्रदाय नष्ट होत चालले आहेत. ज्ञानार्जनाचीं साधनं वाढलीं, पण जीवनसंघर्ष प्रखर झाल्यामुळं मौलिक अन् काळाशीं टक्कर देणारी कलाकृति निर्माण होणं दुरापास्तच झालं आहे. एवढा आपला देश स्वतंत्र झाला! पण आपल्या देशांतल्या कुठल्याहि भाषेंत एखादं अमर खंडकाव्य, नाट्यकृति किंवा कादंबरी एवढा ऐतिहासिक प्रसंग प्रसवूं शकला नाहीं!

## बौद्धिक स्क्रू ढिला झाला?

डोकेदुखी वाढल्या पण साहित्य, शिल्प, चित्रकला घटली. लेथ्वर चकचकीत व गरम स्क्रू बाहेर पडला, पण समाजाचा बौद्धिक स्क्रू ढिला झाला! विजेचे पंखे गरगरा फिरूं लागले, पण समाजांतल्या विचारवंतांचा, तत्त्ववेत्त्यांच्या विचारचक्रांचा वेग चांगलाच मंदावल्यासारखा भासतो. रंगीत फोटो काढण्याच्या फिल्ममुळं चित्रकाराचा हातच पंगु झाल्यासारखा वाटतो. त्यांतून मॉडर्न आर्ट्चा (म्हणजे कसला कुणास ठाऊक) धुमाकूळ! शिल्पसृष्टींत तेंच! कुणी झाडांच्या फांद्यांत निसर्गाचं चित्रण हेरतात, कुणी लोखंडाच्या गोळ्याचा रस वितळवून तो थंडावल्यावर जी आकृती निर्माण होते तींत शिल्पसौंदर्य ओतप्रोत व ठांसून भरलं आहे असा दावा मांडतात.

रविवर्म्यांच्या व मेलिन्स फ्रूडच्या सुंदर बालकानं शांतविलेले आमचे सामान्य डोळे तें सौंदर्य नक्की कुठं आहे ह्याचा शोध लावण्याकरतां धडपडतात, पण पदरीं अपयशच येतं. पिकॅसोचं नांव पांडुरंग असतं, तर त्याचं जगानं एवढं कौतुक केलं असतं कीं नाहीं कुणास ठाऊक !

## हा प्रतिकवाद

एका परदेशी कलावंतानं तर कमाल केली. विमानतळावर त्यानं रंग फासला. एका नग्न युवतीचं पदकमल त्यानं आपल्या हातांत धरलं व तिला त्या रंगावरून फरफटत नेली...मध्यें मध्यें ती ललना त्या रंगावर गडबडा लोळलीसुद्धां ! तिच्या त्या देहाचे ठसे जे उमटले, तो म्हणे आधुनिक चित्रकलाविष्कार ! जळो ती सिंबॉलिझम् ! ( Symbolism )

विकृत मनोवृत्तींतून थोड्याशा परिश्रमानं, जास्त ढोंगबाजीनं, त्याहिपेक्षां जास्त स्वप्रसिद्धितंत्रानं येनकेन प्रकारेण कलाक्षेत्रांत धमाल उडवून द्यावी हीच कित्येकांची आधुनिक डोकेदुखी दिसते ! त्यांच्यावर टीका झाली, कीं टीकाकार लगेच सनातनी, जुना, बुरसट, ( Fossilized ) वगैरे होतो !

जगाचं मूल्यमापन करण्याची वेळ आतां आली आहे. शास्त्रज्ञाचं सत्य अन् ललितलेखकांचं स्वप्नाळु स्वप्नरंजन यांमधला समन्वय गांठण्याची निकड आतां निर्माण झाली आहे. कारखान्यांच्या यांत्रिकीकरणामुळं (Automation) वैयक्तिक कामगाराच्या व कारागिराच्या हस्तकौशल्याला दिवसेंदिवस फारशी किंमत राहाणार नाहीं. शेफील्डमध्यें चमचे, कांटे व सुऱ्यांचा जगप्रसिद्ध कारखाना मी पाहिला. मालक स्वतः दाखवित होते. एक वृद्ध गृहस्थ गेले पंचेचाळीस वर्षं ते चमचे, कांटे व सुऱ्या, पूर्ण तयार झाल्यावर, फक्त नजरेखालून घालीत व एखादा चुकून खराब निघालेला चमचा वा कांटा अचूक बाजूला ठेवीत. "ह्या माणसाला काढला, तर माझ्या कारखान्याची शानच जाईल; मृत्युच त्याला इथून काढील" मालक हळूंच मला बाजूला नेऊन भावनाविवश स्वरांत म्हणाले.

यंत्रनिर्मित समाजव्यवस्थेंतून निर्माण होणाऱ्या ह्या अनंत डोकेदुखीवर हाच रामबाण उपाय तर नसावा ?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७०० वि:
क्रमांक २५८८ नों वि:

# ८ चंदेरी किनार – विक्षिप्तपणा !

अमर चित्रकार मायकल् एंजेलो रोममधील व्हॅटीकन् पॅलेसमध्यें आपल्या अमर कलाकृति साकार करण्यांत दंग होता. इतक्या उंचीवर, प्रशस्त छतांवर, डोळ्यांच्या बाहुल्या वर करकरून तो एक दिव्य स्वप्न साकार करीत होता. शेवटीं त्याच्या डोळ्यावरहि परिणाम झालाच !

सोळाव्या चॅपेल्मध्यें भिंतीवर एक भव्य चित्र आहे. हीं प्रचंड कामं चालली असतांना मायकल् एंजेलोंनी एकच अट त्यावेळच्या धर्मगुरूंना घातली होती. जिथं हें काम चाललंय् तिथं कुणाची लुडबुड नको "अन् झालं का ?" "किती झालं ?" "केव्हां होणार", ह्या अशा चौकशा उपटसुंभांकडून नकोत ! धर्मागुरूनं ह्या अटी मान्य केल्या.

पण त्यावेळच्या धर्मगुरूचे सेक्रेटरी मधूनमधून त्या बंदिस्त प्रांगणांत पाऊल टाकून मायकल्ला भंडावून सोडीत. शेवटीं त्यानं तें भव्य कार्य पुरं केलं. धर्मगुरु पहायला आले. त्या ख्रिस्तपुराणांतल्या तैलचित्रांत मायकलनं त्या सेक्रेटरीला अगदीं प्रामुख्यानं पुढंच चितारला आहे. स्वतःचं चित्र एका अमर कलावंतानं अमर करून ठेवलंय्; म्हणून सेक्रेटरीसाहेब हर्षोत्फुल्ल व्हायला हवे होते, पण ते नुसते तणतणत होते !

कारण मायकल्नीं त्यांची छबी सहीसही बरोबर काढली-पण मुद्रेवर लावले गाढवाचे कान ! धर्मगुरुकडं ह्याची तक्रार केली त्या सेक्रेटरी-

साहेबांनीं ! मायकल्ला ते कान मानवी करण्याची विनंति केली गेली. पण विक्षिप्तच तो ! तो कसला दाद देतो ? त्यानं सर्वांना धुडकावून लावलं ! मी जेव्हां ते गाढवाचे कान स्वतः पाहिले तेव्हां मलाहि त्या कलावंताविषयीं, त्याच्या अमर कलेविषयीं अन् त्याच्या श्रेष्ठ कलावंताला शोभण्यासारख्या विक्षिप्तपणाविषयीं आदर शतपट वाढला !

पहिल्या युद्धाच्या समाप्तीचा काळ ! मुंबईत एक नामांकित कसबी गृहस्थ गणपतीच्या मूर्ति अशा घडवीत कीं मांगल्यच साकार व्हायचं ! उंची रंग नि घोटीव हस्तकौशल्य यांचा संगम सुरेख व्हायचा. हे दोन महिने असायचे मूर्ति घडविण्यांत मग्न ! बायकोला एकटीला बसून आला कंटाळा ! तेव्हां आपल्या नवऱ्याला सांगून ती चार आठ दिवस माहेरीं गेली – बाहेर गांवीं ! गणपति यायला अवकाश होते – म्हणजेच नवऱ्याला उसंत मिळायला अवकाश होता. तेव्हां बिचारीनं मुक्काम वाढविला. माहेरीं मुक्काम वाढवायला इथं तर सबळ कारण तरी होतं. पण स्त्रिया किती क्षुल्लक कारणाकरितां हे मुक्काम वाढवितात हे आपल्याला माहित आहेच !

ऊन होतं म्हणून, पाऊस पडला म्हणून, थंडी कोण कडाक्याची, अंगांत हुडहुडी भरायला लागली. नानांना बरं नव्हतं, आईला गरगरायला लागलं... वगैरे वगैरे ! अन् तें साहजिकच आहे !

इकडं आमच्या गणपतिकारांची बायको ठरल्या दिवशीं आली नाहीं. त्यांचा असा संताप झाला ! अपेक्षिलेल्या दिवशीं पत्नी घरीं आली नाहीं कीं पतीचा जो संताप होतो त्याची तीव्रता दुर्वास ऋषि कधींच गांठूं शकले नसतील !

गणपतीचं जावळ रंगवितां रंगवितां त्यांनीं स्वतःचं डोकं खाजविलं ! एक तार खरडली ...

"XXX Expired. Start Immediately" (xxx वारले. ताबडतोब निघा !)

त्यांची पत्नी ! बिच्चारी ! आकाश फाटलं ! गरीब गाईसारखी हिंदु बाई ! धरणीवर गडबडा लोळूं लागली. वडिलांना घेऊन, दोन पोरं खेंचीत घरीं आली. सामसूम होतं. तिला वाटलं अरेरे ! यांचं अखेरचं दर्शन झालं नाहीं. आतां भयानक आयुष्य ! थरथरत्या अश्रुमय अवस्थेंत ती आंत शिरली ! आपला सौभाग्यमुकुट धुळींत पडला – हा विचार तिच्या मनांत येतो तोंच

ती आपल्या यजमानाच्या खोलींत शिरली. एका भल्या मोठ्या गणपतीच्या मुकुटावर सोनेरी रंग सफाईनं लावण्यांत ते बिचारे दंग होते !

मागं वळून पाहून मग ते शांतपणें म्हणाले, "या! आलांत! दुसरा उपायच नव्हता !"

जीवनाला विक्षिप्तपणाची चंदेरी किनार अत्यंत आवश्यक आहे. ती नसेल तर आयुष्य रखरखीत, रटाळ नि कंटाळवाणं होईल. जो तो आपापल्यापरीनं विक्षिप्तपणा करीत असतोच. एकतर त्याला आपण विक्षिप्तपणा केव्हां करतों हें कळत नाहीं अन् दुसरं म्हणजे विक्षिप्तपणाच्या अनंत परी आहेत, तऱ्हा आहेत, लकबी आहेत व हरकती पण आहेत !

माझे एक कविमित्र आहेत. चांगले अस्सल कवि ! एका संध्याकाळीं काव्यशास्त्रविनोदावर खमंग पोहे त्यांच्याकडं खात खात खमंग चर्चा करावी या उच्च उद्देशानं त्यांच्या घरीं गेलों.

त्यांच्या घरचं दृश्य पाहून मला अचंबाच वाटला ! आठ ते दहा वर्षांची दहा बारा मुलं त्यांच्याभंवती बसलीं होतीं. मला वाटलं ते त्यांना एखादी सुरेख गोष्ट खुलवून सांगित असावेत. जरा जवळून पाहिलं तर काय ? उपमा नि उत्प्रेक्षांचा अक्षरशः पाऊस पाडणारा हा कविराज त्या पोरांच्या बरोबर एका वेगळ्याच उद्योगांत गर्क होता. खलबत्त्यामध्यें ते कांचा कुटत होते ! त्याची बारीक पूड स्वतः कुटीत होते.

"या वसंतराव ! योग्य वेळीं आलांत" कविराज.

"हें काय चाललंय् ?" अजून अर्थबोध न झाल्यामुळं मी.

"अहो, संक्रांत जवळ आली ना ? ह्या आमच्या बोळांतल्या पोरांची नि पलिकडल्या बोळांतल्या पोरांची पतंगाची कापाकाप करायची मोठी चुरस लागते...त्यांना उत्तम "मांज्या" करून देतोय् !"

मी स्तब्धच झालों. त्यानंतर त्यांनीं ती कांचेची पूड धाग्याला सफाईनं लावली. कपाटावर रचून ठेवलेलं रंगीबेरंगी पतंग मला आस्थेनं दाखविले व पतंग कापायच्या वेळीं हाताला हिसडा कसा द्यायचा असतो ह्याचं मला प्रात्यक्षिकच करून दाखविलं !

लहानपणीं मी पतंग उडवायचा प्रयत्न केला होता. त्याची "कणी बांधणं" मला कधींच जमलं नाहीं. शेवटीं कंटाळून मी तो धागा कसातरी बांधायचा व पहिल्याच फेरींत त्या पतंगाचं डिपॉझिट जप्त व्हायचं !

ह्या विक्षिप्त कवीराजांवर एक विक्षिप्त प्रसंग गुदरला ! डेक्कन क्वीननं पुण्यास जात होते. मागल्या युद्धाचे दिवस. सहज डोकं बाहेर काढलं तो तोंडावर एक जाहिरात फडफडली. कागद वाचला. लोणावळ्याला एका युरोपियन् गृहस्थाला पियानो व इतर सामान विकायचं होतं.

झालं ! ह्यांचा खिसा रिकामा पण हे आपले उतरले लोणावळ्याला ! गेले पत्ता काढीत ! ते गृहस्थ होते घरांत पण पत्नी नव्हती. पेशा डॉक्टरचा ! ते म्हणाले सामान माझ्या पत्नीचं आहे – उद्यां या !

अन् इतक्यांत ते डॉक्टर महाशय कविराजाच्या बोडक्या मस्तकाकडं रोखून पहायला लागले.

" आंत या जरा " डॉक्टर म्हणाले.

ते आंत गेले.

" बसा या खुर्चीत. " एका लहानग्या खोलींत डॉक्टरांनीं त्यांना बसविलं.

" तुमच्या डोक्याचे फोटो काढूं का ? "

" अवश्य ! अवश्य ! " शांतपणें कविराज म्हणाले.

दोघांनाहि ह्यांत कांहीं विक्षिप्त असं वाटलंच नाहीं ! डॉक्टरांनीं तीन चार प्रखर दिवे लावले. मग ते म्हणाले, " थांबा ! जरा ! " एवढं बोलून डॉक्टरांनीं खणांतून झिरो नंबरची मशीन काढली.

आपल्या मस्तकावर हा असा आघात, वडील असतांना होणार आहे ह्याची त्यांनीं बिलकुल तमा बाळगली नाहीं. शांतपणें, एखाद्या कसबी नि सराईत केशकर्तनालयांतल्या कलावंताप्रमाणें त्यांनीं कविराजांच्या मस्तकाचा ट्यूबलाईट् बघतां बघतां केला. मग त्यांच्या मस्तकावरून अनेक वेळां हात फिरवून त्यांच्या डोक्यावरच्या खांचखळग्यांचं कौतुक केलं. नंतर अनेक फोटो घेतले – पुढून, मागून, तिरकस – कितीतरी !

एवढा सर्व प्रकार झाला. दोघंही शांतपणें आपापलीं कामं करीत होते. कविराजांचा पत्ता घेऊन डॉक्टरांनीं त्यांना जाण्यास अनुज्ञा दिली.

जातां जातां कविमहाराजांच्या दृष्टीस तिथला भला मोठा पियानो दिसला.

" त्याची किंमत काय ? "

" तुम्ही हें वाद्य वाजवूं शकतां का ? " डॉक्टर !

" त्याच्याशीं तुम्हांला काय करायचं आहे ? "

" तेंहि खरंच ! उद्यां चारला या ! विकायचा आहे ! माझी बायको सौदा ठरवेल. "

ठरल्या वेळीं ते पुन्हां तिथं गेले. डॉक्टरांनीं प्रथम डोक्याचे फोटो दाखविले व निष्कर्ष सांगितला कीं ह्या मस्तकाचा मालक एक श्रेष्ठ प्रतिभा-संपन्न साहित्यिक तरी असेल किंवा साफ वेडा तरी असेल !

त्यांच्या बायकोनीं कसलीहि घासाघीस न करतां बरचसं सामान व तो पियानो त्यांना मातीमोल किंमतींत देऊन टाकला ! एक दिवशीं घरासमोर एक भली मोठी लॉरी उभी राहिली. तो अजस्त्र पियानो, एक लांबलचक कपाट वगैरे अनेक गोष्टी त्यांतून घरांत आल्या.

" हें धूड कशाला आणलंत ? तुम्हांला तर पेटीसुद्धां वाजवितां येत नाहीं ! " त्यांची सौ.

" नाहीं आली म्हणून काय झालं ! एक चांगली चीज तर घरांत राहील ! शिवाय एखादा मित्र म्हणाला – मला पियानो वाजवायाचा आहे, तर आपल्या घरांत असावा ! "

आतां या विक्षिप्तपणाला काय म्हणावं ? किती गोड नि सुरम्य आहे हा विक्षिप्तपणा ! मुलांच्या मांज्याचं सुत, भविष्यकाळांत पियानो वाज-विण्याची मागणी करणारा काल्पनिक मित्र, या सर्वांच्या इच्छांची व अपेक्षांची तरतूद, गांठचे पैसे नासून ठेवणारा जीवात्मा विक्षिप्त असला अन् व्यवहारी नसला म्हणून लोकोत्तर नाहीं थोडाच ?

विक्षिप्तपणाला औदार्याची व विनोदाची सोनेरी झूल असेल तर तो जास्तच दैवी नि निरंजन ! जुहूला एक पारशी गृहस्थ रहात असत. बारा महिने अठरा काळ सकाळीं साडे सहा ते आठ ते नियमितपणें घोड्यावरून

रपेट करीत असत. आठ म्हणजे आठच्या ठोक्याला त्यांचा गृहप्रवेश व्हायचाच व ते सरळ घाम पुशीत जायचे न्याहारीच्या खोलींत. त्यांनीं आपल्या दिमतीला अकरा खानसामे नि वेटर्स ठेवले होते ! त्या सर्वांचं सकाळचं महत्त्वाचं काम म्हणजे आठला मालक घरांत शिरतांच त्या अकरा नोकरांनीं धांवत येऊन एकेक बशी त्या गोल टेबलावर ठेवायची. प्रत्येक बशींत मांसाहारी पदार्थांचे वेगवेगळे प्रकार असत. अकरा जणांनीं त्या टेबलाभवतीं " सबरया " शिस्तींत कडं केलंच पाहिजे ! अशा थाटांत ते वेटर्स उभे असतांना ते पारशी मालक यायचे व सर्व बशांकडं एक कटाक्ष टाकीत कुठल्या तरी बशींतले अक्षरशः दोनच तुकडे खायचे. ते उचलल्याबरोबर त्या सर्व वेटर्सनीं पाठीमागं वाघ लागावा असं बशासहित पळालंच पाहिजे हा दंडक ! व एवढ्यानंच भागलं नाहीं म्हणूनच कीं काय त्या बशांतलं त्यांनीं सर्व फस्त करून टाकलंच पाहिजे हा दुसरा कडक नियम !

ह्या पारशी दानशूर गृहस्थाला गंमत वाटायची ती म्हणजे पक्वान्नं करण्याची चुरस, ती अकरा जणांची धडपड, कुणाचा पदार्थ ते खातील त्यासंबंधींचा संदेह व त्यानंतरची ती पोरकट धांवपळ – हास्य नि गडबड ! बस्स ! येवढ्या रोजच्या गंमतीखातर एवढा प्रचंड खर्च !

वर सांगितल्याप्रमाणं औदार्य व विनोद यांचा सुंदर मिलाफ इथं आहे. कुणी म्हणतील कीं ह्यांत गोरगरिबांची क्रूर चेष्टा आहे. बिलकुल नाहीं — एक असामान्य विक्षिप्तपणा !

सत्यपणाचा अतिरेक करून वागणूक कांटेकोर ठेवली कीं तरीसुद्धां एक बोंचक विक्षिप्तपणा नकळत निर्माण होतो !

पुण्यातल्या प्राध्यापकाचे एक चिरंजीव मुंबई विश्वविद्यालयाच्या बी. ए. च्या परीक्षेला बसले होते. मुंबईहून पुण्याला तार दुपारीं दोनच्या सुमारास पोंचावी अशी अपेक्षा होती. तीन वाजून गेले. तारेचा पत्ता नाहीं. मुलगा चुळबुळ करूं लागला. प्राध्यापक महाशय थंडपणें म्हणाले, " त्यांत चुळबुळ कसली करायची ? वेळ दवडूं नकोस ! पुढच्या वर्षी बैस परीक्षेला ! वेळ दवडूं नकोस ! वाचित बैस ! "

नाइलाजानं मुलानं मागल्याच वर्षीचं पुस्तक वाचायला घेतलं. इतक्यांत तारवाला आलाच. अधीरतेनें मुलानं तार वाचली. त्याला फर्स्ट क्लास मिळाला होता ! पोरगं बेहोष झालं आनंदानं ! नाचायला लागलं !

कपाळावरच्या आठ्यांचं जाळं जास्त पसरवीत प्राध्यापक म्हणाले, " हा पोरकटपणा आपल्याला शोभत नाहीं ! फर्स्ट क्लास मिळाला म्हणून काय झालं ? पुष्कळांना मिळतोच ! जा ! एम्. ए. च्या पुस्तकांची यादी घेऊन ये ! वेळ दवडूं नकोस. वाचत बैस ! "

आंबट चेहरा करून मुलानं यादी आणली. दोन वर्षांनीं एम्. ए. झाला. पुन्हां फर्स्ट क्लास् ! त्यानं आपल्या तिर्थरूपाला तें यश, मागची आठवण लक्षांत ठेवून, शांतपणेंच सांगितलं ! त्यावर चेहऱ्यावर कसलाहि फरक न दर्शवितां वडील म्हणाले "एम्. ए. झालास ? प्रा. जोश्यांकडं जा ! पी. एच्. डीला प्रबंधाकरितां कुठचा विषय घ्यावा यांवर त्यांचा सल्ला घे. जा ! जा ! वेळ दवडूं नकोस !" वाचित बैस ! "

अशा विक्षिप्त व्यक्ति या ना त्या रूपानं आपल्यासमोर वावरतात.

मानवाचा विक्षिप्तपणा व त्या विक्षिप्तपणाचे कवडसे इतके वैचित्र्यपूर्ण असतात कीं त्यांवर विचार केला कीं माणूस स्तिमित होतो. तर्कशुद्ध बुद्धीला जेव्हां तडा जातो तेव्हां त्या क्षणीं विक्षिप्तपणाचा जन्म होत असावा. एरव्ही डॉक्टर जॉन्सन्सारखा एवढा प्रकांडपंडित रस्त्यावरचे दिवे मोजता ना ! गुरुत्वाकर्षणाचा शोध लावणाऱ्या न्यूटन्ला, लहानमोठ्या कुत्र्यां-करितां घर स्वतः करीत असतांना, त्यांच्या त्यांच्या आकाराचे वेगवेगळे दरवाजे करण्याचे फुकट श्रम पडते ना ! एका सामान्य माणसानं त्यांना सांगितलं कीं अहो न्यूटनसाहेब ! एकच मोठा दरवाजा करा कीं म्हणजे लहान मोठे कुत्रे सर्व त्यांतून येतील जातील ! महाराष्ट्राचे शेक्सपीअर् राम गणेश गडकरी एका शेजाऱ्याचं लहान मूल कडेवर घेऊन कापडाच्या दुकानांत गेले. येतांना कापडाचं बोचकं घेऊन घरीं आले नि मूल विसरले दुकानांत ! " राजहंस माझा निजला " ची अमर देणगी देणारा हा महाभाग एका राजहंसाला मात्र नक्कीच विसरला विचार लहरींच्या तंद्रींत !

अशीं शेंकडों उदाहरणं आहेत. विक्षिप्तपणा हें मानवी जीवन समृद्ध करतं. समाजजीवनसुद्धां विक्षिप्तपणामुळं समृद्ध होतं. नुकतेच वारलेले कोट्याधीश लॉर्ड नफिल्ड यांनीं आपल्या दारिद्र्यामुळं आपल्याला डॉक्टर होतां आलं नाहीं म्हणूनच कीं काय प्रचंड रकमा मेडिकल् शिक्षणा-करितां दान केल्या ! हा एक लोकोत्तर विक्षिप्तपणाच नाहीं काय ?

जगांतले सर्व श्रेष्ठ स्त्री–पुरुष या ना त्या अर्थानं विक्षिप्त नि लहरी होते. अकबरसारखा सम्राट शिवाशिवीचा खेळ रमणीसंगे खेळत असे (आंख-मिचौली) दुसरे बाजीराव लहर आल्यावर शनिवार वाड्यांतलं एकेक झुंबर वरून झोंकून देण्यास आज्ञा करीत व तें फुटल्याचा खळकन् आवाज आला कीं तांबुल मोठ्या खुषींत येऊन श्रीमंत चघळींत, असं वाचल्याचं स्मरतं!

विक्षिप्तपणा आहे म्हणून जीवन रसरशीत, आनंदमय नि जगण्यालायक झालं आहे! विक्षिप्तपणाशिवाय जग म्हणजे एक रिफर्मेटरी शाळा झाली असती. माणसं कसलीं? निर्जीव स्वार्थी यंत्रच ती! आपल्यावर केवढे अमाप उपकार विक्षिप्तपणाचे आहेत नाहीं?

(अन्– मी हा लेख लिहिला हा विक्षिप्तपणाचाच एक प्रकार नाहीं कां?)

★★★

६

# हा माझा महाराष्ट्र !!!

विक्रम, वैराग्य, प्रतिभा, प्रज्ञा, कला, साहस, शौर्य, दैदिप्यमान् इतिहास, खडकाळ भूगोल, खणखणीत निःस्पृहता; ज्वलंत देशाभिमान माझ्या प्राणप्रिय महाराष्ट्राच्या अणुरेणूंत ठांसून सामावलेली आहेत. आमचं साहित्य महासागरासारखं उदात्त, धीरगंभीर व मौलिक आहे. " चामुण्डराये करवियेले... " महानुभवपंथांचा व साहित्याचा आविष्कार, मग त्या झगझगीत, ओजस्वी, दैवी अशा अमृताशीं जिंकलेल्या पैजा, देहूच्या वाण्याची ती स्वर्गीय वाणी, लेखणीच्या भाल्यानं महाराष्ट्राला खडबडून आलेली जाग....बुडाला औरंग्या पापी....चंद्रभागेकाठीं दाटलेल्या तिकोनी दिंड्या पताका, पैठणच्या ब्राह्मणानं दिलेलं सारस्वताचं गोड भारुड...त्या शारदामंदिराचा अफाट विस्तार पाहून मन स्तिमित होतं.

शिवरायाच्या पदस्पर्शानं पुनीत झालेली भूमि...शंभुराथाच्या हौतात्म्यानं रक्तरंजित झालेली भूमि....अहमदशहा अब्दल्लीला दणके देत असतांना भाऊ गरजले होते...

आजवरी लढाया झाल्या
पोरखेळ पोरांचे ते
हैदोस कसा घालावा
शिकविन आज मी त्यांतें ...

(तिवारी)

मोत्यें गळालीं....मोहरा हरपल्या...हरपल्या पण हरवल्या नाहींत...निष्प्रभ झाल्या नाहींत. त्या शिरढोणला खणखणल्या, भगूरला उन्मीलित झाल्या व अंदमानाच्या निबिड अंधारांत सिंहगर्जना करत्या झाल्या !

" काय पहातोस समोर ? " बारी साहेबानं विचारलं ! सागरावर खिळलेली विचारी नजर जराहि विचलित होऊं न देतां स्वातंत्र्यवीर म्हणाले, " हिंदुस्थान जेव्हां स्वतंत्र होईल तेव्हां ह्या ठिकाणीं आरमारी ठाणं बांधतां येईल... "

ही महाराष्ट्राची जिद्द ! सिंहगडावर दोर कापतांना "वसईच्या किल्ल्यांत माझं मुंडकं तरी पडूं द्या" असा निग्रही आग्रह करतांना, ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं घनघोर मुकाबला करीत असतांना ही जिद्द कायम होती व आजहि आहे !

पण महाराष्ट्रप्रेमानं व पर्यायानं भारत प्रेमानं प्रेरित होऊन आज मी अंतर्मुख झालों आहे. एवढा गुणसंचय असतां महाराष्ट्र आज मागं कां पडत चालला आहे ? औद्धत्याचा दोष स्वीकारून मी महाराष्ट्र–प्रेमामुळंच–महाराष्ट्र निरीक्षण, माझ्या अल्पमतीनं, करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. कुणाच्याहि भावना दुखविण्याचा हेतु मुळींच नाहीं. संताजीनं कापून आणलेले सोन्याचे कळस महाराष्ट्रांतल्या घराघरावर चमकावे हीच मनस्वी इच्छा आहे !

आम्हीं आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहोंत. व्यापारउदीम आमच्या हातीं नाहीं. आम्ही बहुसंख्य शेतकरी व शिकलों तर नोकरमाने आहोंत. अतएव आमची आर्थिक प्रगति विवक्षित मर्यादेपुढं जाऊंच शकत नाहीं ... वगैरे गोष्टी सर्वांनाच ज्ञात आहेत. उद्यांचा आमचा शेतकरी आठ महिने शेती करील व चार महिने इतर कांहीं छोटा धंदा करील. पावसाळ्यांतल्या सरी छपरावर ठिपकत असतांना हरिविजय ऐकतां ऐकतां तो भक्तिरसानं न्हाऊन निघेल व मग निजेल .... पण कसा ?

## बंद झाल्या पाहिजेत ह्या म्हणी !

माझ्या मस्तकांत विलक्षण संताप निर्माण करणाऱ्या कांहीं म्हणी आहेत. " खायला कोंडा अन् निजायला धोंडा " हा त्यांतलाच एक भिकार मासला आहे. लोकशाहींतलं समाजनियंत्रण एका अर्थानें मर्यादित असावं लागतं. नाहींतर ह्या म्हणी कायद्यानं बेकायदेशीर कराव्या असं मला वाटतं.

महाराष्ट्रानं मोठं बोलायला हवं. मारवाडी प्रार्थना कशी करतो.

**"बाबुलनाथ ! टेकडीवाला, सब दुनियेका पालनवाला**
**दे सोनेका चांदीका गोला, जय भं भं भं भोला !"**

हां ! तो सोन्याचा व चांदीचा गोळा मागतोय्. ... थोड्याथोडक्यानं त्याचं नाहीं भागत. खायला कोंडा व निजायला धोंडा ... आत्मसंतुष्टपणाची केवढी ही केविलवाणी परिसीमा ? ह्या म्हणींतली संन्यस्त वृत्ति ज्यांना अँगीकृत करायची आहे त्यानं जरूर ती आचरणांत आणावी, पण समाजाला हा आदर्श म्हणून पुढं ठेवण्याचा उपद्व्याप ह्यापुढें कुणीहि करूं नये.

आतां कुणी वैचारिकाची भूमिका वठवून आम्हांला विचारतील कीं, दोन-चार वाक्प्रचार बदलले तर त्या शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारणार आहे कां ? त्याच्या जीवनाचे प्रश्न सुटणार आहेत कां ? समाजाच्या आर्थिक नियोजनाचं समालोचन करण्याकरितां हा लेख नाहीं. पंचवर्षीय योजना ह्या प्रश्नांना चोख उत्तर देत आहेत व पुढंहि देत रहातील.

मला एवढंच सांगायचं आहे कीं, भागवत धर्माच्या प्रसारामुळं व हिंदु धर्मातल्या सर्वसंगपरीत्यागाच्या विचारप्रभावामुळं बहुजन समाज फाजिल अल्पसंतोषी होऊन त्याचं ऐहिक उत्कर्षाकडे दुर्लक्ष झालं व त्यामुळं महाराष्ट्रीय समाजाचं जीवनमान जें एकदां निकृष्ट होत चाललं तें निदान पिढ्यान्‌पिढ्या सारखं खालावतच राहिलं. "खायला कोंडा" वगैरे दारिद्र्य-दर्शक वाप्रक्चार ह्यांतूनच निर्माण झाले !

आर्थिक स्थैर्य प्राप्त झालेल्या समाजाच्या थरांत जेव्हां असलीच भाषा रुळूं लागते तेव्हां असल्या वाक्प्रचाराचा कळत नकळत मनोवृत्तीवर वाईट परिणाम होण्याचा संभव असतो. म्हणजे असं नाहीं कीं असल्या म्हणीमुळं महाराष्ट्र मागं पडला ! म्हणीनां प्राधान्य देण्याचं कारण एवढंच, कीं त्यांच्यामुळं त्या त्या समाजाचं सामाजिक दर्शन घडत असतं.

"नाऱ्या सात पोळ्या खातो...पण वाढतो कोण ?" हा वाक्प्रचार. महाराष्ट्रांत पीक पुरण्यासारखं सहसा नसतं ह्याचा एका दृष्टीनं हा बोलका पुरावाच आहे ! नाऱ्याला सात पोळ्या वाढायच्या नसतील तर नका वाढूं; पण त्याची आढ्यता कशाला ? नाऱ्याला नोकर ठेवणारे त्याचे धनी सुबत्तेंत दिवस कंठीत असतात...पण कद्रू वृत्तीचा हा आविष्कार समाजाच्या

थरांत मिसळतो व एखादद्दुसरा शहाणा ह्या म्हणीचा वेळीअवेळीं उपयोग करून महाराष्ट्राची अगदीं नकळत बदनामीच करीत असतो.

## " लक्ष्मी चांदला करवा आवे छे "!

इकडं गुजराथनं मात्र लक्ष्मीची सेवा अहर्निश केली. ज्याच्या हाती लक्ष्मी त्याच्या हातीं वसुंधरा हें ज्ञान त्यांना उपजतच. त्यांच्या बऱ्याचशा म्हणी व वाक्प्रचार वाणिज्यवृत्तीला पोषक अशा असतात. थोडसं विषयांतर करून द्रव्याच्या कल्पनेसंबंधीं विवरण ( Concept of wealth ) इथं करणं अप्रस्तुत होणार नाहीं असं वाटतं.

नोकरमाना सुशिक्षित महाराष्ट्रीय सेवानिवृत्तीनंतर मुंबईच्या उपनगरांत वा पुण्याच्या आसपास जर चार सहा खोल्यांचं घर बांधू शकला तर त्याचे नातेवाईक त्याला फार भाग्यवान् समजतात. ह्याच हिशोबानं एखाद्या गोखल्यांचा अप्पा नाहींतर देशपांड्यांचा बाबा, सर्व प्रॉव्हिडंट फंड घरांत बुजवून " घरवाला " होतो व घर बांधल्यावर मधुमेहानं नाहींतर हृदयक्रिया आकस्मिकपणें बंद पडून इथला त्याचा डेरा उठतो. त्याच्या मोठ्या फोटोची रंगीत फ्रेम दिवाणखान्यांत लागायच्या आंतच बहुतेक दोन तीन भावांचीं भांडणं होऊन तें घरकुल मालक बदलतं व विखुरलेले भाऊ उपनगरांत राहून, नगरांत नोकऱ्या करतात.

कच्छमध्यें परिस्थिति फारच वेगळी. " लक्ष्मी पचवानुं माटे शक्ति लागे छे ! " लक्ष्मी रिचवायला, पचवायला एक शक्ति लागत असते. ती गुजराथी समाजांत फार मोठ्या प्रमाणांत आहे.

जामनगर ते भूज हा विमानप्रवास मला वाटतं पसतीस मिनिटांचा असावा. विमानांत मी बसत असतांना वीस पंचवीस साधेसुधे शेतकरी विमानांत चढूं लागले ! माझ्या मित्रानं त्यांना सांगितलं कीं, आतां काय विमान पहायला येतां ? विमान सुटेल पांच मिनिटांनीं ? त्यावर हंसून त्यांतला एकजण म्हणाला " शेठ ! आमी डेली पॅसींजर हाय ! "

आम्हीं सर्द झालों. विमान अंतराळांत गेल्यावर त्यापैकीं एकाला मी विचारलं, " कशाला रे जाता जामनगरला ? "

तेव्हां शांतपणें उत्तर दिलं गेलं कीं जामनगरच्या बाजारांत रोजचा वायदेबाजार, शेअर बाजार वगैरे अनेक बाजारांत आर्थिक उचापती करून

गांठीला सोनं व चांदी बांधून ही शेतकरी मंडळी आपल्या गांवीं परततात ! लक्ष्मी चांदला करवा आवे छे !!!

आम्हीं मात्र शेतकऱ्याच्या ग्रामीण जीवनावर गिरगांव कांदेवाडीच्या अंधेऱ्या खोल्यांत बसून काव्यं खरडीत असतों !

कच्छमधली श्रीमंत व्यक्तींविषयींची कल्पना ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला व मन खिन्न झालं ! बा महाराष्ट्रा कुठं आहेस तूं !

मुंबईमधला भातबाजार मुख्यतः कच्छी लोकांच्या ताब्यांत आहे. या समाजांत पन्नास लाखाच्यावर असामी असेल तर तो म्हणतो, " डाकोरनाथनी कृपा छे...बेवखत खिचडी मळे छे ! " ( डाकोरनाथची कृपा...दोन वेळां खिचडी मिळते ! )

पन्नास लाखाच्या खालचा इसम हा " च्याले छे ! " ह्या खाक्याचा व पांचदहा लाखवाला तर सामान्य ! ! लाख दोन लाखाचा असामी निष्कांचनच असं मानण्याची प्रवृत्ति आहे !

पगार झाल्यावर एक तारखेला अर्धा किलो मिठाई किंवा शनिवारी घरीं जाताना " भुसा " नेणाऱ्या आमच्या नोकरमान्या मंडळींनीं ( त्यांतले बरेच बी. कॉम्. असतात ) हें सौजन्य लक्षांत घ्यावं असं म्हणतो !

लेवा पाटीदार ! एक कष्टाळु श्रीमंत कृषिप्रधान समाज. काका पुतण्याचं भांडण झालं जमिनीवरून तर पुतण्या काकांकडून त्या जमिनीचा कबजा मिळविण्याकरतां दावा लावतो व त्या दाव्याकरितां कर्ज त्याचा काकाच त्याला व्याजानं देतो. म्हणजे कायद्याचं भांडण वेगळं व कर्जाऊ रकमेचं व्याज वेगळं ! काका–पुतण्याचं भांडण कोर्टांत... एऱ्हवीं धनको व ऋणको ! आमच्याकडं " काका ! काका ! मला वांचवा " अशी आर्त किंकाळी मारली जाते व काका वांचवत तर नाहींच नाहीं व... शेवटीं... १८१८ !!!

ह्याचा अर्थ असा नाहीं कीं, आम्हीं आमच्या महाराष्ट्रीय अस्मितेशीं प्रतारणा करून, नसते उपद्व्याप करावे. मला एवढंच दाखवून द्यायचं आहे कीं, आर्थिक व्यवहारांत आम्हीं मागं राहिल्यामुळं पर्यायानं महाराष्ट्र मागं राहिला. आमच्या सामाजिक अधोगतीचं मूळ कारण आहे आमचं आर्थिक क्लैब्य !!!

## तेवढ्यानंच काय झालंय ?

पण काळ पाहून येईल! उद्याच्या महाराष्ट्रांत आर्थिक घडी अशी झपाट्यानं सुधारणार आहे कीं, मला ह्या आर्थिक क्लैब्याचं फार नाहीं वैषम्य वाटत. इतकी वर्षं वाट पाहिली. पांच दहा वर्षं सबूरी कांहीं जास्त नाहीं. खेडेगांवांत ट्रॅन्झीस्टर व रेडिओ, थोडे थोडे का होईना, गाऊं लागले आहेत. वर्षभरांत कोयना शेंकडों खेडेगावांतून इलेक्ट्रिक ट्यूब्स झगमगवील.

पण ज्या वेगानं हें महाराष्ट्राचं औद्योगीकरण होणार आहे त्या वेगानंच आपल्याला आपल्या मनोव्यापारांचं नूतनीकरण करणं इष्ट आहे. पारमार्थिक, वारकरी पंथी, भागवत धर्मप्रणीत मनोवृत्तीची जोपासना हळुवारपणं करीत असतानांच तो पारंपरिक धोंडा कामीं लावून, त्याला विहीरीच्या बांधाला लावून आपण एका भरघोंस, ऐश्वर्यसंपन्न व विशाल समाजजीवनाचं स्वागत करण्याकरितां सिद्ध झालं पाहिजे. नाऱ्याला सात काय सत्तावीस पोळ्या वाढा !!!

पण थोडी गोम इथंच आहे. आम्ही जरा भांडकुदळ आहोंत. आमच्या भांडकुदळपणाचा जन्म आमच्या बुद्धिवादी दृष्टिकोणांतून जरी झाला असला व जरी तें जिवंतपणाचं लक्षण असलं तरी ह्या प्रवृत्तीला पायबंद घालण्यास आपण शिकलं पाहिजे. पोलंडमध्यें एक म्हण प्रचलित आहे. "Two Poles, three opinions" (दोन पोल्स, तीन मतें) ह्याच न्यायानं "चार महाराष्ट्रीय, चाळिस मतें" म्हणायला हरकत नाहीं. दुही व भांडकुदळपणा ह्यांमुळं महाराष्ट्राचं आजवर अपरिमित नुकसान झालं आहे. दख्खनच्या मातींत हीं दोन फुरशी कां फुरफुरतात कुणास ठाऊक? मऱ्हाठशाहीचं राजवैभव ह्या दुहीमुळंच रसातळाला गेलं. भांडकुदळपणाला कधीं कधीं तर्ककर्कश वादविवादाचं स्वरूप प्राप्त होतं. पण शब्दच्छल फार! तत्त्वनिष्ठेचा केव्हां केव्हां अतिरेक! एवढी बौद्धिक खात्री पटवून तरी कुणाची द्यायची? त्याचं व्यावहारिक मोल काय?

कुणी म्हणतात आम्हीं मोडूं पण वांकणार नाहीं! छान! आम्हांला या बाण्याचा अभिमान वाटतो. पण सर्वांना सर्वांच्या पुढं वांकावंच लागतं... नमून घ्यावंच लागतं. नोकरींत कनिष्ठ वरिष्ठाशीं, व्यापारी गिऱ्हाईकांशीं

मिळतं नाहीं कां घेत ? समजूतदारपणा, थोडी पड खाण्याची प्रवृत्ति, सर्वांना सामावून घेण्याची कला हे वांकणं काय अन् तसं तें न करतां अट्टाहास करणं म्हणजे मोडणं काय ? खुद्द छत्रपति शिवाजी महाराजांनीं अनेकांशीं मिळतं जुळतं घेतलं, गनिमी काव्यानं शत्रूला बेजार केलं हें सर्वश्रुत आहे. तीच राजनीति व युद्धनीति योग्य होती. आजच्या जमान्यांत ज्याला "Defense In Depth" म्हणतात, तशीच ती शत्रूला जेरीस आणणारी युद्धनीति होती !

अन् मुख्य असं कीं, सबंध जगांतच सामोपचाराचं, मिळतं घेण्याचं, एकमेकांना सामावून घेण्याचं राजकारण शिजत असतांना आमच्यांतले कांहीं जर आम्हीं 'मोडूं पण वांकणार नाहीं' अशी उद्धट व तिरसट भाषा वापरूं लागले तर अणुयुगांत असल्या दर्पोक्तीला कुणीहि धूप घालणार नाहीं. पवन चक्कीवर हल्ला करणाऱ्या डाँको पांझासारखी आपली हास्यास्पद परिस्थिति होईल !

आमच्या राजकारणी मंडळींत दुही व भांडणं ... ... सांस्कृतिक क्षेत्रांत तर सरस्वतीचं नांव घेऊन तिच्या झंकारांत ह्यांचा आपला कायमचा बदसूर मिळविलेलाच ! समाज कार्यकर्त्यांचे उपद्व्याप सर्वश्रुतच आहेत.

महाराष्ट्राच्या राजधानींत महाराष्ट्रीय धनिकांनीं कांहीं फार मोठ्या धर्मदाय संस्था निर्माण केल्या असं मला वाटत नाहीं. लोकसंख्येच्या व एकंदर एकूण उत्पन्नाच्या मानानं धर्मदाय म्हणून खर्च करण्याची प्रवृत्ति कमीच !

वाडियान इस्पितळें बांधायची व इतरांनीं त्याचा फायदा घ्यायचा हेंच चाललं आहे. हिंदु स्मशानं आजहि जवळ जवळ दैन्यावस्थेंतच आहे. महाराष्ट्रीय मंडळींची ज्या ठिकाणीं लग्नकार्ये बहुतेक साजरीं होतात तीं ठिकाणं आजहि खूप पैसा मिळूनहि भिकार अवस्थेंत आढळतात. विजेचे पंखे व दिवे जेमतेमच, भिंतींचे पोपडे डंवरलेले !

पानशेत धरण फुटल्यावर, पुण्याच्या पूरग्रस्तांना जें द्रव्यसहाय्य उत्स्फूर्तपणें झालं त्यांतला फार मोठा वांटा बिगर महाराष्ट्रीय मंडळींनीं दिला हें लक्षांत आल्यावर माझ्या म्हणण्याचा आशय झटकन् समजेल !

पुणें महाविद्यापीठाला आपली सर्व शिल्लक देणारा एखादा वृद्ध जसा आपल्यांत निर्माण होतो, त्याच आपणांत राम गणेश गडकरी यांची अंतिम इच्छा...फर्ग्युसन् कॉलेजच्या आवारांत आपली समाधि असावी ही...ती इच्छा पुरी न करणारे महाभागहि आढळतात !

## उत्कर्षाचं वावडं !

दुसऱ्याच्या उत्कर्षाचं वावडं हेंहि आमचं एक वैशिष्ट्य आहे असं नाईलाजानं म्हणावं लागतं. आपल्यांतला एक फार वर चढला तर असूया व मत्सर होणं हा मानवी स्वभाव आहे हें जरी खरं असलं तरी त्या कटु भावनांचा प्रादुर्भाव आमच्यांत तरी जास्त प्रमाणांत आहे अशी मला शंका येते !

इराणी दुसऱ्या इराण्याकडून किंवा त्यांच्या जमातीच्या द्रव्यसंचांतून कर्ज घेऊन धंदा करतो. कच्छी तेंच करतो, उडपी तेंच करतो ! आमच्याकडं काम कठीण ! कर्ज घेणं...मग तें धंदा वाढविण्याकरितां कां होईना, म्हणजे एक प्रकारचा मानभंग अशी विकृत समजूत कांहींजणांची झालेली दिसते. खुद्द सरकार जिथं योजनांकरितां कर्ज घेतं तिथं इतरांची काय कथा ? पण नाहीं ! मोडेन पण वांकणार नाहीं !

आजचे आम्हीं, छत्रपतींची महान् मर्दुमकी व त्यांचे दैदिप्यमान जीवन पुढं करूनच आमचा मोठेपणा सांगूं शकतो. शंभुराजांचा आत्मयज्ञ, तानाजी मालुसऱ्याचें हौतात्म्य, बाजी प्रभूचें शिवसमर्पण, आग्र्याहून सुटका ... पानपत ... शनिवारवाडा ... अंधार भयानक, गडद अंधार .... वासुदेव बळवंत ... स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा ज्योतिबा फुले ... लोकमान्य टिळक, गोखले, आगरकर, चिपळूणकर ... संतांची नेत्रदीपक परंपरा, साहित्यिकांची रत्नमाला...झालं संपलं......! आज ह्या सर्वांमुळंच आहे आमची शेखी ! तरी बरं दोन भगिनींनीं आपला उंच आवाज दुनियेंत घुमवून महाराष्ट्राचा ध्वज अंतराळांत फडकवित ठेवण्यास नाहीं म्हटलं तरी फार मोठी मदत केली आहे !

पण आज काय ? एक मोठी पोकळी ! " जय जगत् " ची हांक विश्वव्यापी आहे तेव्हां ती आमच्या कक्षेबाहेरच एका अर्थानं ! महाराष्ट्राचे रामशास्त्री

खणखणीत बोलले...आतां मात्र बोलतच नाहींत. काय महाराष्ट्राला त्यांचं मार्गदर्शन उपयुक्त होणार नाहीं ? जाऊं द्या झालं !

हें त्रोटक आत्मपरीक्षण ... महाराष्ट्र – परीक्षण आहे. त्यांत औद्धत्य आलं असेल तर मी दिलगीर आहे...लेखनाचा हेतु प्रामाणिक आहे...आत्यंतिक महाराष्ट्रप्रेमी या नात्यानंच हें लिहिलं आहे. माझा अधिकार काय ? कांहीं नाहीं ! सामान्य व्यक्तीच्या दृष्टिकोनांतून हे सामान्य विचार मांडले आहेत व आणखी मांडणार आहे. कुणी हल्ला केलाच तर मोडेन पण वांकणार नाहीं ! ! !

★★★

# ७

# कुबेराच्या मर्यादा

आमचा देश पुरातन आहे इतकंच नव्हे तर पुरातन चालीरीतीहि काळाला न जुमानतां जिवंत राहिल्या आहेत. आमच्या इथं खोती आणि जमिनदारी, इनामदारी आणि सरदारी, मानकरी आणि पाटीलकी वगैरे बुरसटलेल्या समाजाचे घटक अस्तित्वांत आहेत. इतकंच नव्हे, तर कित्येक ठिकाणीं, ह्या नवयुगांतहि त्यांचे अत्याचार चालू आहेत.

ह्या पिढींतल्या सरदारांचा असाच एक संमिश्र वर्ग आहे. कुठल्यातरी आजापणजांनीं बांधलेल्या प्रासादाचा आभास उत्पन्न करणाऱ्या एखाद्या ‘राजवाड्यांत’ नाहींतर पडक्या वाड्यांत ह्यांचं बस्तान असतं. त्यांच्या दिवाणखान्यांत पूर्वजांकडून आलेल्या दोनचार गंजलेल्या तलवारीहि असूं शकतील. आपले आजोबा त्या तलवारी परसांत अतिशय सफाईनं फिरवीत अशी कदाचित् ते प्रौढीहि मारतील! रणभूमीचं वातावरण निर्माण करणारं एखादं पोलादी चिलखत नाहींतर सोन्याच्या मुठीचा एखादा जंबिया ते तुमच्यापुढं नाचवतील. आपल्या सरदारीचा सनदशीरपणा सिद्ध करण्याकरितां मोठ्या ठळक अक्षरांत चमकदार शाईनं लिहिलेली आणि चांदीच्या पात्रांत ठेवलेली एखादी सनद ते तुमच्यापुढं फडकावतील. ते कागदपत्र पाहिले कीं तुमचं मनहि तुम्हांला दोन-चारशें वर्षांपूर्वींच्या भूतकालांत एका क्षणांत

दा. क्र. ९८३७८

खेंचून नेईल आणि खडतर भविष्यकालाचा तुम्हांला क्षणभर विसर पडेल! त्यामुळं कदाचित् ढाल-तलवारींचीं युद्धं तुमच्या मनःचक्षूंसमोर येतील. कोकणच्या डोंगरपठारावरचे दगडी किल्ले, काल्पनिक रणदुंदुभीनं दुमदुमतील आणि काळोख्या भुयारांतून चाललेल्या गुप्त कटांचा कानोसाहि घ्याल तुम्हीं!

सरदार इंद्रसेन खडकफोडे नवीन पिढींतले होते. थोड्याफार शिक्षणाचा त्यांच्या मनावर चांगला परिणाम झाला होता, नाही असं नाहीं; पण लहानपणापासून त्यांना घरचं शिक्षणच असं मिळालं होतं, कीं कांहीं केल्या त्यांच्या डोक्यांतून त्यांची ती ‘ सरदारी ’ मात्र जात नव्हती.

इंद्रसेन रंगेल होते. सरदारच ते! रंगेल नसणं म्हणजेच आश्चर्य! ते उदार होते. उदार नाहीं तो सरदार कसला हो? ते थोडे ‘ तसेहि ’ होते. सरदारीची इभ्रत सांभाळायची म्हणजे थोडंफार ‘ तसं ’ नको का व्हायला?

सरदारीणबाई अगदीं असाव्यात तशा होत्या. त्यांचं नांव ललिता. हे ‘ शिनेमांतलं ’ नांव ठेवून घेतांना सरदारांना थोडी अडचण आली होती. पण झालं एकदां त्यांच्या मनासारखं. त्या शांत होत्या, सोशिक होत्या आणि किंचित् गंभीर होत्या. त्यांचाहि जन्म सरदार कुलांत झाला होता. त्यामुळं बारक्यासारख्या बाबीकडे लक्ष पुरवायचं, चालीरीतींबद्दल मान राखायचा वगैरे शिक्षणाचं बाळकडू त्यांना अगदी लहानपणापासूनच मिळालं होतं. सरदारसाहेबांच्या त्या अगदीं मुठींत होत्या. आयुष्याविषयीं तक्रार करायला त्यांना जागा तरी कुठं होती म्हणा! सुखांत चालला होता त्यांचा जीवनक्रम!

घरांत आडमाप सोनं आणि चांदी होती. मोठा वाडा, भरपूर जमीनजुमला होता. नोकरचाकर, गडीमाणसं, आचारी नि पाणक्ये ह्यांची रेलचेल होती. मुंबईहून खास आणलेली एक भली मोठी मोटरगाडी बाईसाहेबांच्या तैनातीला नेहमीं हजर असायची. सात्त्विक आणि श्रीमंती भोजनाचा थाट असायचा! खरंच आयुष्य अत्यंत सुखांत चाललं होतं त्यांचं!

सरदारांची चपला नांवाची एक आवडती घोडी होती. मुंबई-पुण्याच्या रेसवाल्या चढेल आणि उद्दाम घोड्यांना आपली चपला कुठल्या कुठं मागं टाकील असा त्यांचा एक गोड गैरसमज होता. असावेत म्हणून त्यांनीं दोन ‘ अल्सेशियन् ’ कुत्रेहि बाळगले होते. पिंजऱ्यांत एक पोपट होता. एक इटालियन् मांजर त्यानीं पैदा केलं होतं. बगीचांत एक मोर बागडत असायचा. इंद्रसेन जातीनं त्याची काळजी घेऊन निगा राखायचे!

नोकराचाकरांचा ह्या तरुण सरदार जोडप्यावर जीव जडला होता. त्यांतले कांहीं म्हातारे होते आणि कांहीं नुकतेच लागलेले तरुण होते. म्हातारे चाकर अत्यंत नम्रतेने वागत. त्यांपैकीं कांहींनी दोन पिढ्या त्या वाड्यांतील अन्न खाल्लं होतं. ते लवून मुजरा करीत आणि त्यांत खोटेपणा मुळींच नसायचा. त्यांच्या मिशांत स्मित सहज झांकून राहिलीं असतीं. त्यांचा बुलंद आवाज ऐकावासा वाटे. हयातभर त्यांनीं हलकी चाकरी केली होती. पण आपलं कांहीं त्यांत चुकलं आहे असं त्यांना वाटत नव्हतं. त्यांतल्यात्यांत जे वृद्ध होते त्यांनीं त्या घरची माया अवाढव्य खर्चापायीं कमी होत चाललेली प्रत्यक्ष पाहिली होती. सरदाराविषयीं दिवसेंदिवस अनुदारता आणि तिरस्कार वाढत असलेला त्यांनीं पाहिला होता. ' कुणबट ' देखील फाडकन् उत्तराला प्रत्युत्तर द्यायला लागले होते आजकाल! माळ्यामराठ्यांच्या वृत्तींतील हा क्रांतिकारक फरक त्यांना दुःसह होत होता. खरंच! हीं सामाजिक संक्रमणं त्यांच्या नजरेसमोर झालीं होतीं. ह्याआधीची बेसुमार उधळपट्टी करणारी, निशापाण्यांत मग्न झालेली, व्यभिचारांत डुंबत असलेली श्रीमंत सरदारांची पिढी दिवसेंदिवस नामशेष होत होती. त्यांच्या भव्य, धिप्पाड आकृति काळाच्या उदरांत गडप होत होत्या. आणि त्यानंतर हे थोडे नेमस्त, शांत, थोडे शिकले-पढलेले सरदार त्यांना दिसून येत होते.

दौलती हा सर्वांतला जुना नोकर. त्याची आणि म्हाताऱ्या जानकीची त्या वाड्यांत गेलीं पंचवीस तीस वर्षं गेलीं होतीं. आजपर्यंत दोघांनीं वाड्याची व्यवस्था अगदी चोख ठेवली होती. चोरीमारीचा किंवा लांचलुचपतीचा त्यांच्याजवळ प्रश्नच नव्हता मुळी. वाडा हेंच त्यांचं खरं ' घर ' झालं होतं. सरदारांचं सुदैव तेंच त्यांचं व त्यांचं दुर्दैव तेंहि ह्यांचंच! इंद्रसेनाच्या वडिलांच्या हाताखालीं दोघांनीं खस्ता खाल्ल्या होत्या म्हणूनच कीं काय, नवे सरदार आणि ललिताबाई ह्यांच्यावर त्यांचा थोडा दाब होता. इंद्रसेन आणि त्यांच्या पत्नी ह्यांची पूर्ण खात्री होती, कीं तें कांहीं जे सांगायचे तें निरपेक्ष बुद्धीनं आणि आपल्या चांगल्याकरितांच सांगायचे.

एक दिवशीं संध्याकाळीं इंद्रसेनांनीं दौलतीला घोडी जुंपण्यास सांगितलं.

" वीट आला त्या मोटरचा ! " भार्येकडं पहात, मर्द मराठेशाहीचा हा फुसका अंश म्हणाला आणि मग सरदार, सरदारीणबाई, दौलती आणि जानकी फिरण्याकरितां बाहेर पडलीं. लौकरच तीं गांवाबाहेर आलीं. ह्या

मंडळींना सर्वसामान्य लोकांप्रमाणं 'चालतांना' पाहून कांहीं जुन्या मंडळींना आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहिला नाहीं.

माळावर आल्यावर इंद्रसेनांनीं सरावलेल्या स्वारासारखी घोडीवर उडी मारली आणि टाच मारतांच तें प्रामाणिक जनावर भरवेगानं पळत सुटलं. तें दृश्य फार मनोहर होतं. निखळत्या ताऱ्याच्या वेगानं चपला पळत होती. भलामोठा धुळीचा ढग ती उडवीत होती. अस्ताला जाणाऱ्या सूर्यकिरणांनीं ते धूलिकण सुवर्णाचे भासत होते. ललिता, दौलती आणि जानकी निश्चलपणें पहात होती.

पश्चिमेच्या बाजूला सरदारसाहेबांनीं घोडा उधळविला तेव्हां कुणाला वाटलं असतं कीं सूर्यावर स्वारी करताहेत कीं काय इंद्रसेन! त्या क्षणीं मात्र घोड्यांच्या टापांनीं दिल्लीची बादशाही खिळखिळी करणाऱ्या नेकजात मराठ्यासारखे ते भासले!

त्यांनीं घोडा परतविला. त्यांचा श्वासोच्छ्वास जोरांत चालला होता. श्रमामुळं त्यांचा चेहरा फुलला होता आणि त्यामुळं ते फारच देखणे दिसत होते. त्यांची रुंद छाती केवढी तरी वरखाली होत होती. त्यांना रणावेश चढल्यासारखा वाटत होता. झटकन् ते खालीं उतरले. चपलेला त्यांनीं एक शाबासकी दिली आणि अनिमिष नेत्रांनीं आपल्याकडे पहाणाऱ्या आपल्या अर्धांगीकडं त्यांनीं थोड्या गर्वानंच पाहिलं.

तो छानदार माळ, चपलेसारखी घोडी आणि तो सुरम्य संध्यासमय ह्यामुळं ललितेला साहजिकच घोडीवर बसायची इच्छा झाली आणि तिनं तिचा लगाम हातांत धरलादेखील!

"नाहीं! नाहीं! बाईसाहेब! तुम्ही बसूं नका!" भयभीत होऊन जानकी म्हणाली.

"कां?" न उमजून ललितेनं विचारलं.

"दिवस गेले आहेत तुम्हांला! घोडीवर बसणं चांगलं नाहीं ह्या दिवसांत." आपल्या धन्याकडं एक जुनाट, मिस्किल कटाक्ष कसाबसा टाकित जानकी म्हणाली.

"नाहीं! नाहीं! मी बसणारच!"

लहान मुलासारखी ललिता म्हणाली.

" नाहीं ! नाहीं बसायचं तूं ! " इंद्रसेन म्हणाले, " बरोबर आहे जानकी तुझं म्हणणं. सूर्य खाली गेला. चला आतां घरीं. "

आणि हंसतखेळत ती वाड्याकडं परतली. जानकीचं आपल्याला ऐकावं लागलं ह्याबद्दल ललितेला मुळीसुद्धां कांहीं वाटलं नाहीं. खानदान माणसं अशींच असतात !

आणि अशा सुबत्तेंत महिने जात चालले. मोठमोठ्यांच्या तरुण स्त्रिया खूप मस्करी करायच्या ललितेची. " मुलगा कीं मुलगी ? " हाच काय तो वादग्रस्त प्रश्न राहिला होता आतां. सबंध जगतांत क्रांतिकारक वारे उसळले होते. महायुद्धाच्या समाप्तीनं जगाच्या नकाशाचे रंग फुलपाखरांपेक्षा द्रुत-गतीनं बदलत होते. देशांत अनेक राजकीय आणि सामाजिक आंदोलनं होत होतीं; पण ह्या वाड्याला चुकूनसुद्धां झळ नाहीं लागली ह्या महत्त्वपूर्ण उला-ढालींची. जुन्या सरदारशाहीचं जाड धुकं अजूनहि त्या वाड्याभोवतीं पसरलं होतं आणि आंतली मंडळी आपापल्याच ब्रह्मानंदांत मग्न होती.

आणि अशाच एका पहांटे, त्या सरदारशाहीच्या दाट धुक्याचा भेद करीत, एका अर्भकाच्या पहिल्या क्रंदनानं तिथली शांतता भंगली ! सूर्य प्रकर्षानं प्रकाशूं लागल्यासारखा वाटला आणि काळोख्या खोलींतून ललनांच्या खिदळण्याचा केवढा तरी गोड गोंगाट ऐकूं येऊं लागला ! बरोबरच आहे ! सरदारांना चांगलं सुंदर आणि गुटगुटीत पुत्ररत्न प्राप्त झालं होतं.

सरदार बेहद्द खूष झाले होते. ' चपले ' वरून त्यांनीं आनंदाच्या भरांत एक जोरदार रपेट मारली; परत येतांना मोराला चुचकारून पिसारा पसरवून नृत्य करण्यास विनविलं; पोपटाशीं गुजगोष्टी केल्या व आपल्या आवडत्या दौलतीच्या पाठीवर असा कांहीं एक धपाटा मारला, कीं त्याची चिलीमच बाहेर आली तत्क्षणीं ! जानकीच्या डोळ्यांत तर आनंदाश्रू तरंगले !

मुलाचं बारसं सहा महिन्यानीं व्हायचं होतं. मोठा जंगी समारंभ व्हायचा होता. साऱ्या गांवाला आमंत्रण होतं. वाड्यावर वरपासून खालपर्यंत रंगीबेरंगी पताका आणि माळा लावल्या होत्या. नोकराचाकरांची धांवपळ चालली होती.:मुदपाकखान्यांतून कळ्यांच्या तयार होत असलेल्या लाडवांचा आणि जिलबीचा सुवास दरवळत होता.

खास गवयाचं गाणं व्हायचं होतं. खाशा मंडळींकरितां एका नर्तकीचा नाच रात्रीं व्हायचा होता. जवळच्या शहरांतून चौघडेवाले आले होते. सोनं आणि चांदी, हिरे आणि पाचू, मोती आणि मिठाई, रेशमी आणि मखमली कपडे ह्यांचा खच जमला! आपल्या लेकराकडं पहाण्यांत ललिता इतकी गर्क झाली होती, कीं तिनं ढुंकूनहि पाहिलं नाहीं त्या जडजवाहिराकडं.

## तो दिवस उजाडला

पहांटेपासूनच धामधूम चालली होती. सनईच्या कर्णमधुर स्वरानं मनं प्रफुल्लित होत होतीं. उत्तमोत्तम सुवासानीं वेड लागल्यासारखं होई. पण बाळ मात्र झोपलं होतं शांतपणें. त्याला काय कल्पना ह्या धांदलीची?

सरदारसाहेबांनीं भरजरी शेरवाणी घातली होती. आकाशी मंदिल बांधला होता. रेशमी सुरवार व रत्नखचित चढावा चढविल्या होत्या त्यांनीं. खरोखरच ते अतिशय मोहक दिसत होते.

पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणं वाटोळ्या चेहऱ्याची ललिता, लक्ष्मीच्या लाजाळू तेजानं चमकत होती. बाळ मात्र उंची रेशमी वस्त्रांत गुंडाळलं होतं. त्याला काय कल्पना ह्या धांदलीची?

बायका येऊं लागल्या. त्यांनीं आंचण्या आणि कपडे आणले होते बाळाकरितां. सोनं, चांदी, रेशमाचे कपडे ...! मोत्यांच्या माळा होत्या, सोन्याच्या सांखळ्या होत्या, वाळे होते, सर्व कांहीं होतं. ललितेनं मोत्यांचा हार बाळाच्या गळ्यांत घातला. पण त्यामुळं तो लबाड बाळ मान खाजवूं लागला तोंड वाकडं करून!

खेळणीं तर किती तरी आलीं होतीं! कुत्रीं काय अन् मांजरं काय! गाड्या काय अन् विमानं काय! चेंडू किती, बॅटस् किती ह्यांचा पत्ताच नव्हता! दुसऱ्या एका सरदारीणबाईनीं तर सोन्याची तोफ करवून आणली होती व ती तिनं बाळाच्या कानाजवळ ठेविली! त्या तोफवाल्या बाईसाहेब दुसरीकडे पहात असतांना ललितेनं झटकन् ती तोफ दूर लोटली! न जाणो, उडाली तर?

इंद्रसेन बाहेर आदरातिथ्य करीत होते. गायन सुरू झालं होतं आणि कधीं ओढल्या नाहींत इतक्या उंची सिगारेटचा धूर सोडीत लोक श्रवण करीत होते. बाळानं मात्र आंत राहण्याला सुरवात केली होती मोठ्यानं!

खूप कपडे आणि पुष्कळशा बायकांची गर्दी ह्यामुळं जीव उबला होता बाळाचा ! बायका पाळणा गाऊं लागल्या. बाळ रडतच होतं मोठमोठ्यानं !

त्याच्यापुढं खेळणीं धरलीं. कुत्रीं, मांजरं, गाड्या, विमानं, चेंडू, बॅटस् – सर्व कांही आणलं. पण तें बाळ रडतच होतं मोठमोठ्यानं !

हिरे आणि मोती, सोनं आणि चांदी, मोत्यांचे हार आणि ती सोन्याची तोफसुद्धां त्याच्या नजरेसमोर धरली— पण छे ! जास्तच मोठ्यानं बाळ रडूं लागलं !

आंजारलं, गोंजारलं, सर्व कांहीं केलं; पण जास्तच मोठ्यानं बाळ रडूं लागलं !

तितक्यांत कुठूनतरी एका नव्या नोकराची बायको लाजतलाजत आंत आली. लंकेच्या पार्वतीसारखी होती ती. त्यामुळं अंग चोरून ती येत होती. झटकन् ती बाळाजवळ आली आणि–" बाईसाहेब ! हीच आमची गरिबाची तुमास्नी देनगी बरं का !" असं म्हणून तिनं बाळाच्या तोंडांत बोंडी कोंबली !

बाळ गप्प राहिला अगदीं !

★★★

# ८

## एक नवें संकट

आपल्या देशावर, माझ्या दृष्टीनं, एक नवं संकट येऊं घातलं आहे ! ह्या आपत्तीचं वर्णन संकट म्हणून करणं थोडें धाष्टर्याचेंच आहे. कारण बहुसंख्य समाज ह्या संकटाचं कदाचित् स्वागतच करील. नव्हे ! तसं भरघोस स्वागत झालंहि आहे. ह्या संकटाची व्याप्ति विश्वव्यापक आहे. पण माझ्या मतानं आपल्याला तें विशेष जड जाणार आहे ... तें म्हणजे टेलिव्हीजन् – दूरचित्रवाणी !

मार्कोनीसाहेबांनीं अनंताच्या पोकळींतून मानवी आवाज घुमविला ! कानांवर काळ्या ढापण्या लावून स्तिमित झालेला समाज, संगीतांत रंगून गेला. म्हैस शेपटीनं माशा हांकलते तशा त्या कानावरच्या ढापण्या त्वरित दूर भिरकावल्या गेल्या. रेडिओचं आगमन झालं ! आश्चर्याच्या सीमा वाढल्या ! ज्ञान अन् कला, रेडिओच्या चौकोनी संदुकींतून बाहेर झरूं लागली. ज्याच्या घरीं शेंपन्नास गुरंढोरं तो प्रतिष्ठित अशी आपली संपन्नतेची साधी-भोळी व्याख्या होती. कृषिप्रधान देशांत ती योग्यहि होती. त्यानंतर पालखी असणं, दाराशीं हत्ती झुलणं, अश्वरथ घरापाशीं खडखडणं हीं वैभवाचीं लक्षणं मानलीं गेलीं. रेडिओनं, ती मानाचीं जागा पटकावली. पुण्या-मुंबईतल्या घरांतसुद्धां रेडिओ जो बोकाळला तो जास्त करून गेल्या वीस वर्षांत ! रेडिओ सवंग झाल्यावर त्याचं मानाचं स्थान अर्थात् नष्ट झालं ?

दूरचित्रवाणी परदेशांत घुमूं लागली. घराघरांत शिरली. अमेरिका, सर्व पाश्चिमात्य देश व जपान ह्या देशांनीं दूरचित्रवाणीला बटीक बनविलं. आतां तर हें सर्व रंगीत झालंय्! छान! नुकतीच दूरचित्रवाणीचीं सोनपावलं दिल्ली-लाहि उमटली! अन् तेव्हांपासूनच मी ह्या प्रश्नावर विचार करूं लागलों!

दूरचित्रवाणीचे फायदे काय? रेडिओवरच पडदा असल्यामुळं गाणारी किंवा बोलणारी व्यक्ति समोर स्पष्ट दिसते. त्यामुळं कार्यक्रमास जिवंतपणा येतो. सबंध चित्रपट टेलिव्हीजन् स्क्रीन्वर दाखवितां येतो. नाटकं रसरशित होतात! नुसत्या आवाजानं वातावरण निर्माण होण्याची शक्यता कमी व त्याची मर्यादाहि अपुरीच! त्यापेक्षां नाटकं, प्रहसनं, एकांकिका, वगैरे सर्व ठसठशीतपणें समोर पाहतां आले तर घरबसल्या घवघवीत करमणूक होते. गायक, गायिका, कलावंत, थोर पुरुष हे आपल्या दिवाणखान्यांत हजर होऊन आपल्याशी गुजगोष्टी करतात. मोठमोठे डॉक्टर्स जी अत्यंत अवघड अशी ऑपरेशन्स करतात तीं शिकाऊ डॉक्टरांना ह्यामुळं प्रत्यक्ष पहातां येतात व त्यांचा अनुभव समृद्ध होतो. शैक्षणिक क्षेत्रांत टेलिव्हीजन्चा उपयोग फार उत्तम तऱ्हेनं होऊं शकतो असाहि कांहीं मंडळींचा दावा आहे! छान! उत्तम! फक्कड!

ही जर एवढी ज्ञानार्जनाची कामधेनु आहे तर मग मी तिची शेपटी उगाच कां बरं पिरगळीत आंहे? हा जर एवढा भरघोंस करमणुकीचा कल्पवृक्ष आहे तर ह्या लेखाची कुऱ्हाड मी जॉर्ज वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीप्रमाणं बेगुमानपणानं कां चालवित आहे? होय! कारण मला खोटं बोलायचं नाहीं म्हणून! निदान मला माझं स्पष्ट मत मांडायचं आहे म्हणून! तें चुकीचं असेल, त्यांत कांहीं तथ्यहि नसेल! पण तें काळच ठरवील.

लंडनजवळच व्हाईट सिटीला असलेला बी. बी. सी. चा प्रचंड टेलिव्हीजन् स्टुडिओ मी पाहिला आहे. ह्या स्टुडिओची इमारत इतकी भव्य आहे, कीं येणारा प्रथमदर्शनींच दिपून जावा! ॲपोलोचा झगमगता पुतळा प्रवेशदाराशीं टाकला आहे! चार सहा महिन्यानंतर होणाऱ्या नाटकाकरितां, एकांकिके-करितां व असल्याच कार्यक्रमाकरितां प्रचंड सेटस उभारले जात आहेत. कैक "दिवाणखाने" इथं खेळांतल्या "जिग् सॉ पझल्" सारखे ठेवले आहेत. शेंकडों लोक काम करीत आहेत. त्यांतला यांत्रिक भाग तर मला स्तिमित करून बसला आहे! शैक्षणिक विभागाच्या एका अधिकाऱ्यानं मला

रेकॉर्ड्स दाखविल्या मॅकबेथ् नाटकाच्या ! पहिल्या अंकांतील तें वादळ, त्या तीन जखिणीचं आगमन व त्यांच्या आगमनापूर्वी वातावरण–निर्मितीकरितां घेतलेले कित्येक सूचक असे अशुभ स्वर ह्यामुळं मलाहि आश्चर्यच वाटलं होतं !

वर्गावर्गांतून विद्यार्थ्यांपुढं ह्या तबकड्या वाजविल्या जात. त्यामुळं शब्दोच्चार कसे करावे ह्याचं शिक्षण त्यांना मिळे. टेलीव्हिजन्‌वर तेंच नाटक दाखविल्यावर छात्रांच्या अंतःपटावर तें नाटक हळुवारपणें जणूं कोरलंच जाई ! तात्या पंतोजीसारखं शिकवून, घसाफोड करून शिकविण्यापेक्षां ही पद्धत जास्त परिणामकारक असं त्यांचं म्हणणं !

ह्या संकटाची छाननी करणं मला वाटतं इथूनच सुलभ होईल. ह्या प्रकारच्या शिक्षणपद्धतींत निदान दोन तऱ्हेचीं मतें असणं शक्य आहे. एक वर्ग असं म्हणेल कीं वा ! मोठा क्रांतिकारक प्रयोग ! यामुळंच, ह्या टेलिव्हिजन्‌मुळंच आपल्या देशांत बृहस्पती निर्माण होतील. तात्यापंतोजी (PEDAGOGUES) डरकाळी फोडतील " छे ! हें थोतांड आहे ! जें शिकवायचं तें मेंदूंत भिनलं पाहिजे – व जें मेंदूंत भिनायला हवं त्याचं पाठांतर हें झालंच पाहिजे ! हें डबडं काय उपयोगाचं ? थेर आहेत झालं ! "

माझ्या मतें दोन्हीं दृष्टीकोन अतिरेकी आहेत. टेलिव्हिजन् गुरुजींना गचांडी देऊं शकणार नाहीं ! तसंच बालबालिकांनीं एखादं बालनाट्य, नाट्य किंवा जें शिकायचं असेल तें केव्हांतरी वर्गांत जादूच्या पडद्यावर पाहिलं तर तसं कांहीं फारसं बिघडणार नाहीं ! ह्या पहाण्यामुळं मात्र " अभ्यास " होईल हें मला मान्य नाहीं ! त्यांतल्या त्या तीन जखिणी मुलांच्या मनांत घोंघावत फिरतील पण लेडी मॅकबेथ्‌च्या स्वभावाचीं वैशिष्ट्यें लिहिण्यास सांगितलीं तर ह्या फॅशनेबल् शिकविण्याचा फारसा उपयोग होईल असं मला वाटत नाहीं. ह्याचाच अर्थ असा, कीं शैक्षणिक क्षेत्रांत टेलिव्हीजन्‌ला किती मान द्यायचा, ही पायांतली वहाण पायांतच कशी ठेवायची हें जर आमच्या इकडल्या शिक्षणतज्ज्ञांना वेळींच उमजलं नाहीं तर टेलिव्हीजन् हें एक संकट होऊं शकेल. त्याचप्रमाणं मोठमोठ्या शस्त्रक्रिया वगैरे पाहणं हे ज्ञानबुद्धीचे अनुभवसुद्धां दुर्मिळच आहेत. सर्वांत जो धोका आहे अन् ज्यामुळं मी हें संकट आहे असं म्हणतो त्याचीं कारणं पुढंच आहेत.

पाश्चिमात्य देशांत टेलिव्हीजन्नें कांहीं बिकट अशा सामाजिक समस्या निर्माण केल्या आहेत. टेलिव्हीजनवर होणारे बरेचसे कार्यक्रम "हे मार-कर धमाल" ह्या तऱ्हेचे असतात. खून, मारामाऱ्या, घरफोड्या, रक्तपात, क्रौर्य, गुन्हेगार, पिस्तुलांच्या बारांची बेसुमार आतषबाजी, विद्युत् वेगाच्या घोडदौडी, उत्तान भडक प्रणय हेच विषय बहुतांशीं त्या जादूच्या पडद्यावर थैमान घालीत असतात. दिवाणखान्यांतले दिवे मालवून कोंवळ्या वयाचीं पोरं नि पोरी आपापलीं अभ्यासाचीं पुस्तकं हातांत मिटून-घाऱ्या, निळ्या-डोळ्यांनीं ती पडद्यावरची हिंसा सतत पहात असतात. हिंसात्मकवृत्ति त्यामुळं चेतविल्या जातात. पिस्तुलानं कुणाचा तरी खून करावा, बँका फोडाव्या अशी घातूक शिरशिरी कोवळ्या देहांत शिरशिरते, अशीच बेलगाम प्रवृत्ति कुठंकुठं बळावते, थोडक्यांत म्हणजे गुन्हेगारी वृत्तीचं पोषण इतकेंच नव्हे तर ती उत्तेजित केली जाते. भयंकर गुन्हेगाराविषयीं अनुकंपा निर्माण करण्याचाहि खटाटोप कुठंकुठं केला जातो व एक सबंध तरुण पिढीच्या पिढी, हा जादूचा पडदा, बरबाद करण्यास सरसावतो! सरसावलेला आहेच!

ह्यामध्यें तथ्य आहे व हें एक हृदयविदारक सत्य आहे. अभ्यासांतलं लक्ष उडून मुलं नि मुली टेलिव्हिजन्वर दृष्टि खिळवून बसतात. ह्या घातक पडद्यावर ज्या चोऱ्या व घरफोडया वगैरे दाखवितात त्याचीच सहीसही नक्कल करून कांहीं खरेखुरे दरोडेखोर दरोडे घालतात ही ह्या पडद्याची काळी बाजू!

पण इथं ह्या मंडळींच्या दुःखांत एक तरी समाधान आहे. पाश्चिमात्य देशांतल्या जनतेचे बहुतेक प्रश्न सुटलेले आहेत. बेकारी, दारिद्य, राहण्यास घरं, वृद्धावस्थेंत सर्वांना पेन्शन, मोफत औषधं वगैरे बहुतेक ठिकाणीं उपलब्ध असल्यामुळं त्यांची कींव करण्याची आपल्याला मुळींच गरज नाहीं. प्रश्न आहे तो हाच कीं, आपल्यासारख्यांच्या गरीब देशांत निर्माण होणारा फ्रँकेन्स्टाईन् आपण आवरूं शकूं का? माझं उत्तर नाहीं असं आहे.

आधींच रेडिओचा सावत्र भाऊ ट्रॅन्झीस्टरनं आपल्याकडं धमाल उडवून दिली आहे. देशाच्या वाढत्या क्रयशक्तीबरोबर रेडिओचं लोण खेडोंपाडी पोंचणार आहे. वाढत्या विद्युत निर्मितीमुळं, चित्रपटगृहाचा रुपेरी पडदा तालुक्यातालुक्यांत बोलणार आहे, गाणार आहे, किंचाळणार आहे, रडणार आहे! वाह्यातपणें खदखदां हंसणार आहे. पाश्चिमात्य देशांतली संपन्नता

नि समृद्धि इथं नाहीं. तेव्हां रेडिओ, ट्रॅन्झीस्टर्स, चित्रपट, कामुक वाङ्मय व झालीच तर शहरशहरांतून प्रथम सुरू होणारी टेलिव्हीजन् केंद्रें ( दिल्लीला एक मर्यादित केन्द्र आहेच ) हीं सर्व हिंदुस्थानच्या भाबडया, भोळ्या, गरीब जनतेला एकदम पचण्यासारखी नाहींत.

चटोर चित्रपट व सवंग सिनेसंगीतामुळं शहरांतली जनता आर्धीच हैराण झाली आहे. त्यांत हा जादूचा पडदा आला कीं मग बघायला नको! पाश्चिमात्य देशांत ज्या समस्या उभ्या राहिल्या आहेत त्या आपल्याकडं फारच झटकन् निर्माण होतील. आपल्याकडं जें जें वाईट त्याचा प्रसार तर वाऱ्यासारखा होतो! आपल्याकडं गुन्हेगारी भयंकर प्रमाणांत वाढण्याची शक्यता आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी फ्रान्स् जसा अगदीं पोखरून निघाला होता तीच अवस्था आपल्याकडं फार मोठ्या प्रमाणावर होण्याची अगदीं दाट शक्यता आहे!

दूरवाणी चित्रपटाचा मायावी पडदा, डॉक्टर् जेकील्-हाईड्सारखा आहे. अणुसारखाच हा पडदा! नीट वापरला तर ठीक! नाहीं तर अणुस्फोट जसा विश्वसंहार करूं शकेल तसंच हें इन्द्रजाल समाजजीवनाला साफ गुरफटून टाकील. जीव कोंडवून तें नष्ट करण्याची ताकद त्यांत आहे असं मला वाटतं!

फार श्रम न करतां सुखासीन आयुष्य काढण्याची आहल्याकडे प्रवृत्ति आहे. आपण एका अर्थानं एक बैठं राष्ट्र आहोंत. आपली संस्कृति एका अर्थानं बैठकप्रधान आहे. बसावला बैठक, गाण्याला बैठक, वधूपरीक्षेलाहि बैठकच! तेव्हां ह्या बैठकप्रधान देशांत मायावी पडदा घुसला तर आपला बैठकप्रधान समाज त्यावर आपला जीव ओंवाळून टाकील. त्याच्या संपूर्ण आहारीं जाईल! कदाचित् कुणाला हें अतिरंजित वाटण्याचा संभव आहे! पण नाहीं! माझ्या दृष्टीनं हें केवळ एक राष्ट्रीय संकटच नाहीं; ही प्रलयाची नांदीच आहे!

उपलब्ध करून देण्याची दुकानदारांची धडपड चाललेली आहे. कारखानदार धडाक्यानें विविध प्रकारच्या लोणच्यांचें उत्पादन करीत आहेत. त्याची आकर्षक 'पॅकींग्ज' बाजारांत येत आहेत आणि जाहिरातदार सदोदित प्रचार करीत आहेत कीं —

"अमेरिकन बांधवांनों, सदोदित सतेज, टवटवीत व रोगमुक्त रहाण्यासाठीं लोणचें खा लोणचें

* * *

# १ शब्दरंजन !

माझं गूढगुंजन बहुतेक शब्दरंजनाभंवतीच असतं ! असंख्य मुखांतून सामान्य शब्द अहोरात्र उमटतात. त्यांच्या छटा नकळतच वेगवेगळ्या उमटतात. त्या छटांशीं पाठशिवणीचा खेळ खेळणं हा एक रम्य उपक्रम आहे !

" अमुक काव्य कसं काय वाटलं बुवा ? " ह्या प्रश्नांचीं उत्तरं सहा व्यक्ति वेगवेगळ्या शब्दांत व्यक्त करतात—

" कवीनं कमाल केलीय् बुवा ? "

" भावमधुर आहे ! "

" अतिशय गोड आहे ! "

" लाजवा ऽऽऽ ब ! "

" ती कविता म्हणजे अमृतानुभव ! "

" सालं टॉप् आहे रे ऽऽऽ ! "

ह्या सहा प्रतिक्रियांचं मनोविश्लेषण करणं कदाचित् मनोरंजक ठरेल !

" कमाल केलीय् बुवा " हा त्यांतला जाणता ! वय चाळीस ते पन्नासच्या आंत. कानावरचे केंस पिकायला लागले, मुलगी वयांत आली, तरी ह्याचा हिरवटपणा नि रसिकता व्यस्त प्रमाणांत बहरूं लागली आहे.

नाटकांचा अवनतीचा काळ, बेचाळीसचा लढा, स्वातंत्र्यप्राप्ति ह्यानं जाणतेपणीं अनुभविली आहे. रंगमंचावरचं बरंचसं पाहून, सोईच्या सलगीनं मग हा म्हणतो " कमाल केलीय् बुवा ! "

'अतिशय गोड', हे भावमधुर शब्द दहावीपर्यंत शिकलेल्या पत्नीचे शब्द ! यजमानांचे माधव ज्यूलिअन् लाडके होते; म्हणून त्यांनीं भावमधुर शब्द योजिला. मागल्याच आठवड्यांत मंदा गोखलेच्या लग्नांत बुंदीचे लाडू वाजवीपेक्षां गोड झाले होते, म्हणून 'अतिशय गोड' शब्द 'भावमधुरच्या' पत्नीला झटकन् आठवले ! काव्य भावमधुर आहे अन् अतिशय गोड आहे. आपण वेध घेत आहोंत ह्या वेगवेगळ्या प्रतिक्रियांचा !

'लाजवा ऽ ऽ ब' वाला अन् 'सालं टॉपू, आहे' हे तिशीच्या ब-याच आंतले आहेत. तो शब्द हिंदी चित्रपटांतून त्यानीं उचलला आहे. आपण त्या चंदेरी दुनियेशीं रममाण झालों आहोंत हें भासविण्याकरितांच कीं काय, तो एखाद्या अवखळ मित्राशीं थट्टामस्करी करतांना मधूनच किंचाळतो " मी मानतो — आपल्याला मी मानतो ऽ ऽ ऽ " !

टॉप् आहे—हें कारटं स्त्रैण आहे. ह्याचा जन्म बेचाळीसच्या क्रांती-नंतरचा. त्याला दुसरा शब्दच येत नाहीं. पॅंट्चं कापड टॉप् आहे. " जगाच्या पाठीवर " टॉप् आहे. रजनी जोशी टॉप् आहे अन् गीतरामायण पण टॉप् आहे. अशा नालायक संततीला घोड्यांच्या टापाखालीं चेचावं असं कधीं कधीं वाटतं !

" ती कविता म्हणजे अमृतानुभव " हें सांगणारा खरा गंभीर रसिक ! त्याची व कवीची ओळख नाहीं. पण तो हिरीरीनं त्याचा पुरस्कार करील. अरसिक कुटुंबीय त्याची ह्या फाजिल उत्साहाची चेष्टा करीत असतील; पण त्याची ह्याला पर्वा नाहीं !

दृश्य किंवा श्राव्य असं जें कांहीं आहे त्याच्याविषयीची प्रतिक्रिया व्यक्तिव्यक्तीच्या आकलनशक्तीवर अवलंबून असल्यामुळं त्याविषयींचे निष्कर्ष भिन्नभिन्न असतात. आपण आपल्या डोळ्यांनीं हें ब्रह्म पहातो. आपण त्याचा अर्थ आपल्या बौद्धिक मगदुराप्रमाणं लावून सांगायचा प्रयत्न करतो व ते स्पष्टीकरण करीत असतात. शब्दांची गल्लत केल्यामुळं मूळचाच अपुरा व भ्रममूलक अर्थ, आपण जो लावलेला असतो, त्यांत आणखी गोंधळ माजवून टाकतो !

पण ब्रह्माकलन वगैरे गोष्टीं आपल्या सर्वांच्या आवाक्याबाहेरच्या ! त्यांची चर्चाच कशाला ? सामान्य उदाहरण घेऊं !

" रंजना पोरकट आहे "

" रंजना अल्लड बालिकेसारखी खेळकर आहे. "

" रंजना स्पोर्ट् आहे. "

ह्यांतील पोरकट रंजना आपल्या मनांत आदर निर्माण करूं शकत नाहीं. ही अर्धवट मुलगी संसाराला निरुपयोगी असलीच पाहिजे असं मन सांगतं; पण जेव्हां ती " अल्लड बालिकेसारखी खेळकर " होते, तेव्हां मराठी चित्रपटांत माळावर धांवून, उड्या मारीत बागडत नायिका जें भावगीत गाते त्या दृश्याची आपल्याला आठवण होण्याची शक्यता असते. औरंगजेबानं अशाच एका आपल्या जवळच्या नातेवाईकाच्या बालिकेसारख्या खेळकर पत्नीला आम्रवृक्षावरच्या लोंबत्या आंब्यांवर उडी घेतांना चोरून पाहिलं होतं अन् मग काय ! शहानशहानीं तिला पैदा केलीच ! वाद्यसंगीताला व संगीताला अक्षरशः मूठमाती देणारा एवढा करारी बादशहा जर ह्या असल्या अल्लड बालिकेसारख्या खेळकर असणाऱ्या विभ्रमानं घायाळ होतो, तर सामान्य जनांची काय कथा !

पण रंजना " स्पोर्ट् " आहे ही पुढची पायरी ! पहिलं म्हणजे बॅडमिंटन् व टेबल्टेनीस् यांत निष्णात् ! तिच्या मोकळ्या वागण्याचा लोक भलताच अर्थ घेतात. तें तिच्या कानांवर येतं; पण ती फारशी पर्वा करीत नाहीं ! वडील ज्ञानेश्वरी वाचतात. आई कांहींच वाचीत नाहीं–सारखी डाळ निवडते. रंजना इथं लाडावलेली आहे, निष्पाप आहे, तरी पण बघणारांची नजर आहे वाईट !

पाहिलंत ? पोरकट्, अल्लड नि खेळकर आणि स्पोर्ट् ह्या विशेषणांमुळं किती विशेष फरक पडतो तो !

श्रीमंत हा शब्द घ्या. हैदराबादचा निझाम फार श्रीमंत आहे...फार म्हणजे काय अफाट श्रीमंत आहे. आतां रामदासस्वामींचा शिवछत्रपति वर्णनांतला तोच शब्द निरखा–निश्चयाचा महामेरू। बहुतजनांसी आधारू। अखंडस्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी ॥

शब्द कसा सोन्याच्या मोहरांसारखा ठणठणला ! पण जेव्हां शब्द पार पालटायचा असेल तेव्हां आपले सर्वश्रेष्ठ संत त्याला अशी थप्पडदे ऊन चूप बसवितात कीं, आपण चकितच होतों. ज्ञानोबांचं आकाशाचं वर्णन असं:—

" व्यापक आणि **उदास** ! "

ढगाळलेलं, गढुळलेलं, सुस्तावलेलं असे कितीतरी शब्द पर्यायाकरितां सुचविले तरी उदास आकाश तें उदास आकाशच !

योगसिद्ध पुरुषाच्या तेजःपुंज देहाचं वर्णन ज्ञानोबांनीं एका ओवींत असं केलंय् ...

" कीं हा **कनकचंपकाचा** मळा. "

केवढा गहन अर्थ सांठविला ! आधुनिक शब्दांच्या " मांदियाळीनं " जें जमत नाहीं, तें सात अक्षरांत !

**बरे** आणि **विशेष** हे शब्द तर आपले अगदींच सामान्य ! त्यांत विशेष असं कांहींच नाहीं; पण रामदासस्वामींनीं त्यांनाहि सरस्वतीच्या सिंहासनावर मानानं बसविलंय !

**बरे** ईश्वर आहे साभिमानी ।
**विशेष** तुळजाभवानी ॥

हें शब्दरंजन तर लोकोत्तर आहे. तो एक शब्दरंजनाचा अथांग महासागर आहे.

शब्दांच्या मागं आपापली अनुभूति असते. ही अनुभूति वेगवेगळी व त्याची उत्कटता कमी किंवा अधिक तीव्र असल्यामुळं शब्दांची प्रतिक्रिया अगदींच वेगळी होऊं शकते.

बालगंधर्व एखादी उत्तम चीज आळवीत आहेत. संगीतशास्त्राचे जाणकार त्या चीजेमधलं मर्म समजून मानेचा देतील तो ठेका, संगीताची फक्त चाहूलच आहे असा कच्चा रसिक व त्याचा ठेका, कांहींच कळत नसून अदमासांनीं योग्य ठेका ( जाणत्यांच्या मानांकडं लक्ष ठेऊन ) देणारा भोंदू रसिक व कॉफी करीत असतांना स्टोव्हच्या भॉऽऽऽ मधून येणाऱ्या सुरावटीचा कांहींच परिणाम न होणारा स्थितप्रज्ञ वासुभट हें एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण म्हणून देतां येईल.

ऐन उत्कर्षाच्या काळांत नारायणरावांनीं रंगभूमि कशी गाजविली ही अनुभूति त्या रात्रींच्या रंगलेल्या बैठकींत हजर असलेल्यानां ताजी आहेच. त्या वेळीं " लाजवाऽऽब " अन् " टॉप्‌वाला " यांचा जन्म देखील झाला नव्हता. तेव्हां स्वाभाविकपणें परिणाम अन् परिपाक भिन्न भिन्न !

पण एवढा शास्त्रीय ऊहापोह कशाला ! एखादा पेडर् रोड्वरचा धनाढ्य व्यापारी, दादरला रहाणारा एक कारकून व धारावीला रहाणारा एखादा गिरणी कामगार हे जेव्हां दिवाळीच्या दिवशीं म्हणतात कीं, "आज जेवण फार झालं बुवा !" तेव्हां ह्या एकाच वाक्याच्या पोटांत केवढी प्रचंड तफावत सामावलेली आहे ?

पेडर रोडवर मिठाईच्या पेट्या येताहेत, त्या कुत्रा देखील अक्षरशः खात नाहीं ! (मालकाला शिवाय मधुमेह आहेच !) दादरच्या कारकुनाची बायको बाळंतपणाला गेली आहे, जांवईबापू सासरीं जेवायला जायचे आहेत. एऱ्हवीं ज्याला कोण काळा कुत्रा विचारित नाहीं तो हा सासरीं भलत्याच उर्मटपणें जाणार आहे ! मग हा होतो भाईसाहेब ! केवढा त्याला आग्रह ! (ऑफिस-मध्यें हा दुसऱ्याचा चहा, नाहीं तर बशींतलं भजं लांबविण्यांत तरबेज !) धारावीच्या गिरणीकामगारानं जयस्वाल डेरी फार्ममधून लालभडक जिलब्या चिक्कार आणल्या आहेत. त्या आज त्यांनीं दणकून खाल्या. घरच्या सर्वांनीं खाल्ल्या. सर्व आजारी पडायला अजून आठ दिवस अवकाश आहे !

हें झालं तीन घरचं "आज जेवण फार झालं बुवा ?" प्रकरण. पण यांत शब्दांचा दोष नाहीं. दोष आहे सामाजिक परिस्थितीचा. पण कांहीं शब्द फार लुचे नि पळपुटे असतात. कांहीं शब्द आपल्याबरोबर पाप किंवा पुण्य, सदिच्छा किंवा शाप घेऊनच येतात.

लग्न, मुंज, बारसं, सत्यनारायणाची पूजा, ग्रहशांति वगैरे शब्द मंगलदायक व शुचिर्भूत असतात व कालांतरानं होतात. बारावं, तेरावं, श्राद्ध, पिंड, कावळा ह्या सर्वांना स्मशानभूमींतला वासच येतो !

पास् शब्दांत पेढे नि नापास शब्दांत कोपऱ्यांतले अश्रूच असतात !

पण 'राणी' हा शब्द घ्या. मोठा लबाड ! एखाद्या देशाची राणी, बदामची राणी अन् पेशवे पार्कमधील फुलराणी, या सर्वांत केवढा फरक ! फरक कसला ! कशांतच कसलं साम्य नाहीं !

ईजिप्तचा पदच्युत राजा, इस्पिकचा राजा अन् राजा परांजपे ! हा राजा शब्दहि राणीच्याच मागावर !

घटना हा शब्द निसरड्या कदाचा ! भारताची घटना, एखाद्या गुलहौसी क्लबची घटना अन् अहोरात्र घडणाऱ्या कोट्यवधि घटना !

शब्दब्रह्मांडांत कांहीं जंटलमन् डाकूहि आहेतच. पाहीन् ! बघूं मग ! विचार करीन ! चौकशी करीन ! चौकशी करून कळवितों ! टेलिफोन् करीन ! थांबा कांहीं दिवस ! सध्यां नाहीं, जरा धीरानं घ्या, हे सर्व शब्द म्हणजे सरळ मानवतेच्या गळयाला लागलेले शिष्टसंमत फांस आहेत. स्वच्छ नाहीं सांगण्याचं मनोधैर्य नाहीं, खरं बोलून वाईटपणा घ्यायची तयारी नाहीं, तेव्हां यापैकीं प्रसंगानुसार योग्य असं क्षेपणास्त्र उपसायचं अन् त्या गरीब गरजूला नागरी खोटं हास्य बहाल करून साफ गंडवायचं काम हें जंटलमन् डाकू शब्द करीत असतात.

**अय्या ! आणि इश्श्य !**

प्राध्यापक कृ. पां. कुलकर्णी यांनीं आपल्या बहुमोल ग्रंथांत ह्या दोन शब्दांची व्युत्पत्ति दिली कीं नाहीं कुणास कळे ! एवढं मात्र खरं कीं, कौमार्यावस्थेंत जर या दोन शब्दांचा सर्रास उपयोग होत असला तर एवढंच समजायचं कीं, वेळींअवेळीं ते उच्चारणाऱ्या कुमारिकेचं लग्न आतां एवढ्यांत होणार आहे. जमलं नसतं तर करणं फारच आवश्यक आहे ! यावर कुणी विचारतील ( इतिचेत् ! ) कीं, विवाहित स्त्रिया हे शब्द वापरीत नाहींत का ? जरूर वापरतात. पण संदर्भ किती वेगळा !

अधीर झालेला सुधीर त्या खेळकर रंजनाचा हात धरतो तेव्हां प्रथम ‘ अय्या ! ’ नि मग ‘ इश्श ! ’ लग्न झाल्यावर जीवन बदलतं ! संसाराच्या रुक्ष जबाबदाऱ्या येतात आणि सुधीरनं घरीं काम करण्याकरितां आणलेले कचेरींतले कागद रंजना जेव्हां कांहीं वेगळयाच अपेक्षेनं उघडते अन् जेव्हां तिला आंत नव्या साडीऐवजीं आंखलेले कागद दिसतात तेव्हां मुखांतून येणारे ‘ अय्या ऽ ऽ नि इश्श ऽ ऽ ’ किती भिन्न–किती किती भिन्न !

“ मेला ” हा खास बायकी शब्द आहे. ज्याच्यावर प्राणापलीकडं प्रेम करते त्या सतावणाऱ्या मुलाला “ मेला,” भांडीं घासायला उशीर करणाऱ्या घरगड्याला “ मेला, ” कपडे फाडणाऱ्या धोब्यास “ मेला, ” रद्दी वजनांत कमी दाखवून कमी पैसे देणारा रद्दीवाला “ मेला ”–असे अनेक लोक स्त्रिया नेहमीं मारत असतात. त्या संदर्भात ‘ मेला ’ ह्याचा अर्थ आटपला असा घ्यायचा नसून अर्थात संदर्भाप्रमाणं घ्यायचा असतो. जसं मुलाच्या बाबतींत. मेला म्हणजे लेकाचा ! घरगड्यासंबंधीं मेला म्हणजे भटक्या कुठला !

धोब्याच्या बाबतींत मेला म्हणजे जवळजवळ मेलाच किंवा मरावाच ! रद्दी-वाला धोब्याप्रमाणंच !

शाळा कॉलेजांतल्या विद्यार्थी विद्यार्थिनींचं शब्दभांडार एक आगळंच असतं ! कंडा, लईन् मारणं हे शब्दप्रयोग गेल्या दहा वर्षांतले आहेत. टक्कल पडलेल्या माणसाला टयूबलाईट म्हणणं .... बरोबरच जन्म पावला. म्हणजे जसजशी आधिभौतिक सुधारणा होऊन नवनवीन उपकरणं आपण वापरूं लागूं, तस तशी टिंगलीची शब्दसंपत्ति त्यांचा आधार घेऊन वात्रट विनोद-निर्मिति करते.

शब्द राष्ट्र घडवितात. ज्या देशाची शब्दसंपत्ति अफाट तो देश सांस्कृतिक दृष्टया आघाडीवर. ज्या देशाचा शब्दकोश मोठा, तो देश मोठा ! आपल्या महासंपन्न मायबोलींत यांत्रिक युगाचे शब्द आले पाहिजेत व ते सर्वांच्या तोंडीं रुळले पाहिजेत. एक महाभव्य असा शब्दरंजनाचा नि शब्दभंजनाचा कार्यक्रम आयोजिला पाहिजे. भाषा लवचिक ठेऊन इतर भाषांतले शब्द आत्मसात् केले पाहिजेत. पुन्हा एकदां अमृतातेंही पैज जिंकायला हवी !

* * *

१०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 38000 दिः
क्रमांक 9५८८ नों दि: १०।८।७५

# तिला चुकवा नि जीव वांचवा !

तिनं मला ढकललं! चांगलंच आदळलं! सपशेल आपटी तिनं मला खायला लावली होती! तिनं मला भुईसपाट केला होता! तेवढ्यानं तिचं समाधान झालं नव्हतं म्हणूनच कीं काय माझ्या तंगड्यांची अवस्था तिनं जवळजवळ जरासंधासारखी केलीन्! वस्त्रहरणानंतर द्रौपदी जशी भूईवर फरफटली गेली होती अगदीं तशीच तिनं माझी अवस्था केली!

दिवस दिपावलीचा होता-महन्मंगल होता! पण नरकासुराऐवजीं माझा वध होणार होता! साल १९६०! लंडन्मधला शिशिर तसा कडवाच! धूसर हवेंतून लख्ख सोनेरी तांबूस किरण त्या बलाढ्य राजधानीची शान झगमगवित होते. दमदार पावलं टाकतांना अनुपमेय सौख्य वाटत होतं. पायांना स्प्रिंग्ज लावल्यासारख्या मला भासत होत्या! बॉण्ड् स्ट्रीट्वरून मी झपझप चाललों होतो!

मन घराकडं झेंपावत होतं! इथून फार, फार दूर होतं तें! घरीं पणत्या लावल्या असतील. कंदील हिंदकळत असेल! पणत्या पडणार तर नाहींत ना?

समोरच्या स्टोअर्मध्यें मी एकाएकी शिरलो.

“मेणबत्त्या हव्यात!”

“किती?”

" डझन् "

" ठीक ! "

" थँक् यू ! "

आंग्ल युवतीनं झपझप पार्सल् बांधलं. तें पुडक घेऊन मी घरीं आलों अर्हर्स् कोर्ट, साहेबी दिमाखानं टुमकत होतं. पण दिवाळीची जाणीव कशी कुणाला असणार ? अर्हर्स् कोर्ट, म्हणजे रसेल् स्वेअर नव्हे !

माझ्या खोलींत येतांच मी दोन मेणबत्त्या लावल्या ! दिवे बंद केले. मेणबत्त्यांच्या सोनेरी मंद प्रकाशांत माझं खरंखुरं घर स्पष्ट होऊं लागलं ! देवाची प्रतिमा जवळ नव्हती. कधीं नाहीं इतकं हिंदुत्व उफाळून आलं ! एअर् इंडिआच्या टाईम्-टेबल्वर गणपतीबाप्पाचं चित्र होत. तें टाईम्-टेबलच समोर ठेवलं ! त्याच्या बाजूला त्या मेणबत्त्या लावल्या. कां कुणास ठाऊक ? मन अगदीं प्रसन्न झालं ! साहेबांच्या देशांत धार्मिक आक्रमण केल्याचा आनंदहि झाला ! पणत्यांचं मांगल्य मेणबत्तींत सामावलं.

किती तरी वेळ मी त्या गणपतीच्या चित्राकडं टक लावून पहात होतों. काल्पनिक करंज्या, लाडू, चकल्या, शेव, हरतऱ्हेची मिठाई माझ्याभोंवती पिंगा घालूं लागली ! खाज्याच्या करंजा मी कधींच खात नाहीं ! चांगल्या सामानाचा नाश केला कीं चांगली खाज्याची करंजी निर्माण होते असं एक समीकरण माझ्या मनानं करून ठेवलं आहे !

हा प्रकार कढईतनं काढल्याबरोबर एकदांच खाण्यासारखा असतो, अशी माझी धारणा आहे. पण मनाचे व्यापार किती गुंतागुंतीचे ? त्या करंज्याच खायला मन आतां आसुसलं ! मला दिवाळीला कांहीं पाठवूं नका असं मी घरीं चक्क निक्षून सांगितलं होतं ! त्यामुळं इकडं पार्सल् आलं नव्हतं ! बुंदीचे लाडू मला लडिवाळपणें टिचक्याच मारूं लागले, चकल्या मला खिजवूं लागल्या ! शेव मला गुदगुल्या करूं लागली ! चिवडा ! हाय ! चिवडा खावा तर एस. टी. च्या आमच्या नाडकर्णींच्या घरचाच ! त्या चिवड्याची विशिष्ट खुमारी आठवून हैराण झालों !

झपझप कपडे घालून बाहेर पडलों. सात वाजले ! घरीं कणा काढला असेल ! ठिपक्यांचं कासव ! बाजूला चंद्रसूर्य ! फटाक्यांचा धूमधडाका चालला असेल- ! मी नसल्यामुळं घरावर एक पुसट दुःखाची छाया पसरली असेल ! खूप असतील त्या फक्त माझ्या नावडत्या खाज्याच्या करंज्या !

बसचा स्टॉप् पंधरा वीस फुटावर असेल ! मी धांवलो ! विरुद्ध दिशेनं बस् धांवली. अन् मित्रहो ! मी करूं नये ते केलं, धांवत्या गाडींत उडी मारली !

बसच्या फुटबोर्डावर तेल सांडलेलं होतं. मी उडीही विरुद्ध दिशेनं मारली होती. त्यामुळं पाय असा सरकला — असा सरकला कीं मी धाडकन् बसमध्येंच कोसळलों !

पण कोसळूनच भागलं नाहीं. पळती बस् वळणावर एका बाजूला कलली होती. एक पाय बाहेर फरफटत होता. माझं अर्ध अंगच बाहेर लोंबकळत होतं. माझी ती अवस्था पाहून एक अंग्रेज वृद्धा किंचाळलीच. बस्मध्यें फक्त चारसहाच उतारू होते. स्त्री-कंडक्टर इतकी घाबरून गेली होती कीं घंटी मारण्याचं तिला भानच राहिलं नाहीं ! अंग्रेज झाली तरी बिचारी स्त्रीच ना !

पडल्यापडल्याच मी रस्त्यावर पाहिलं ! एक भला मोठा ट्रक माझ्या देहाच्या रोखानं येत होता. कांहीं सेकंदांतच माझ्या देहाची खाज्याची करंजी झाली असती ! इतक्यांत एका गोऱ्या माणसानं मला गपकन् उचललं. पॅट् मांडीवर फाटली होती. माझ्या मुद्रेचा तेल्या मारुती झाला अंग ठणकत होत. मी जेमतेम उभा राहिलो ! त्या बिचाऱ्या अनोळखी माणसानं मला मृत्यूच्या दाढेंतून अक्षरशः ओढून काढलं होतं !

"थँक यूऽऽ थँक यूऽऽ व्हेरी मच् " मी अगदीं कृतज्ञतेनं म्हणालो. पण तो होता कुठं ? मला उचलणारा तो धिप्पाड इसम तेवढ्यांत कुठं गडप झाला हें मला आजवर एक न उकललेलं कोडं आहे !

मग त्या वृद्धेनं मला चार शब्द सुनावले !

'रॅश्...रॅश् ! व्हेरी, व्हेरी रॅश् ! असं पुन्हां नको करूस हं ! देव दयाळू ! त्यानं तुला वाचविलं ! नाहींतर... ! हे बघ ! आयुष्य आपल्याला एकदांच मिळतं ! तें काय बस्खालीं चिरडून घेण्याकरतां काय ? पुन्हां असं करूं नकोस ! तिला चुकव नि जीव वांचव ! पुन्हां असं नकोस रे करूं ! "

त्या वृद्धेचे आभार मानून मी तडक घरीं परतलो. पुन्हां मेणबत्त्या लावल्या, दिवे विझविले. गणपतीला – विघ्नहर्त्या गणपतीला, साश्रुनयनांनं त्य मंद प्रकाशांत मी भक्तिभावानं नमस्कार केला !

★★★

## ११

# कलावंतांची उपेक्षा !

कला म्हणजे काय ? कला कीं जीवन ? कलेचीं अंगं नि उपांगं कोणतीं ? कलावंत कोण ? कलावंत आणि समाज ह्यांचीं नातीं काय प्रकारचीं असावीं ? ह्यांची आणि ह्यालाच अनुसरून चर्चा करण्याचा छंद साहित्यिकांना असणं साहजिकच आहे. परंतु नाना क्षेत्रांतील कलावंत आणि त्यांची होणारी उपेक्षा ह्यांवर मात्र खुद्द कलावंतदेखील जास्त बोलत नाहीतह्याचं मात्र मला राहून राहून आश्चर्य वाटतं. कलावंतांची उपेक्षा ही व्हायचीच, अशी एक सर्वसाधारण समजूत होऊन बसली आहे कीं काय कुणास ठाऊक! कदाचित् जीवनाची व्यवहार्य बाजू प्रकटपणें मांडण्याची कुणाकुणाला लाज वाटत असावी. साहित्यिक आणि कलावंत म्हणजे जातीनं भारी हळवा प्राणी; साऱ्या जगाला रिझविण्याची आणि रंजविण्याची त्याला काळजी ! ह्या जगड्व्याळ खटाटोपांत हा स्वतःचा स्वार्थ मात्र कलावंत असल्यामुळंच जणु काय विसरून जातो. कला वंत हा दरिद्रीच राहावा असं स्पष्टपणं बोलून दाखविण्यापर्यंतहि कांहीं रसिकांची आणि खुद्द कलावंतांचीदेखील मजल पोचलेली असते !

निष्कांचन कलावंत केवळ जगण्याकरितां जी प्राणांतिक झुंज देतो व ही झुंज देत असतांना त्याला साऱ्या जगाचा जो अत्यंत कटु असा अनुभव येतो, त्या अनुभव–भांडारांतूनच जिवंत साहित्याला आणि कलेच्या इतर

उपांगांना आपापलं ज्वलंत स्वरूप प्रकट करायला संधि मिळते. बिकट परिस्थितींतून निर्माण झालेली कला हीच सर्वोत्कृष्ट असण्याचा संभव जास्त, अशी सर्वसाधारण समजूत असते व अशी अभिजात कला निर्माण व्हायची तर कलावंत हा सुदामाचा वंशजच कायमचा राहिला पाहिजे हें ओघानंच आलं. मला हें पटत नाहीं ! उपाशी कलावंत उत्कृष्ट कलाकृति जगाला अर्पण करूं शकेलच असं कांहीं सांगतां येत नाहीं. कलावंत हा प्रथम कलावंतच हवा ! तो श्रीमंत की दरिद्री हा गौण प्रश्न आहे. त्याची वैचारिक घडण त्याच्या कलाकृतींत परिस्थित्यनुसार योग्य असे फेरबदल दाखवीलसुद्धां; पण केवळ कालावंताच्या सामाजिक दर्जावर आणि त्याच्या आर्थिक परिस्थितीवर त्याची कलाकृति सर्वस्वी अवलंबून असते, असं म्हणणं जरा धाष्ट्यांचंच होईल. आम्ही रसिक आहोंत, आम्हांला उत्तमोत्तम कलाकृति लाभाव्या म्हणून आम्ही कलावंतांना जाणूनबुजून दरिद्री ठेवत आहोंत असा युक्तिवाद कांहीं प्रतिष्ठित व्यक्तींनीं केला तर तो शुद्ध ढोंगीपणा आहे असा माझा समज आहे.

कलावंतांची उपेक्षा आपल्याच काय, पण जगांतील सगळ्या देशांत आजवर झाली, सध्यां होत आहे नि पुढंहि होत राहील. मनुष्यस्वभाव इथून तिथून सारखाच ! ॲलेक्झांडर् दुमाच्या एका नाटकाचा पहिला प्रयोग व्हायचा होता. नाटककार अर्थात् हजर राहणारच ही निदान नाटक बसविणाऱ्या मंडळींची कल्पना; पण नाटककारानं साफ सांगितलं, कीं आपण आपलं नाटक पाहायला येणार नाहीं. कां म्हणून विचारतांच त्यानं आपली वृद्ध मातोश्री आजारी पडली असल्याचं सांगितलं. पण नाटककार येत नव्हते ह्याला आणखी एक महत्त्वाचं पण निराळं कारण होतं. तें ऐकून तुम्हांला खरोखरच आश्चर्य वाटेल ! नाटककाराजवळ गळ्याला लावायला स्वच्छ अशी एकहि कडक कॉलर नव्हती ! नाटककार पहिल्या रांकेंत बसणार ... त्याच्याकडं त्या रांकेंतील लब्धप्रतिष्ठित डोळे ताणून पाहणार व जर त्याच्या गळ्याला पांढरीस्वच्छ कॉलरच नसेल तर ? ॲलेक्झांडरकडे नवीन कॉलर् घ्यायला पैसेहि नव्हते ! खरी अडचण कुणाला सांगतां येईना. पैसे उसने मागावे तर स्वाभिमान आड यायला लागला. नाटक कंपनींतील मंडळींचा साहजिकच बेसुमार आग्रह होत होता. त्यांनीं पण खूप विचार केला आणि नाटकाच्या आदल्या रात्रीं एका पांढऱ्या

पुठ्ठयाची कॉलर् तयार केली. नाटकगृहांत नाटककार ती कॉलर् चढवून गेले! नाटकाला रंग चढला आणि टाळ्यांचा मधूनमधून कडकडाट होत होता; पण ... पण ॲलेक्झांडर् ? आपल्या कॉलरकडे कोण पाहात आहे का, ती पुठ्ठयाची आहे हें कुणाच्या लक्षांत आलं आहे का, आपली वृद्ध माता – तिचं काय झालं असेल, ह्याच विचारांनीं सुन्न होऊन, आपलं नाटक पाहात तो खिन्नपणें बसला होता !

आणि आपल्या गडकऱ्यांचं नाहीं का? गरगर फिरणारी खुर्ची विकत घ्यायची त्यांना एक महत्वाकांक्षाच होती म्हणाना! ती पुरी करण्याकरितां त्यांना कैक वर्षं थांबावं लागलं! श्रीयुत नारायणराव राजहंस हे श्रीनं युत नसल्यामुळंच कीं काय, समाजाकडून उपेक्षिले जात आहेत. आपल्या पहाडी आवाजानं रंगभूमि दुमदुमून सोडणारे कित्येक नटश्रेष्ठ रंगमूमीच्या ऱ्हासामुळं लाचारीच्या नोकऱ्या करीत आहेत! निसर्गाशीं स्पर्धा करणारीं चित्रं काढणारे उत्कृष्ट चित्रकार ड्रॉईंग मास्तर म्हणून कुठंकुठं चिकटलेले आहेत व छोट्या कमाईत आपला उदरनिर्वाह भागविण्याचा भगीरथ प्रयत्न करीत आहेत.

बिचारा कलावंत! त्याला माणसासारखं जगायचं असतं व तेंहि शक्य होत नाहीं! आर्थिक कुचंबणा आणि कलेच्या क्षेत्रांत विशेष असं कांहींच न करून दाखविल्यामुळं उत्पन्न झालेली निराशा, ह्या दुहेरी कात्रींत त्याचा हळवा जीव चांगलाच कातरला जातो. कुणाचं प्रोत्साहन नाहीं, कुणाची मदत नाहीं, वेळेचा अभाव असल्यामुळं तपस्या करायला, अध्ययन करायला अवसर नाहीं! ह्या सर्व गोष्टींमुळं तो धड ना सर्वसामान्य मनुष्य, धड ना कलावंत अशा कांहीं तरी मधल्या परिस्थितींत असतो. अंगांत क्वचित् लहरीपणा असलाच तर फार मोठ्या कलावंताची नक्कल करण्याकरितां तो मुद्दाम केला जात आहे अशा तऱ्हेचा चमत्कारिक आरोपहि करण्यास कांहीं लोक कमी करीत नाहींत. जसा कांहीं लहरीपणा करण्याचा वारसा सर्वस्वी मोठ्या लोकांकडंच कुणी दिलेला आहे! उल्लेख करतांना, किंवा चार लोकांत ओळख करून देतांना "हे अमुक ना, हे चित्रकार आहेत ... पेंटर आहेत बरं! अहो, पेंटर नाहीं, 'आर्टिस्ट' आहेत!" अशा तऱ्हेची वाक्यांत सुधारणा करून कुत्सितपणें बोलतांनाहि कांहीं लोक आढळतात, असा माझ्या एका चित्रकार-मित्राचा अनुभव आहे. "अहो, सांभाळा बरं कां

ह्यांच्यापासून ! सावध असा ! कवि आहेत म्हटलं हे कवि !" अशा तऱ्हेची प्रस्तावना कांहीं लोकांनीं करून दिल्याचं माझा एक कविमित्र सांगतो. "गातात बरं का हे ! अन् तीं तुमचीं पुळचट भावगीतं नव्हेत बरं का; अगदी शास्त्रोक्त खानदान संगीत !" अशा तऱ्हेचे हेटाळणीचे उद्गार माझ्या तिसऱ्या एका शिकाऊ गायक मित्रासंबंधी काढलेले मीं स्वतः ऐकले आहेत ! टिंगल, हेटाळणी, कुत्सितपणा, नालस्ती, निंदा आणि क्वचित् शिव्या ह्या सर्वांचा भरपूर मलिदा खायचं कलावंताच्या नशिबींच जणूं लिहून ठेवलेलं असतं !

कलावंतांपासून समाजाला फार मोठं कार्य करून घ्यायचं असतं. फार मोठ्या अपेक्षा असतात समाजाच्या त्यांच्याबद्दल ! लेखकांना समाजाचं वैचारिक अंग, समृद्ध वाङ्मय निर्माण करून पुष्ट करायचं असतं. कळत नसणाऱ्या, पण भासणाऱ्या नाजुक संवेदना गोड शब्दांत स्पष्ट करण्याचं काम कवींना करायचं असतं. न्याय्य हक्कांची जाणीव देण्याकरितां, ध्येयं संपादन करण्याकरितां आपल्या जिव्हेंतून केव्हां फुलं आणि केव्हां आग पाखडून वक्ता समाजाला जागृत ठेवत असतो. आठ तास काम करून जीव थकला-भागला कीं त्याला विसावा हवा असतो; त्या थकलेल्या जिवाला—समाजाच्या विराट जिवाला—केवळ निद्रेंतच ताजेपणा येत नाहीं. मग आपल्या गोड गळ्यांतून किंवा सारंगींतून किंवा असल्यास कांही सुरेल वाद्यांतून कलावंत मधुर स्वर काढतो व गलितगात्र समाजाला त्यामुळं विरंगुळा वाटतो. प्रचंड विश्वामधील रंगवैचित्र्य आणि नैसर्गिक सौंदर्याची मनोरम विविधता कुशल चित्रकार इवल्याशा फलकावर कुशलपणें सामावतात. आणि तें पाहून शुष्क गोष्टी पाहून कंटाळलेल्या समाजाच्या लक्षावधि नेत्रांना अक्षरशः गारवा वाटतो. नटश्रेष्ठांचीं रंगभूमीवरचीं कामं पाहून समाजाला नवचैतन्य प्राप्त झाल्यासारखं होतं. 'एकच प्याल्या' सारखं एखादं नाटक समाजास रडवतं व शिकवतं. कला, समाजाचं रक्षण आणि संवर्धन करीत असते. कला हाच समाजाचा प्राण होय. असं असतांना ती कला निर्माण करणाऱ्या कलावंताचा प्राण जात असला तरी तिकडं कुणी सहसा ढुंकूनहि पाहात नाहीं. हा विश्वासघात आहे कलावंताचा ! शिकल्यासवरलेल्या समाजानं केलेली कलावंताची ही गर्हणीय उपेक्षा आहे.

गंमत अशी आहे, कीं हें असं चालायचंच, असंच सर्वसाधारणपणानं सर्वांना वाटतं. त्यांत कांहीं चुकतं आहे असं नाहीं कुणाला वाटत! बेपर्वाईची ही वागणूक करतांना आपण कृतघ्नपणें वागत आहोंत हें मात्र कुणाच्या लक्षांत येत नाहीं. बहुतेक लेखकांना त्यांच्या लेखाबद्दल मोबदला मिळत नाहीं, हें अनेक उदाहरणांपैकींच एक म्हणतां येईल. मरमरेपर्यंत तालमी करून नाटकांत काम करणाऱ्या कांहीं नटांना बहुतेक वेळां वेळेवर पैसे मिळत नाहींत. उत्कृष्ट कलाकृति निर्माण झाल्या पाहिजेत. त्या होत नाहींत म्हणून ओरड करायची आणि कलावंताची मात्र कळत -न कळत अशी उपेक्षा व मुस्कटदाबी करायची! देशाचं आणि समाजाचं वैभव म्हणजे कलावंत व त्यांच्या कलाकृति. राष्ट्राचा मान आणि त्यांचें आंतरराष्ट्रीय स्थान त्यांतील संस्कृतीवर अवलंबून असतं. ह्या संस्कृतीचे जनक आणि संवर्धक त्यात्या देशांतील कलावंतच असतात.

दुसऱ्या शब्दांत सांगायचं म्हणजे कलावंतच राष्ट्र घडवितात. परस्परविरोधी राजकारणामुळं युद्धं व्हायचीं आणि राष्ट्रंच्या राष्ट्रं बेचिराख व्हायचीं हें जसं ऐतिहासिक सत्य आहे, त्याप्रमाणंच त्यांची विसकटलेली घडी कलावंतांनी पुन्हां नीट बसवायचीं हेंहि एक ऐतिहासिक सत्य आहे. ज्या कलावंतांवर एवढी प्रचंड जबाबदारी आहे, राष्ट्रोद्धार आणि राष्ट्रसंवर्धनच जिथं त्यांच्या हातीं, त्यांच्या निदान पोटापाण्याची सोय व्हायला नको काय? अणुगोल आणि असलींच विध्वंसक शस्त्रास्त्रं निर्माण करण्याकरितां कोटिकोटि रुपये खर्चून अनेक राष्ट्रांतील सरकारें मानवतेचा संहार करण्याकरितां शास्त्रज्ञांना आपल्या पदरीं राजाश्रय देऊन बाळगीत आहेत; पण कलावंतांना मात्र फारसा कुणाचा आधार नाहीं! आर्थिक स्वास्थ्याबरोबरच कलावंताकडे बघण्याची जी एक कुत्सितपणाची व हेटाळणीची दृष्टि समाजांतला एक मोठा वर्ग बाळगतो, त्याच्याकरितां सहानुभूतीचे हजारों चष्मे फुकट देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. आजचं जग म्हणजे एक विराट् दग्धभूमि झाली आहे. केवळ शांतपणानं जगण्याकरितां अखिल मानवता धडपड करीत आहे. दोन युद्धांनी विच्छिन्न झालेल्या विश्वाचीं शकलं शांतीनं सांधायचीं आहेत. उपाशी, अर्धपोटी व अर्धनग्न अशा कोट्यावधि मानवांना अन्न आणि वस्त्र देऊन, साक्षर करून अखिल जगताची पुनर्रचना करायची आहे.

अशा ह्या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं ह्या दिवाण्या दुनियेला कलावंतच ताळ्यावर आणणार आहे. तोच तिचं रक्षण आणि संवर्धन करणार आहे. त्याच्यावरच पुढचं भवितव्य अवलंबून राहील. व्यापक अर्थानं हें सर्व होणार असल्यामुळं कलावंतांची ह्यापुढं आणि ह्यामुळं तरी उपेक्षा होणार नाहीं अशी मला आशा आहे.

★★★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... दि: ......................
क्रमांक ...................... नों: दि: ..................

# १२

## सासऱ्याला वेसण !

कालपरवापर्यंतचा मन्याबापू लग्न ठरल्याबरोबर मनोहरपंत व नंतर 'रावसाहेब' झाला होता. पदव्या टाकून द्यायच्या आजच्या युगांत त्याच्या सासरच्या मंडळींनी 'रावसाहेब' ही पदवी त्याला बहाल केली होती. खुद्द मन्याबापूला आपल्या नामाभिधानाच्या झालेल्या उत्क्रांतीबद्दल राहून-राहून कौतुक आणि आश्चर्य वाटत होतं.

मन्याबापू आणि मैनीचा जोडा, राघूमैनेसारखा लोकांना भासत असे. सव्वाशें रुपये कमाविणारा जांवई सव्वाचारशें रुपयांच्या भांडवलांत आपण 'कटवला' ह्या जाणिवेमुळं बाबासाहेब खूष होते ह्याची जाणीव मन्याबापूला नव्हती असं मात्र नव्हे. आपल्या सासऱ्याकडून जास्तींत जास्त पैसा आणि जिनसा 'उकळायच्या' ह्या मताचा मन्याबापू होता. ह्या स्वभावानुसार तो मैनेला नेहमी चिडवीत असे. डाळिंब्या सोलतांना मैनीला मदत करतांकरतां तो एकाएकी तिला म्हणायचा 'माहित आहे! माहित आहे! तुझ्या वडिलांनी दिलेली अत्तरदाणी इतकी हलकी आहे, कीं एखाद्या चिमणीच्या गळ्यांत ती बांधली तर ती चिमणी भुर्कन् उडून जाईल.'

हातामधे साचलेली सालं जरा रागांतच जमिनीवर आपटत, लाल नाक करून मग मैनी नुसती मन्याबापूकडे बघायची !

पण आताआताशा सासऱ्याला डिवचण्याचं मन्याबापूला व्यसनच लागलं. आपल्या कद्रू श्वशुराकडून कांही नाही तरी चांगला रेडिओ सेट् ह्या दिवाळींत घ्यायचाच घ्यायचा, असं त्याच्या मनानं घेतलं. पहिल्याप्रथम त्यानं अर्थात् सामोपचाराचीं बोलणीं सुरू केलीं. संध्याकाळी परत येतांना त्यानं चार आणे भिरकावून मैनीच्या आवडीची मोगऱ्याची वेणी आणली. मैनीनं ती घातल्यावर त्या कोंदट खोलींतील वातावरण सुवासानं दरवळून गेलं!

" मैने ! "

" काय ? "

" मला मोगऱ्याचा वास फार आवडतो ! "

" अय्या ! मलासुद्धा " लहान मुलासारखे पाय हालवीत मैना म्हणाली.

" मला संगीताची आवड आहे ! "

" काय म्हणतां ? हे मात्र मी कधी ऐकलं नव्हतं. " चक्रावरून घसरलेली वेणी सारखी करीत मैना म्हणाली.

" नाहीं कसं ? बाथरूममध्ये गातं कोण मग ? "

" तुम्हीं होय ? मला वाटायचं इतके दिवस कीं नळ धो धो सुटलेला असतो ! "

" तुला काय कल्पना संगीताची ? रेडिओ घ्यायचा आहे – पण ... पण ... " आधुनिक चाणक्याप्रमाणं थांबत मन्याबापू म्हणाले.

" पण काय ? "

" पण असं, की बाबासाहेबांना न कळवितांच मी सेट् आणला तर त्यांना अपमान नाहीं कां वाटायचा ? "

" कां बरं ? " यजमानाच्या शब्दांतली खोच न उमगून त्या भोळ्या मुलीनं विचारलं.

" म्हणजे असं आहे ... म्हणजे त्याचं असं आहे ... त्यांनाच जर द्यायचा असेल तर ... अन् मला तो घ्यायचा असेल तर ? "

" तें शक्यच नाही ! "

" पण विचारून तर बघ. वडील माणसांचा अपमान झालेला आपल्याला नाही बुवा आवडत ! "

" काय ग ? एकाएकी कशी आलीस ? " आपल्या कन्येला आकस्मिकपणें आलेली पाहून तिची आई म्हणाली.

" अग सहज ! तुला भेटायला ! "

" अस्सं होय ! मग हरकत नाहीं. "

बाबासाहेबांची कळी उमलविण्याकरितां धूर्त मन्याबापूनं मैनेबरोबर कळीदार शंभर पानांचं बंडल व एक ' साफ ' विड्यांचं अशी पाठविली होतीं. एवढ्या दारूगोळ्याच्या भडिमारानं म्हाताऱ्याच्या हृदयाचा बालेकिल्ला आपण जिंकला नाही तर मानवी स्वभावाचं आपल्याला पुरेसं ज्ञान झालेलं नाही, असं त्या जिनसा घेतांना मन्याबापूला वाटलं होतं.

आणि झालंहि मन्याबापूच्या अपेक्षेप्रमाणंच. मोठ्या ' अगत्यानं ' पाठविलेल्या त्या भेटीमुळं म्हातारा विरघळला. योग्य संधी साधून मैनीनं रेडिओची गोष्ट काढली.

" बरं झालं मला विचारलंस म्हणून ! दिवाळसणाची भेट म्हणून रावसाहेबाना मी रेडिओच देणार होतों ! "

मैनीचा आनंद अवर्णनीय होता. उल्हसित झाली म्हणजे ती आपले पाय जोरानं हेलकावीत असे. मोठ्या घड्याळ्याच्या लंबकासारखे आता ते हालत होते !

आणि थोड्याच वेळांत बाबासाहेब रेडिओ आणायला घरून गेले ते पंचाऐंशी रुपयांचा मस्त सेट् घेऊन आले. मैनीला काय, कुठलाहि रेडिओ सारखाच. माहेरच्या गड्याला हक्कानं बरोबर घेऊन टुण्टुण् उड्या मारीत ती घराकडं निघाली. गच्चीवरून आपल्या पत्नीला " सह रेडिओ " पाहून मन्याबापू बेहद्द खूष झाला व मोडक्यातोडक्या शिळेंत " बचपनका साथि मेरे " हें त्यांचं आवडतं गाणं म्हणूं लागला.

सेट् उघडून पाहिल्याबरोबर मात्र त्या शिळेचं रूपांतर फुत्कारांत झालं ! मन्याबापूला जवळजवळ सात्त्विक संताप आला. बाबासाहेबानं एका अर्थीं हा ' ध ' चा ' मा ' केला आहे, असंच त्याला वाटलं !

" ह्याचा सूड घेईन तर नांवाचा मन्याबापू ! " असं मनांतल्या मनांत तो पुटपुटला व त्यानं ओठावर नसलेल्या मिशा पिळल्या. आपल्याच आनंदांत मग्न असलेल्या मैनेनं त्याच्या त्या मूक कृतीचं स्पष्टीकरण विचारल्यावर तो म्हणाला " कांहीं नाहीं ! आपण खूप आहोंत आज — फारच खूप आहोंत ! "

*           *           *

" हें बघ जोश्या ! " त्याच्या पाठीवर एक भारी मोठी थाप मारून मन्याबापू म्हणाला, " तूं जेव्हा रेशनिंग इन्स्पेक्टर झालास तेव्हा मला कल्पना नव्हती, की मला तुझा असा उपयोग होईल म्हणून ... "

" अरे, पण सांग की काय सांगायचं तें, " जरा कंटाळून रेशनिंग इन्स्पेक्टर जोशी म्हणाला.

" हें ! बघ त्याचं असं आहे. पंचाऐशीं रुपयांचा रेडिओ सेट् देऊन माझ्या सासऱ्यांनीं मला चाट केला आहे ... "

" पण त्याचा आणि तुला दिवाळीकरता साखर लागणार आहे त्याचा काय संबंध ? "

" अरे लेका, तुला हें कळत नाहीं म्हणून तर तूं अजून रेशनिंग् इन्स्पेक्टर राहिला आहेस ! हें बघ, काल मी हिला एक मण दीड मण साखर, दहा पायली गहूं व सहा पायली तांदूळ घेऊन माहेरी पाठविली आहे. अरे, काळ्या बाजारांत लागेल तें मिळतं. उद्या सकाळीं त्यांच्या घरीं जायचंस तूं. बाबासाहेबांना घाबरवून सोड तूं ! सांग त्यांना दरडावून, कीं इतका इतका माल तुमच्या घरीं आहे. मला झडती घ्यावी लागेल. पोलीस येतील दाराशीं. अब्रू जाईल ! तुमची पंचवीस वर्षांची सरकारी नोकरी चट्दिशीं जाईल ... काय वाटेल तें सांग त्यांना, पण अगदी त्यांना घाबरवून सोड. "

" पण ह्याचा तुला काय उपयोग ? " गोंधळलेला जोशी ' बोनस्मधून ' घेतलेल्या घड्याळाकडं पाहात म्हणाला.

" आस्ते कदम ! आस्ते कदम ! " मोंगल बादशहाच्या मोंगलाई थाटांत मन्याबापू म्हणाला. " घाई करून चालायची नाहीं. वैऱ्याची रात्र आहे, जागा राहा. "

" अरे मन्याबापू ! तुला वेडबीड तर नाहीं लागलं ? " किंचित् साशंकतेनं जोशी म्हणाला.

" मी शहाण्यांना वेडा करीन. आत्तांच करणार आहे. तर मग बाबासाहेब घाबरले, कीं ते तुला अर्थात् कांहींतरी देऊं करतील ! बऱ्याच वेळानं आणि नाखुषीनं, तें तुला सांगायला नकोच म्हणा. तूं त्यांना सांगायचंस, कीं आपल्याला पैसे वगैरे नको आहेत. मग ते जास्तच बुचकळ्यांत पडतील. सहाशें पन्नास रुपयांचा फिलिप्स रेडिओ मिळत असेल तर प्रकरण मिटेल

म्हणून त्यांना तूं साफ सांग. कोर्ट, दरबार, पोलीस आणि जांवई ह्यांची त्यांना फार भीति वाटते. ते तयार होतीलच. त्यांच्याबरोबर जाऊन लगेच सेट् विकत घ्यायचा आणि तो घेऊन तडक तूं माझ्या घरी यायचंस, समजलं ? ''

जोशी स्तंभित झाला !

" मन्याबापू ! मला वाटलं होतं कीं तूं साधाभोळा आहेस. अगदींच उलट्या काळजाचा आहेस की रे ! ''

" जग उरफाटं झालं आहे, जोशी ! सरळ माणसाचा टिकाव आजच्या जगांत लागणं अशक्य आहे. ''

" पण... पण ह्या खटाटोपाबद्दल मला काय बक्षीस ? ''

" तुला हा पीपल्स सेट ! ''

" कबूल ! एकदम कबूल '' जोशी हर्षातिशयानं म्हणाला.

*  *  *

एवढ्या सकाळीं मोठ्यानं दार ठोठांवणारा हा प्राणी कोण असा विचार करीतच मैनीनं दार उघडलं. जोशींना पाहून तिला आश्चर्य वाटलं.

" कांहो ? सहज ना ? हे बरे आहेत ना ? '' तितक्यांत तिला वाटलं कीं ह्यांना कांहीं झालं नाहीं ना ?

" तुम्हीं आतां रेशनिंग् इन्स्पेक्टर् जोशी ( ओ. एच्. एम्. एस्. ) यांच्याशीं बोलत आहांत. मी आता ड्यूटीवर आहे. मला श्री. रामचंद्र म. आपटे यांच्याशीं बोलायचं आहे. सरकारी काम आहे. दिरंगाई होतां कामा नये. '' हुकुमी आवाजांत जोशी म्हणाला.

मैनी खट्टू झाली. घाईघाईनं तिनं बाबांना बोलाविलं. मन्याबापूच्या शिकवणीप्रमाणं त्याना दमांत घेतल्याबरोबर त्यांची बोबडीच वळली.

" प ... प ... पण तु ... तु ... तुम्हाला कुणी सांगितलं ? ''

" सरकार लक्षनेत्री आहे ! ''

" आम्ही कधीच्या काळीं ...''

" गुन्हा म्हणजे गुन्हा बाबासाहेब. ''

बाबासाहेब रडकुंडीला आले होते. उभं आयुष्य महाराष्ट्रीय प्रामाणिकपणानं घालविल्यामुळं त्यांना आपण एक भयंकर गुन्हा केला असं वाटून ते गर्भगळित झाले होते.

मन्याबापूचे ग्रह जोरदार होते. साडेसहाशे रुपयाचा सेट् जेव्हा बाबासाहेबांनी मोठ्या कष्टानं जोश्यांच्या थरथरत्या हातांत दिला, तेव्हा त्याला एक विलक्षण आनंद झाला. शिवाय 'आपल्याला चालायची सवय नाही' असं पायपीट करणाऱ्या रेशनिंग इन्स्पेक्टरनं खडसावून सांगितल्यामुळं फोर्टमध्यें जाऊन येण्याचा टॅक्सीचा खर्च झाला तो वेगळाच !

बाबासाहेब घरीं परतले. ते अगदी थकून गेले होते.

"संध्याकाळीं तुम्हीं चला माझ्याबरोबर ! यांना मी सर्व सांगतें. तुमचा मित्र म्हणवतो आणि आमचा असा गळा कापतो म्हणजे काय ?" लालबुंद होऊन मैनी तडफडून बोलत होती.

ड्यांबिस लेकाचा ! रावसाहेबांना दिला असता सेट् तरी बरं झालं असतं. परक्याला असा देण्यापेक्षां जांवयाकरितां खर्च केल्याचं दुःख कमीच नाहीं कां ?" घाम टिपीत बाबासाहेब म्हणाले.

संध्याकाळीं, हताश झालेली ती पितापुत्री जावयाला आपलं दुःख निवेदन करण्याकरितां निघाली. दारावरची बेल वाजण्यापूर्वींच मैनीला आंतून सुस्वर संगीताचे मंजुळ स्वर ऐकूं आले आणि ती थबकली. बाबांनीं दिलेला रेडिओ इतका चांगला वाजतो ह्याची तिला कल्पना नव्हती. जरा संभ्रमांतच तिनं बेल दाबली.

शांतपणें मन्याबापूनं दार उघडलं. "या बाबासाहेब ! कशीं काय निघालीं पानं आणि विड्या ? मला कांहीं त्यातलं गम्य नाहीं, तेव्हां माझा एक जोशी नांवाचा मित्र आहे ... रेशनिंग् इन्पेक्टरसर्व बाबतींत हुशार आहे तो ... त्याला सोबत घेऊन आणलं तें साहित्य !

"जोशी ! जोश्या ! नांव नका घेऊं त्याचं !" बाबासाहेब ओरडले.

मन्याबापूनं रेडिओचा आवाज मोठा केला ... जास्तींत जास्त मोठा केला.

"अशी कशी घरां ऽऽत झाली बाई चोरी !" हें भावगीत कोणतरी मुलगी आळवून आळवून म्हणत होती. त्या निनादानं सारं घर दुमदुमुन गेलं. ती ओळ ऐकून निदान मन्याबापू तरी मनापासून हंसला !!!

* * *

## १३

# भालीं चंद्र असे धरिलाSSS

हे मानवा ! खुसपट काढण्याची तुझी रीत जुनीच आहे. काल परवां तूंच एक कांटा माझ्यावर अगदीं नेम धरून मारलास ! त्याच्या आधींहि हा उपद्व्याप कुणीतरी केलाच होता ! मला आपलं हंसूच आलं ! तुला दुसरे उद्योग नाहींत काय रे !

कालपरवां तूं म्हणे माझ्यावर 'रेंजर सेव्हन्' सोडलास ! ठीक आहे. करीत बैस आपल्या पैशाचा नाश ! उचापती करण्याची तुझी खोड जाणार कशी ! म्हणे 'रेंजर–सेव्हन् !' अरे, सात लाख असे रेंजर्स सोडलेस तरी मला काय त्याचं ?

तुझा उपसर्ग नको...तुझी ब्याद नको ... तुझी कटकट नको म्हणून मी हा आपला इथं युगानुयुगं शांतपणें आहे. हां ! फिरतों ! भटकतों ! पण आपला बेतांत ! वरून पहातों मी तुझी केविलवाणी अवस्था ! मला तुझी दया येते.

वास्तविक तूं किती क्षुद्र ? पृथ्वीच्या पृथ्वीवरच क्षणांत नाहींसा होशील. पण मलाच तुझी दया येते. तुला जगायची संधि मिळावी म्हणून तुझ्याकरतां अहोरात्र खपतों. पण तुला काय त्याचं !

काय म्हणालास ? मी तुझ्याकरितां खपत नाहीं ? अगदीं माणसालाच शोभण्यासारखं बोलतोस ! कृतघ्न कुठला ! अरे, सर्व सागरांचं पाणी बारा

महिने अठरा काळ कोण उपसतं ? तूं का मी ? आंघोळीला जातोस तेव्हां तुला भरलेली बादलीसुद्धां धड उचलतां येत नाहीं ! इथं मी तुझ्याकरतां महासागर उपसतो त्याची तुला दादच नसावी ना !

मला तुझा राग येतो ! पण क्षणभरच ! पुन्हा दयाच येते आपली ! अरे, वेड्या ! नीट वाग ! जरा नीट वाग ! आजवर तुझ्याकरतां अंगाई गीतं गायलीं. माझ्या शांत प्रकाशांत तूं झोपलास ! माझ्याकडे पाहून हजारों वर्षं कवनं केलीस ! माझा मुखडा तुझ्या वाङ्मयांत पानापानांवर खुलला. माझ्या सौंदर्याचा निकष म्हणजे पूर्णत्वाचा पूर्णविराम ! ही अशी तुझी भाबडी समजूत होती तोंपर्यंत तूं मला खूप खूप आवडायचास !

पण ... पण अलिकडं बिघडलास तूं ! लाडावलास फार ! वडील माणसांचा मान राहोच ... तूं आतां, फार उद्धट व्हायला लागलास ! ज्या हातानं तुला आजवर गोंजारलं त्याचेच ओरबाडे काढायला लागलास ! तुला आतां शिवी तरी काय देऊं ? हट् ! माणूस कुठला !

माझा स्वभावच शांत ! त्याचा गैरफायदा घेतोस काय ? तुझ्या उलाढाल्या ह्या अशा ! म्हणून मी खूप दूर राहिलों तुझ्यापासून ! म्हटलं, आपलं घर हें इथं दोन लक्ष ४० हजार मैलांवर आहे तें ठीक ! इतक्या लांब तूं तडफडायला येणार नाहींस ! पण तसं केलंच नसतंस तर तूं माणूस कसला !

अरे, तुला कळत कसं नाहीं ? आकाशांतलीं रहस्यं आकाशांतच रहावींत. जिथलं तिथंच असावं ! मी म्हणतों त्यांत शोभा आहे ! आपण जर जागा बदलल्या...परमेश्वराला जर 'कंट्रोलर ऑफ ॲकोमोडेशन' केला व आपण जर 'एक्स्चेंज्' घेतली तर काय अवस्था होईल ? म्हणजे तूं दोन्ही जागा बळकवायला बघतोयस होय ? वा ! खासा न्याय ! काय म्हणतोस् ? आणखी जागा पाहिजे ! वा छान ! अरे, तुला जागा तरी किती हव्यात ? मंगळ, शनि भांडखोर म्हणून त्यांच्या वाटेस तूं जात नाहींस अजून ! सूर्यमहाराज तर एक नंबरचे भडक ! त्यांच्यापाशीं तर बोलायचीसुद्धां सोय नाहीं ! गुरुमहाराज ध्यान लावून बसलेले ! विरळ वातावरणांत ! अरे माणसानं हव्यास धरावा, पण काय इतका ? तुझं आपलं पुरंच होत नाहीं !

माझं ऐक ! जरा हळू ! फार दौडूं नकोस ! अरे, जरा खा, पी, मजा कर ! तें नको ! काय म्हणतोस ? महत्त्वाकांक्षा ? हूँ ! राक्षसी महत्त्वाकांक्षा !

अरे, माझ्याकडं बघून आजवर दिवस काढलेस ! तें आठवतं का तुला ? तुझेच ज्ञानेश्वर काय म्हणाले होते ... ?

चंद्र तेथें चंद्रिका
शंभु तेथें अंबिका
संत तेथें विवेका
असणें की जे ...

विवेक धर ! विवेक धर ! हां ! ज्ञानोबा संत होते ... तूं पण आहेस किंवा होऊं शकशील ! म्हणून तुला सांगतोय् मी ! पण ... तूं कुठचा ऐकायला ?

अरे, वेदांत आणि वेदापासून लहान पोरासोरांच्या गाण्यांतून तूं मला आजवर राबवलास ! मी कांहीं बोललों नाहीं. काय तर म्हणे ... "चांदोबा ! चांदोबा ! भागलास कां ?" लेका भागलास तूं अन् वर मलाच विचारतोस ?

त्याचं मला एवढं नाहीं वाटत ! पण इतर वेळीं तूं मात्र अगदीं दिवेच लावलेस हं ! देवाच्या वाणींतून बोललास ... प्राकृतांतून बोललास तरी तुला माझ्या चेहऱ्यावरचा डागच काय तो दिसतो ! जरा कांहीं झालं कीं आपलं "जसा चंद्रावर डाग तसा ... " वगैरे.

अरे, माझ्यावर एखादाच डाग असेल ... पण तुझ्यावर तर अगणित आहेत रे ! इन्द्रासारखं तुझं छिद्रपूर्ण शरीर ! छिद्रपूर्ण मन ! छिद्रपूर्ण जीवन अन् वर मान करून माझं गृहछिद्र काढतोस काय ?

तूं इकडं फिरकूंच नकोस कसा ! आमच्या इथं शांततेचं ... प्रगाढ शांततेचं नीरव साम्राज्य आहे ! आमच्याकडे राजकीय तट नाहींत. एकमेकांना मुळासकट खाऊन टाकणाऱ्या आसुरी शक्ति नाहींत ... राज्ययंत्रणा नाहींत ... कायदेकानूंचे साखळदंड नाहींत ... समाजजीवनांतल्या समस्या नाहींत ... अन्नाची टंचाई नाहीं ... जागेचा तुटवडा नाहीं–कपड्यांचा प्रोक नाहीं– वेडलाव्या जनसमूहाची भाऊगर्दी नाहीं ! काळोखांत असून काळाबाजार नाहीं. वैवाहिक प्रश्न इथं भेडसावीत नाहींत—बेकारी नाहीं—इन्कम् टॅक्स नाहीं — सेल्स टॅक्स नाहीं—आर. टी. ओ. नाहीं–भूगोलाचीं पुस्तकं नाहींत–इतिहासाची मिजास नाहीं—तत्त्वज्ञानाचा कमंडलू नाहीं—शास्त्रांचं अवडंबर नाहीं — शास्त्रज्ञांचा डामडौल नाहीं — कांहीं नाहीं ! इथं फक्त आपला मी नि माझं काम !

तुझ्या घराची तूं वाट लावलीसच ! आतां माझ्या नको लावूं ! मला माझं काम आहे ! तुझ्यासारखे उपद्व्याप करायला मला वेळ नाहीं ! एका सेकंदाची ढिलाई आजवर माझ्या कामांत मी केली नाहीं ! तूं मात्र घड्याळांत आपला सारखा बघत असतोस. पण तुझं एकहि काम वेळेवर होत नसतं !

माझं जरा ऐक ! सृष्टि आहे तशीच ती ठेवण्यांत स्वारस्य आहे ! सगळींच गुपितं तूं फोडायला लागलास -- सगळींच रहस्यं तूं उकलायला लागलास तर सर्वांनाच तें फार भारी जाणार आहे. अरे, जीवावर बेतेल सर्वांच्याच ! सृष्टीचीं रहस्यं हीं नववधूच्या रहस्यासारखीं असतात. उलगडलेलीं नसतात तोंवरच त्यांचं माधुर्य, त्यांची खुमारी, त्यांची शान ! पडदा वर गेला कीं मग अपेक्षाभंग होतो ! आतां तूंच बघ ना ! माझीं चित्रं घेतलींस ! आतां बघ ! असा चेहरा लावण्यवतीचा असेल – असा खडबडीत – देवीनं विद्रूप केल्यासारखा भयानक – तर मग सौंदर्याची मूळ कल्पनाच बदलायला हवी, नाहीं का रे ? तूं मारे पुन्हां पुन्हां आळवतोस तीं गाणीं – " भालीं चंद्र असे धरिला – सुकान्त चन्द्राननाऽऽ ... " एक कीं दोन ! लाखों ! त्या गाण्यांतला प्राण नि ताण एका क्षणांत नष्ट होईल !

म्हणून तुला पुन्हां एकदां बजावून सांगतों ! तूं आपला आहेस तिथं रहा– सुखानं रहा ! विश्वाचीं रहस्यं आहेत तशीं ठेवण्यांत और मजा आहे बेटा ! तीं उकललींस कीं सर्व रुक्ष, कठोर, खडकाळ ! आपल्या जीवनाला आपल्याच हातानं कायमचं खग्रास ग्रहण लावून घेऊं नकोस !

मला माहीत आहे ! तूं आतां कायमचा कृष्ण पक्षांतच रहाणार आहेस. तुझ्या आयुष्यांतला शुक्लपक्ष आतां कायमचाच नाहीसा झाला आहे. आत्यंतिक यांत्रिकीकरणामुळं तूं आतां क्षयी दिसूं लागला आहेस – मी प्रतिपदेला दिसतो तसा ! अरे, पण माझ्यांत जिद्द आहे ! अन् ती जिद्द मी वापरतों तर तुझ्याचकरतां ! बेटा ! माझं ऐक ! आपल्या घरांतच रहा. हंसत रहा ! सुखी रहा ! त्यांतच तुझं कल्याण आहे. जास्त धडपड करशील – आपल्या हातानं आपलं कल्याण झुगारशील तर तुला ठाण्याला कायमचंच रहावं लागेल.

— इतक्यांत शेजारचे बापुराव आले. " वसंतराव, पेपर नेतो हं ! " एवढंच म्हणून ते गाणं गुणगुणत गेले " भालीं चन्द्र असे धरिला ऽऽऽ "

★★★

## १४ आमच्या स्मशानयात्रा !

साडेतीन हात विनाशी देहाची चळवळ थांबल्यावर त्या काष्ठवत् शरीराची आम्हीं ज्या पद्धतीनं विल्हेवाट लावतों त्यासंबंधीं हा लेख मी तडफडून लिहीत आहे. मृत देहाला अग्नि देण्याच्या आमच्या सनातन पद्धतीबद्दल मला कांहीं म्हणायचं नाहीं. ती सर्वोत्कृष्ट रीत आहे अशी माझी मनापासून समजूत आहे. परंतु ज्या घिसाडघाईनं व बेजबाबदारपणानं ही उत्तरक्रिया बहुतेक ठिकाणीं केली जाते ती प्रत्यक्ष पाहून त्यासंबंधीचे माझे स्वानुभव मी इथं देत आहे.

हिंदु सोडून तुम्हीं कुठल्याहि समाजांतली प्रेतयात्रा पहा ! त्या जमातींतील लोक शांतपणें गंभीर चेहरा करून चालतांना तुम्हांला दिसतील. आमच्या इकडं उलटा प्रकार दृष्टीस पडतो. गप्पा ठोकीत व केव्हां केव्हां हंसत खिदळत जाणारे कांहीं महाभाग मी प्रत्यक्ष पाहिले आहेत. ही मंडळी अर्थात् शेजार-पाजारची असते व त्यांना प्रत्यक्ष मृताबद्दलचं 'सोयर-सुतक' कुठल्याहि अर्थानं नसतं. पण म्हणून काय त्यानीं गंमत करीत रस्त्यानं चालायचं होय ? प्रेतासमोर चालणारा तरुण मुलगा ! त्याची डगमगती काया व लटपटणारं मडकं सांवरायला असतो एखादाच ! प्रसंगाचं गांभीर्य जाणून त्याप्रमाणं वागणारे महाभाग आमच्या हिंदुसमाजांत फारच क्वचित् आढळतात हें नमूद करतांना मला दुःख होत आहे. 'हलक्या' जातींच्या प्रेतयात्रा पाहिल्या तर

बहुतेक ठिकाणीं, देवभक्तीचा जो कल्लोळ, कंठशोष केला जातो तिचं मूळ दोन चार कडक दारूच्या बाटलींत असतं असं आढळून येईल. किंबहुना फुकटची दारू पिण्याची ही पर्वणी साधण्याकरतांच कांहीं वल्ली अगदीं टपून बसलेल्या असतात. एखाद्याचं अवसान होतंय कधीं आणि चार दोन भजनांच्या भांडवलांत सात आठ मद्याचे पेले आपण रिकामे करतोय कधीं ह्या संधीकरतां ही मंडळी प्रत्यक्ष यमराजापेक्षां जास्त आपुलकीनं घटका भरलेल्या व्यक्तींच्या मृत्यूची वाट पहात असतात ! हं ! हें काम मात्र चोख करतील बरं का ! त्यांची प्रसिद्धीच त्यामुळं झालेली असते. हें दुर्घट कर्म करण्याकरतां मिळणारे हुकमी चाकर याच दृष्टीनं कांहीं लोक त्यांच्याकडे बघतात व सोमरसाची संजीवनी चारून त्यांच्याकडून सर्व कामं करून घेतात.

थंडी कडाक्याची पडली होती. कांपऱ्या आवाजांत मला कुणी तरी हांक मारली. त्या आवाजाच्या कंपावरून मी लागलीच ताडलं, कीं हें कुणाच्या तरी अंत्यविधीकरतां आमंत्रण आहे. माझा तर्क बरोबर होता. तासाभरांत आम्हीं सतरा वर्षांच्या एका कोंवळ्या पोराच्या वडिलांना उचलून नेत होतों. थंडीनं दांत एकमेकांवर आपटत होते. खांद्यावर थंडीनं जास्तच गारठलेल्या मृत देहाचं ओझं होतं ! त्यांत चार माणसं अशी निघाली, कीं नुकतंच उघडलेल्या इराणी हॉटेलांत चहा घेण्याकरतां अडूनच राहिलीं. शव फूट-पाथवर ठेवलं. मी आणि हुन्दके देणारा तो बिचारा पोरगा बाहेर उभे राहिलों. दहा मिनिटानं चहा प्राशन करून, सिगारेट्सच्या धुराचे भपकारे सोडीत ही मंडळी बाहेर आली. यांतला एकूण एक गृहस्थ ‘ सुशिक्षित ’ होता ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे !

या अनुभवाची प्रचीति घेतल्यानंतर, ‘ हलक्या ’ समाजांतले लोक स्मशानांत नाहीं नाहीं ते चाळे करतात याचं मला मुळींच आश्चर्य वाटलं नाहीं. कुणी प्रेताच्या ज्वालांवरच, दारूच्या नशेंत असतांना विड्या पेटवितात. कुणी रात्रीच्या अघोर समयीं त्या जळत्या जीवाच्या अगदीं नजिक राहून, त्यासमोर किळसवाणा व फाजील, किंबहुना अश्लील विनोद करून भुतासारखे हाः ! हाः ! ! हाः ! ! ! असे मोठमोठ्यानं हंसतात ! एऱ्हवीं अबोल असणाऱ्या व्यक्ति, कां कुणास ठाऊक, स्मशानाच्या त्या विध्वंसी राज्यांत एकाएकीं बोलके होतात व त्यांचाहि गलका सुरू होतो.

मद्यपान करून, मद्यपानाचा अतिरेक करून खेडेगांवांतली जी मंडळी अंत्यविधीकरतां जातात ते प्रेताचे खरे 'हाल' करतात! एका गृहस्थाची पत्नी वारली. ताबडतोब गांवचे मद्यपी जमा झाले. त्याचं सांत्वन करण्या-आधीं ते दारू आणण्याकरितां त्याच्याकडे पैसे मागूं लागले! चार पोरांचा तो बिचारा बाप आपल्या मुलांचं कसं होईल ह्या विवंचनेंत होता आणि त्याच्या 'दोस्तानां' काळजी लागली होती भलतीच! दारू आणल्यावर त्याची वांटणी झाली व मग मंडळी जोरानं कामास लागली. काम करतां करतां पिऊं लागली व पितां पितां काम करूं लागली. ताटी बांधतांना त्यांच्या झोकांड्या जात होत्या! त्यांच्या हाताला सुंभ लागत नव्हता! सुंभाला शिव्या आणि बांबूंना चार गोड शब्द असा भेद त्यांनीं बाळगला! सर्रास - केला! सर्व उपकरणांना सकारण व अकारण शिव्या देण्याचा स्तुत्य उपक्रम त्या लोकांनीं चालू ठेवला होता! अत्यंत धीमेपणानं ब-याचशा बाटल्या रित्या झाल्यावर मंडळी प्रेत उचलून लटलटत मार्ग काढूं लागली. खेडेगांवचं स्मशान तें! खेडेगांवच्या प्रत्येक गोष्टीसारखं तेंहि दोनचार मैल दूर असाय-चंच! झोके देत देत, भजनाच्या डरकाळ्या मारीत मारीत, न आठवलेल्या तुकारामाच्या अभंगाच्या चरणांत प्रासादयुक्त शिव्यांचा चरण मद्यप्याच्या तैलबुद्धीनं भिरकावून देत देत, ही मंडळी मजल दरमजल कूच करीत होती. प्रेताला हिसके बसत होते आणि मदिरेची घाण इतकी उग्र सुटली होती कीं त्या गृहस्थाची भार्या जर अर्धवट मृत्यु पावली असती तर त्या ताटीवर उठून बसली असती! तासाभराचा रस्ता चालून जायला चांगले दोन अडीच तास घेऊन, मदिरामंडळाची ही छोटी आवृत्ति स्मशानगृहांत प्रवेश करती झाली. प्रेताला अग्नि द्यायला व जरा वेळानं मुसळधार पाऊस पडायला एकच गांठ पडली! अग्नि विझून जात होता. लटपटत्या पायांना, शरीर जुलमानं सांवरायला लावीत, मंडळी तो चेतविण्याकरितां भगिरथ प्रयत्न करूं लागली. अग्नि–पावसाची ही झुंज चांगली तास दीड तास चालली! पहांटेच्या सुमाराला पाऊस कमी झाला आणि ह्या लोकांचा जोरपण कमी झाला. जेम-तेम पुन्हा अग्नि लावून मंडळी घरीं परतली! त्या मंडळींत न प्यालेला किंवा कमी प्यालेला व म्हणून त्यांतल्या त्यांत शुद्धीवर असा एकच होता. तांबडं फुटायच्या आधीं तो परत एकटाच स्मशानांत निघाला. त्या गृहस्थाची पत्नी त्यानं ज्या स्वरूपांत पाहिली तो देखावा तो ह्या जन्मांत तरी

विसरणार नाहीं ! कमरेपासून वर बाई होती तशी होती ! दुपारीं पुन्हां मंडळी सरळ चालत गेली व मग त्यांनीं सारं भस्मसात् केलं !

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरांतसुद्धां केव्हां केव्हां भरपूर माणसं मिळत नाहींत. स्मशानयात्रेला जाणाऱ्या नवऱ्यांना अडविणारी अशी एक बायकांची दीडशहाणी जात असते. आमंत्रण आलं कीं बाई बाहेरच्या बाहेरच सांगतें कीं, 'त्यांना बरं नाहीं-पडसं आलंय् !' माणसं गंभीरपणं चालत नाहींत. त्याचं एकंदरींत वर्तन गैरशिस्त असतं असं आपल्या अगदीं नेहमीं पहाण्यांत येतं व नेहमीं पहाण्यांत येतं म्हणूनच कीं काय आपल्याला त्याचं कांहीं वाटत नाहीं ! धीमेपणानं चालणारा तो ख्रिश्चन समाज पहा ! गंभीर ललकाऱ्या मारीत चाललेला तो मुस्लिमवृन्द पहा ! आणि 'प्रमोशन्'च्या गप्पा मारीत किंवा राजकारणावर गप्पा मारीत निर्लज्जपणें चाललेला हा पांढरपेशा पुळचट वर्ग पहा ! आमच्यांत माणुसकी नाहीं असं थोडंच आहे ? आम्हीं प्रेमळ नाहीं असंहि नाहीं. आम्हांला कां भावना नाहींत कीं इतर मानसिक संवेदना नाहींत ? सर्व कांहीं आहे ! पण आपली वागण्याची पद्धत आज इतकीं वर्षं पद्धतशीरपणें चुकत आली आहे कीं त्यांत कांहीं चुकत आहे असं आपल्याला वाटतच नाहीं ! लढाईच्या पूर्वीं मगनलाल आणि छगनलाल ह्या बंधुद्वयाची मातोश्री पार्ल्यास वारली. म्हातारी आटपून पांच मिनिटं झालीं नव्हतीं. मगनलाल छगनलाल यांचे पहिले पुसट हुंदके कुणी ऐकलेहि नव्हते, तोंच तार आलीं कीं, एक डबा भरून ( Wagon-full ) अमुक अमुक माल ताबडतोब पाठवावा. धोतराच्या सोग्यानं अश्रु पुशीत मगनलालनं छगनलालला ताबडतोब फर्माविलं, "छगन ! आने सारा जबाब आप्या के ?" ज्या वृद्धेनं ह्या दोन कारट्यांना जन्म दिला तीं दोघंहि जन्मतांच डाकोरनाथाच्या घरीं गेलीं असतीं तर ?

प्राणलाल व जीवनलाल ह्या सहोदरांची आई वारली. प्राणलाल मोठा. त्यानं जीवनलालला पंच्याहत्तर रुपये दिले व अंत्यविधीचं सामान आणण्यास सांगितलं ! कांतिलाल नांवाच्या मित्राला सोबत घेऊन जीवनलाल घराबाहेर पडला व आपल्या दोस्ताच्या पाठीवर एक भली मोठी थाप मारून म्हणाला, "यार ! यांतदेखील आपण दहा पंधरा रुपयांचं 'कमिशन्' खाणार !!"

अरेरे ! दुर्दैवी हिंदुस्थाना ! शब्दाकरतां राज्य सोडणारे राजे ज्या देशांत जन्मले, वचनाकरतां दारिद्य ज्यानीं खुषीनं कवटाळलं, मर्दुमकी गाजविण्याकरतां अश्वावरच कोरडी भाकर खाऊन ज्यांनीं शत्रूंना कंठस्नान घातलं, इमान राखण्याकरितां ज्यांनीं आपले प्राण पणास लाविले त्याच...त्याच देशांत आज असे विषारी कीटक निपजावेत ना ? माणुसकी नाहीं, मृताविषयीं आदर नाहीं, जिवंत आहेत त्याबद्दलची तमा नाहीं ! शिस्तीच्या कांटेरी लगामानं आम्हांला जखडून ठेवलं नाहीं तर मिळालेल्या स्वातंत्र्याची स्मशानयात्रा आम्हांला लौकरच काढावी लागेल—आणि ती पण त्या गृहस्थाच्या बायकोसारखी ! ! !

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38000 विः निबंध
क्रमांक 9448 नोंद दि. 30/8/94

१८

# गहिंवराचें दहिंवर

एअर्-इंडियाचं बोईंग म्हणजे जादूचा उडता महालच ! पंधरा ऑगस्टची स्वातंत्र्यदिनाची शुभरात ! परदेशगमनायच ! रिमझिम पाऊस पडत होता. ढेंगभर चाललों तर भिजूं ना ! म्हणून आलिशान बस समोर डौलांत ठाकली.

पावसाचे चार थेंब गालावर पडलेच होते. डोळ्यांतले अश्रु त्यांत सामावले. कुणाच्याहि तें लक्षांत आलं नाहीं. माणुसकीचा गहिंवर–दहिंवर ! हातांतली बॅग् सांवरीत सांवरीत अस्मादिक बस्मध्यें स्थानापन्न झाले.

मला उडवीत नेणारं तें यान धांपा टाकीत समोर पसरलं होतं ! आपल्या उपाशीपोटीं तें आपल्या जीवनदायी पेयाचं प्राशन बकासुराला लाजवीत करीत होतं.

गडबड आमचीच चालली होती. बाकी मामला थंड वाटला. सर्वजण स्थानापन्न झाल्यावर पायलट डुलत डुलत आला. त्याच्या व रेडिओ ऑफिसर्च्या प्रसन्न मुद्रेमुळं मला उगाचच बरं वाटलं. हो ! सारथी हंसतमुख असावा !

सळसळीत रेशमी साड्यांचे पदर फलकावित वायु-कन्या (Air-Hostesses) आपलं नांव सार्थ करीत होत्या. त्यांचीं कामं अगदीं यंत्रासारखीं चाललीं होतीं. त्यांना विमानाच्या प्रवासाची इतकी संवय झाल्यासारखी

वाटत होती कीं, मला तर वाटलं कीं, ह्या वायु-कन्यांना जमिनीवरच काय तें अडखळल्यासारखं वाटत असेल.

इवल्याशा कांचेरी गवाक्षांतून विमानतळावरचे रंगीबेरंगी दिवे झगमगत होते. इतक्यांत 'फॉट् फर्रऽऽ' असे एकापाठोपाठ चार स्फोट होऊन तें अजस्र धूड सजीव झालं. कंपायमान झालं...दोलायमान झालं! झालं! कांहीं क्षणांतच मी भारताला सोडणार होतों. विमान सरपटूं लागलं. अजूनहि माझा व माझ्या देशाचा दुवा तुटला नव्हता! एक खूप मोठा वळसा घेऊन विमान थांबलं. 'फर्रऽऽ' असा आवाज करीत फुरगटून बसलं! कंट्रोल्–टॉवरमधून 'उडा' ह्या हुकुमाची ते वाट पहात खुटाळलं होतं!

दुसऱ्याच क्षणीं तें पुढं सरसरलं. अजूनहि भूमीचा खरखराट विमानाच्या टायर्सना सतवीत होता...अजूनहि...अजूनहि...

झालं! भूमि सोडलीच कीं! साठ अंशाचा कोन करून आम्हीं अस्मानांत उडालों...तों...तों खालीं विमानतळ...गेला—बुडाला—दृष्टिआड झाला... अरे! हा समुद्र! अरेऽऽ! हाजिमलंगची टेकडी समोर! पांचदहा मिनिटांत मी अनंताच्या पोकळींत शिरलों...

अनंताच्या पोकळींत डुबी मारल्याशिवाय माणसाला आपल्या क्षुद्रतेची जाणीव होत नाही हेंच खरं! उंच, उंच, खूप, खूप उंच! ढगांच्या राशींच्या खूप, खूप वर. मी बाहेर पाहिलं. फिकट चंद्राचा तुकडा अस्मानांत केंविलवाण्या अवस्थेंत पडल्यासारखा वाटला. कंटाळून कंटाळून एखाद्या बालिकेनं आपल्या पायांतल्या तोरड्या कोंपऱ्यांत भिरकावून द्याव्या तसा!

लाख लाख तारकांची अब्दागिरी माझ्यावर ढाळली जात होती. विश्वाचं हें भयानक, अवाढव्य, रौद्र स्वरूप पाहून अंतर्यामीं थरकांप होत होता. वाटलं...गहिंवराचं दहिंवर कुठं आढळेल का?

विचार करतां करतां डोळा लागला. साडेपांच तास मी झोपलों असावा! कारण वायु-कन्येचे स्पष्ट शब्द कानांवर आदळले.

आपण बेरूट्जवळ येत आहोंत...! माझे डोळे खाडकन् उघडले! खालीं बेरुट् झगमगत होतं. समोरचा चंद्रमा वेगळाच वाटला! पसरट, आडवा...लोडावर विसावलेल्या एखाद्या घरंदाज खानसाहेबासारखा!

विमानतळाचा नेम धरून विमान नेमकं खालीं उतरलं! होय! परभूमीला आज प्रथम स्पर्श करणार होतों. पृथ्वी माझी, आकाश माझं, माती माझी,

पाणी माझं, वगैरे सर्व गिळंकृत करण्याच्या कल्पना कितीहि काव्यपूर्ण असल्या तरी प्रत्यक्ष व्यवहारांत समोर भेटतो तो कस्टम्‌चा अधिकारी !

विमानांतून उतरलों तेव्हां समोरच लेब्यानिज्‌ वायु-कन्या आढळल्या ! घाऱ्या, घाऱ्या डोळ्यांच्या उन्मत्त वाघिणी ! उंच, गुलब्रट गोऱ्या, टंच नि बांधेसूद !

मी उतरलों ! अंगांतून एक शिरशिरी चमकून गेली. हिरव्या ध्वजाच्या, चांदच्या ताजव्याचं अधिष्ठान असलेल्या, तंबूप्रधान, सुरीप्रधान, खजूरप्रधान प्रदेशाच्या अधिराज्यांत मी उतरलों होतों. हरवस, रानवट वारा नासिकेंत झिणझिणला !

पासपोर्ट चेकिंग....कस्टम्स्‌ वगैरे ! ठीक आहे ! पैसे बदलून घ्यायचे होते. ते घेतले नि खालीं आलों ! हाय ! त्या रात्रीं, दीडच्या सुमारास मला एकट्यालाच मागं टाकून एअर इंडियाचा कोच्‌ माझ्या हातावर तुरी देऊन सटकला होता ! इथं गहिंवर नाहीं नि दहिंवर नाहीं ! आटलं सर्व !

वा ! काय पण टॅक्सी ? बेरूट्‌सारख्या टॅक्सीज्‌ जगांत नसतील ! कुठल्याहि देशांतल्या पंतप्रधानांना वापरण्यास योग्य अशा चकचकीत, प्रशस्त गाड्या !

असल्याच एका राजेशाही टॅक्सींतून मी ' हॉटेल बियारिझ्‌ 'मध्यें आलों. सामानसुमान ठेवल्यावर नेहमींच्या संवयीप्रमाणं मनसोक्त स्नान केलं ! झोंपण्याचे कपडे घातले, तेव्हां पहांटेचे तीन वाजले होते.

उजाडता शनिवार होता. बॅग उघडली. बेड्‌लाईट लावून शनिमहात्म्य वाचूं लागलों ! तो आनंद आगळाच होता, न्यारा होता. शनिमहाराजांच्या आकस्मिक कृपेमुळें परदेशगमनाचा योग साडेसातींतहि मला आला होता अशी माझ्या मनाची धारणा होती. परदेशांतला पहिला उजाडता दिवस शनिवार होता हाहि योगायोग !

शनिमहात्म्य वाचल्यावर बिछान्यावर पडण्याकरतां देह पसरला तोंच माझा मीच चकित झालों ! समोरच्या उघड्या दरवाजांतून झुंजुमुंजु झाल्यासारखं वाटलं ! एवढ्या पहांटेसच गुलब्रट छटा आभाळाला खुलवित होत्या ! पडल्या पडल्या नीळसर मेडीटरेनिअन्‌ सागर मी न्याहाळीत होतों ! त्याकडे पहातां पहातां, तें अगाध निसर्गसौंदर्य पितां, पितां डोळे भावनेनं ओले झाले...व नकळत मिटले देखील !

बेरुट्चा खाना ला जवाब ! न्याहारी अशी मस्त होती कीं विचारूं नका ! ब्रेड्, बटर्, टोस्ट् , मार्मलेड्, ऑम्लेट, जॅम् ...सर्व... सर्व ... चहाशिवाय सर्व कांहीं ए वन् !

कपडे करून मी बाहेर पडलों तो थेट माझे मित्र मायकल तुमांच्या ऑफिसांत गेलों. ते मुंबईस आले होते तेव्हां आमची गट्टी जमली होती. मला पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनीं कडकडून मिठीच मारली. मध्यपूर्वेंतला माणूस हा अतिशय भावनाविवश आहे. तो मैत्री जमल्यावर आपल्याकरतां जीवसुद्धां देईल ! आदरातिथ्यांत तर साऱ्या जगाला मागं टाकेल !

व्यवहारी जगांतला सत्यपणा इथं नाहीं. इथं आहे विशुद्ध भावनांचा खळखळाट ! लेबॅनॉन्, इराक, सिरिआ, सौदी अरेबिया...सपाट तांबूस माती... सुपीक जमीन ! कलिंगडं, टरबुजं, वाळवंट, वाळवंटांखालीं करोडों रुपयांची भूमिगत लक्ष्मी–तेल ! दुर्भिक्ष पाण्याचं–तेलाचं नव्हे ! कुरूप पण उपयुक्त प्राणी उंट. हा जन्माचा साथीदार ! वाळवंटाच्या आडोशाला मधूनच कुठं कुठं भांगेंतल्या तुळशीसारखी उगवणारी हिरवळ, तंबूप्रधान भटक्या संस्कृतीमधून उमटणाऱ्या हार्दिक आदरातिथ्याचा मद्यमांसमैथुननिर्मित ढालगज झंकार ! खजुरांची खैरात ! लांब पांढऱ्या झग्यांची रेलचेल ! मस्तकांवर पांढरी फडकीं ! त्या भंवतालीं बांधलेलीं काळीं दोरखंडं ! ह्या व बाजूच्या प्रदेशांत वालुका जास्त म्हणूनच बसराई मोती विपुल कीं काय कुणास ठाऊक !

माझ्या दिमतीला गाडी होती. एक अधिकारी होता. कुठंहि जाण्याची इच्छा मी फक्त प्रदर्शित करायची !

" आज रात्रीं आठ वाजतां आपण जेवायला या हं ! मी आपल्याला पिक् अप् करीन... "

मी त्यांचा निरोप घेऊन निघालों. बेरुट हें एक अत्यंत टुमदार व सुंदर शहर आहे. चौदा वर्षांच्या मुलीची टापटीप व सौष्ठव त्या शहरांत आहे ! जनता नितांतसुंदर ! गुलाबी रंगाची खैरात विधात्यानं स्त्री–पुरुषांच्या कपोलांवर केली आहे.

रात्रीं आठच्या ठोक्याला तुमा माझ्या खोलीवर आले. मी तयार होतोंच. तिथून पंधरा मैलांवर जगप्रसिद्ध कॅसिनो होता. आम्हीं तिथं जेवणार होतों ! कॅसिनो म्हणजे जुगारगृह ! असल्या ठिकाणीं जाण्याचा हा पहिलाच प्रसंग !

" तुमा ! " मी.

" काय ? "

" आपल्याला तें खेळणं कांहीं जमणार नाहीं ... "

" ओ नो ! आपल्याला जेवायचं आहे फक्त ! नुसता पहा तर खरा आमचा कॅसिनो ! जगप्रसिद्ध आहे. "

कॅसिनोची भव्य इमारत समोर झळाळूं लागली. विजेच्या दिव्यांचा लखलखाट होता. एका विस्तीर्ण प्रांगणांत गाडी त्यां नींउभी केली. समोरचं दृश्य पाहून मी स्तिमित झालों. एक अजस्र दगडी इमारत राजवैभवांत झगमगत होती. उंच, उंच दगडी खांबामुळं त्या भव्यतेला राजस प्रासादाची राजेशाही शोभा आली होती. समोरचींजीं कारं थुय्थुय् करीत अस्मानाकडे झेंपावत होतीं. बाजूला सुमधुर बँड वाजत होता. त्या वेगवेगळ्या कारंज्यांतील पाण्याचे फवारे, इन्द्रधनुष्याचे सप्तरंग, वेळोवेळीं परिधान करीत ! आतां हिरवट असलेलं कारंजं क्षणांत गुलबट होई व जांभळ्यांत केव्हां मिसळे तें समजतहि नसे. एखाद्या मोहमय इन्द्रसभेंत आल्यासारखा मला भास झाला ! तुमानीं माझा दंड धरला !

" चला ! "

मंत्रमुग्धासारखा मी चालूं लागलों. "

एवढं भव्य स्वप्न साकार करणाऱ्या त्या विभूतीकडे मी पहातच राहिलों.

" देशमुख ! वीस कोट रुपये खर्च आला. वीस कोट रुपये ! "

मी स्तंभित झालों.

" काय ? वीस कोट ? "

" होय ! "

" चला, दाखवतों तुम्हांला ! "

इथं सगळंच अवाढव्य होतं ! नृत्यगृह केवढं प्रशस्त ! पेयगृह...धूम्रपान-गृह, वाचनालय, स्वीमिंग पुल्स् ! गेम्स् रूम्स्...दालनंच्या दालनं ! माझे पाय थकले, पण दालनं थकलीं नाहींत ! शेवटीं वरच्या मजल्यावर आलों !

जुगार खेळण्याचे कैक प्रकार तिथं होते. रौले हा जास्त ! पत्त्यांचे ... कसले कसले अनेक ! रौलेचं चक्कर म्हणजे सैतानी चक्कर ! फांसे गळ्याला फांस लावतात. हें पहा देशमुख ! जगांतले सारे श्रीमंत लोक इथं मजा करायला येतात. इथं करोडों, अब्ज अब्ज, रुपये उधळतात. माझं सरकार

हा कॅसिनो चालवितं! आम्हांला कोट्यवधि रुपये कर मिळतो. माझ्या देशाला ह्या कॅसिनोनं अगदीं वैभवशाली केलं आहे बघा... ''

मी चकित झालों होतों. एखाद्या सरकारनं धंदा म्हणून हा असला प्रकार चालवावा हें माझ्या सरळ हिंदु मनाला पटत नव्हतं. पांडवांची फटफजिती माझ्या मनावर लहानपणापासून कोरली गेली होती व त्यामुळं मला हें रुचत होतं, पण पटत मात्र नव्हतं!

त्या जुगारगृहांत अमेरिकन्स्, इंग्लिश, जर्मन्स्, डेन्स्, स्पॅनिश...सर्वच संपन्न धेंडं होतीं. संपत्तीनं पायांशीं लोळण घेतल्यामुळं त्यांच्या मुद्रेवर एक संपूर्ण बेफिकिरी, उर्मटपणा पसरला होता. बाल्यावस्थेपासून मांसाहार व वयांत यायच्या आधींपासून मद्यपान केल्यामुळं त्यांच्या मूळच्या गौर वर्णाला एक तुपाळ लकाकी प्राप्त झाली होती! चकाकणारे घारे, निळे व गर्द तपकिरी डोळे, हिंस्र पशूंच्या फिरकीनं गर्रर्र, गर्रर फिरत. बांधेसूद पुष्ट देहांवर उंची गरम सूट फिट् बसल्यामुळं त्यांचं पुरुषी सौंदर्य मोठं खुलून दिसे! उंची अत्तराचा घमघमाट हवेंतली मादकता वाढवी. किंमती सुगंधी तंबाखू पेटलेल्या चिरुटांतून आपापल्या मालकांचा सामाजिक दर्जा अगदीं ठणकावून सांगत असे! उंची उंची मद्याचा मादक दर्प वातावरणांत मिसळून तिथलं धुंद वातावरण आणखीनच धुंद करण्यास मदत करायचा! अन् हें सर्व कमी म्हणूनच कीं काय रसरसलेल्या युवति आपापल्या मधुर नि विलोभनीय विभ्रमांनीं, आसमंत कटाक्षाकटाक्षानं घायाळ करून टाकायच्या!

केवळ द्रव्याचा उपसा काढण्याकरतां तें योजलेलं व निर्माण केलेलं एक षड्यंत्र आहे असं मला वाटलं! मला मिळालेली शिकवण वेगळी होती, अगदीं अगदीं वेगळी होती.

भारतीय आकांक्षा चंद्रमौळी झोपडी झोपडींतूनच मंदमंदपणें पाजळल्या! पंचमहाभूतांची पूजा करण्यास आपण लहानपणापासूनच नकळत शिकलेले! आपला धर्म नि संस्कृति त्यागप्रधान! विरक्ति हा तर आमचा स्थायीभाव! सर्वसंगपरित्यागाची शिकवण पुराणांतून खच्चून भरलेली व आमच्या हाडामांसांत खिळलेली! पांडवांनीं द्यूत खेळण्याचा उपद्व्याप केला कधींकाळीं तो इतक्या भयानकपणें अंगाशीं आला! आपली खुद्द बायकोच जुगारापायीं गमवावी लागते व एक नाहीं, दोन नाहीं, चांगले पांच बलाढ्य नवरे असूनहि अब्रूवर घाला येऊं शकतो हें जळजळीत उदाहरण भारतवासीयांच्या

पुढं असल्यामुळं ह्या भयानक बोलक्या पार्श्वभूमीवर मला तो कॅसिनो जरी नितांतसुंदर व रमणीय असा वाटला तरी द्रौपदीचा धांवा, पाश्चिमात्य संगीताच्या झंकारांतहि मला तेव्हां स्पष्टपणें ऐकूं येत आहे, असा भास झाला ! पांच पांडवांच्या काळवंडलेल्या मुद्रा माझ्या दृष्टीसमोर थैमान घालूं लागल्या.

रौलेची सैतानी चक्रं गरगर फिरतच होतीं. लक्ष्मीचा चक्काचूर डोळ्यांसमोर होत होता.

" चला ! आपण जेवूं या ! "

मला बरं वाटलं ! त्या जुगारी वातावरणांत मला अगदीं गुदमरल्यासारखं झालं होतं !

जन्माला यावं नि बेरुट्ला जेवावं—नि तें पण तिथल्या कॅसिनोमध्यें; एका प्रशस्त टेबलावर आम्हीं दोघेच होतों. तुमा म्हणजे एक फार बडं असं प्रस्थ होतं ना !

क्रॅब् सूप फक्कड ! भुकेला उत्तेजक ! पोटांत ऊब आली ! त्यानंतर धमाल ! वीस वीस, पंचवीस पंचवीस ! छोट्या बशांतून वेटर्सनीं अगणित मांसाहारी पदार्थ आणले नि आम्हीं ते हाणले. दोन अडीच तास तें राजेशाही भोजन चाललं होतं. हलुवार, नाजुक थंडी गालांवर टिचक्या मारीत होती. उत्तेजक झुलत्या वाद्यवृंदाचे झंकार देहाला बसल्या बसल्याहि दोलायमान करीत. वैपुल्य नि समृद्धि, वैभव नि श्रीमंती ह्यांचा दिव्य विलास मन मोहून नि मोहरून टाकीत होता. फुलपांखरांच्या रंगांशीं स्पर्धा करणारीं कारंजीं आपला इन्द्रधनुष्यी कायाकल्प नियमितपणें करीत होतीं. सुखसंवेदनांच्या झुलत्या, तरंगत्या लहरींवर मी हिंदकळत होतों. क्षणभर तर असंहि वाटलं कीं, देहाचं वजनच नाहींसं झालंय् ... मी एखाद्या फुलपांखरासारखा स्वच्छंदपणें बागडतोय् ... जीवनाच्या फुलबागेंत मी माझे सुरंगी पंख फडफडवीत आहे ... मजेनं ... डौलानं ... जोमानं !

रात्र संपली असती पण आमच्या मौजा व गप्पा संपल्या नसत्या ! मी वर पाहिलं ! कालचाच चंद्रमा ! आणखीनच लोळपटला होता – आळसटला होता... आयुष्यांतले हे क्षण अगदीं वेंचक होते, सोनेरी होते...धुंद होते !

" चला " शेवटीं मीच म्हटलं.

एक शब्दहि न बोलतां आम्हीं मोटरपाशीं आलों.

" उद्यां जायलाच हवं का दिश्मुख ! "

" होय. " मी दुःखानं म्हणालों.

" रहा की चार दिवस ! "

" सॉरी ! जमायचं नाहीं ! "

" हूँ " त्यांनीं सुस्कारा टाकला. एकाएकीं त्यानीं माझे दोन्ही हात गच्च धरले. त्याचे डोळे पाणावले होते–माझेहि !

" गुड् बाय्...गुड् नाईट...कम् अगेन्. " ते कसंबसं म्हणाले.

आम्हीं दोघेहि अगदीं भारावून गेलों.

दोघांच्याहि डोळ्यांतून सरसर सरी वाहूं लागल्या ! त्याचवेळीं चारसहा पावसाचे थेंब आमच्या गालांवर आदळले.

चंद्रानं साथ दिली होती...गहिंवराचें दहिंवर !

★★★

ग्रंथालय ठाणे
दा. क्र. १४३७४

# १६ ना. गव्हर्नरसाहेबांसमवेत न्याहारी

प्रारब्धानं आज मला चंदीगडला आणलं होतें. धूसर पहांटे मी राजधानींत प्रवेश केला. गाडीबाहेर, गगनाच्या विस्तृत पटलावर लोकमान्यांची मूर्ति माझ्या मनःचक्षूंसमोर पाठशिवणीचा खेळ खेळीत होती. कां कुणास ठाऊक, पण मनाला एक विलक्षण हुरहूर लागली होती.

इथलं आमदारांचं निवासस्थान रम्य आहे. मी तडक राजभवनांत टेलिफोन केला. चोप्रा नांवाचे गृहस्थ म्हणाले, " कोण देशमुख ? " काकासाहेबांना मी आल्याचं कळतांच त्यांनीं 'ताबडतोब या' असा निरोप धाडला व पांच मिनिटांत अस्मादिक पंजाब सरकारच्या पोपटी गाडींत बसून राजभवनाकडे मार्गस्थ झाले !

पंजाब सुंदर आहे. नितांतसुंदर आहे. हिरवळ...हिरवे, हिरवे रम्य गालिचे ...हरित तृणांच्या मखमालीचे ... गारवा ! नेत्रांना व मनाला !

अल्पावधींत आम्हीं प्रवेशद्वारापाशीं आलों. टुमदार पिवळ्या चौकींतून पोलीस अवतरला. खडी ताजीम त्यानं दिली. गाडी पुढं चालली.

राजभवनाभंवतीं सुंदर बगिचा विखुरलेला आहे. हव्या असल्या तर काका-साहेबांना दुर्वांना इथं तोटाच नाहीं. रोज सहस्रनाम नव्हे – कोटिनाम करावं. किंचित् दगडी, क्वचित् लाल विटांची व कपाळावर आडवं पांढरं गंध चोपडावं तशी एक भिंत, असं त्याचं बाह्यांग आहे अगदीं अव्ययावत् !

दोन चपराशी आले. माझ्या ( म्हणजे त्यांच्या ) मोटरचा दरवाजा त्यानीं उघडला. पुनश्च सलाम ! मी आंतल्या दालनांत गेलों. बसा म्हणून कुणीतरी मधुर आवाजांत सांगितलं एका मिनिटाच्या आंतच " चला साहेब, या बाजूला " असें मार्गदर्शन करण्यांत आलं.

एका भव्य टेबलामागं काकासाहेब बसले होते. पुस्तकांचा व कागदांचा ढिगारा समोर पसरला होता. दोन टांक चांदीचे त्यांच्या सिद्धहस्तांची आतुरतेनं वाट पहात होते. काकासाहेबांनीं मात्र स्वच्छ खादीचा साधा अंगरखा, सफेद पायघोळ धोतर परिधान केलं होतं. मस्तकावरचे धवल केश जेव्हां भुरूभुरू उडत तेव्हां मला वाटायचं कीं ह्या व्युत्पन्न द्रष्ट्याच्या मेंदूंतलं सहस्रदलकमल फुलून त्याच्या पाकळ्यांचा हा फडफडाट तर होत नसेल ?

काकासाहेबांची वाणी रसाळ, पल्लेदार व आग्रही आहे. विचारांची मांडणी तर्कशुद्ध व बिनतोड ! कांहीं मतं ठाम ! राजकारणांतले अनेक उन्हाळे-पावसाळे पचविल्यामुळं व रिचविल्यामुळं चेहऱ्यावर एक पुणेरी निर्भयता ! काय म्हणालों मी ? पुणेरी निर्भयता ? होय ! पुणेरी निर्भयता ! ह्याच निर्भयतेमुळं मुंबई हायकोर्टाच्या अजस्त्र दगडी भिंती, ' त्या ' वाक्यामुळं थरथरल्या होत्या !

आजवरी लढाया झाल्या
पोरखेळ पोरांचे ते ...
हैदोस कसा घालावा,
शिकवीन आज मी त्यांतें ...

( तिवारींचीं संग्रामगीतें )

ही सदाशिवरावांची सिंहगर्जना पानपतला झाली असली तरी त्यांची जडण घडण पुण्यांतलीच. अन् हें कशाला ? परवांच पुराचा एवढा राक्षसी तडाखा मिळाला ...

" कांहींसें प्याले होतें ...
त्या मुळामुठाचें पाणी ... "

( तिवारी )

तरी आपले पुणेकर त्या भग्न कवाडांतून कसे गोड, मिस्कीलपणें, पुणेरी रंगेलपणानें हंसत मुळामुठेला डिवचीत होते !

संभाषण रंगत चाललं होतं. त्यांत मध्येंच खंड पाडून काकासाहेब म्हणाले,

“ आंत चला देशमुख.

न्याहारीचा वखुत होईल ... ”

काकासाहेबांनीं थेट मला न्याहारीलाच बसविलं, अदबीनं बेअरर्स, पावलांचा आवाज न करतां कामं उरकीत होते. त्यांचे चेहरे गंभीर होते, नम्र होते, संतुष्ट होते. चिंता एकच असल्यासारखी मला वाटली कीं न्याहारी पाहुण्यांना आवडेल कीं नाहीं ?

“ काय लागेल तें मागवा ” काकासाहेबांनीं अगदीं घरगुती आग्रह केला. इतक्यांत त्यांच्या पत्नी व कन्या ह्याहि आल्या.

“ कॉर्न फ्लेक्स्...ऑम्लेट...टी... ” मी म्हणालों. काकासाहेबांनीं कसलीशी भाकरी व लोणी मागविलें. त्यांचा तो साधेपणा पाहून मलाच जरा चमत्कारिक वाटलं. बडोद्याचे थोरले महाराज ( सयाजीराव ) सोन्याच्या ताटांत पंचपक्वान्नं सेवीत पण त्या ताटाच्या मध्यभागीं एक चतकोर भाकर मानाच्या जागीं ठेवली जात असे, असं मला कुणी सांगितलं होतं तें मला आठवलं ! आपण तर राकट व कणखर देशांतले.

पुराच्या गोष्टींना पूर आला. काकासाहेब तळमळीनें सांगत होते. ते होते चंदीगडांत पण त्यांचं सर्व लक्ष पुण्यांत व नारायण पेठेंत होतं. त्यांचं स्वतःचं चारपांच हजार रुपयांचं नुकसान झालं होतं. त्यांनीं दिलेल्या हजार रुपयांखेरीज त्यानीं त्यांच्या बोळांत चारपांचशें रुपये वांटले.

मी पुरांतल्या हृदयंगम व चित्तथरारक हकीकती त्यांना सांगितल्या. पंडितजींना एका वृद्ध ब्राह्मणानें एक चांफ्याचं फूल दिलं व तो बिचारा कळवळून म्हणाला, “ तुम्हांला द्यायला आतां एवढंच शिल्लक राहिलं आहे ! ” कुणी एका विद्यार्थ्यानें फाऊन्टन् पेन् दिलं. लक्ष्मण जैन नांवाच्या मुलानं आपलं घड्याळ दिलं ...

हें सर्व झालं ! पण पुणं हटलं होतं का ? पराभूत झालं होतं का ? खचलं होतं का ? छट् ! बात नको ! पावनखिंडींतल्या बाजीसारखं तळहातावर शिर घेऊन तें लढलं. मुठेला अजून मूठ उगारून दाखवीत आहे.

(कॉर्न फ्लेक्स् इथं संपलं ! ऑम्लेट् आलं !) मी विषयांतर केलं. दादरच्या वसंत व्याख्यानमालेंत प्रश्नमालेच्या कार्यक्रमांत त्यांचे चिरंजीव बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ व आम्हीं कशी धमाल उडवून दिली हें त्यांना विशद करून सांगितलं. त्यांना फार बरं वाटलं ! कृ. पां. कुळकर्णी यांचा 'कृष्णाकांठची माती' हा ग्रंथ वाचलांत का म्हणून मी पृच्छा केली. ते म्हणाले, "त्याचा परामर्श वाचला, पण ग्रंथ मिळाला नाहीं." "तो मी सोबत आणला आहे; अवश्य पाठवीन" असा दिलासा मी दिला.

(इथं ऑम्लेट् पंचतत्त्वांत विलीन झालं होतं !) मग चहाचे घुटके घेत घेत त्यांच्या लेखनाकडं मी वळलों. काकासाहेबांपुढची दशमी लोणी संपुष्टांत आली होती. "ती रात्र व ही रात्र" ... "मी भजीं खाल्लीं" वगैरे गाजलेल्या लेखांचं मी पुनश्च रसग्रहण केलं. वाङ्मयाच्या रेशमी तंतूनीं दोन जीव बांधले गेले असले म्हणजे बाकीचा ऐहिक फापटपसारा हा कवडीमोल वाटतो. न्याहारी संपली. काकासाहेबांनीं राजभवन स्वतः मला दाखविलं. दहा खोल्यांचं आधुनिक, ऐसपैस व टापटीपीचं. मधीं जलाशया-करतां एक छोटा हौद, त्यांतला बुडाला लावलेला निळसर रंग खास त्यांच्या पसंतीचा !

मी त्यांचा निरोप घेतला. त्या राजवैभवांत, त्या चमचमत्या पाचूसारख्या राजभवनांत, काकासाहेब गाडगीळ एखाद्या विरक्त योगेश्वरासारखे मला वाटले ! प्रज्ञेपुढं लक्ष्मीची काय चाड ? व्युत्पन्नतेपुढं व्याज काय भाव खाणार ? अन् पांडित्यापुढं कनक काय चमकणार ? जाण्यापूर्वी पुनश्च भेटण्याचं त्यांना कबूल करून मी टुणकन् त्या पोपटी मोटारींतून निसटलों !

★★★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७०० वि: [illegible]
क्रमांक १५८८ नों वि: २०।७।६५

# १७ उंबरठ्यावर

आज महाराष्ट्रीय सुशिक्षित स्त्री उंबरठ्यावर साशंकतेनं उभी आहे. महाराष्ट्रीय स्त्रियांबाबत ठोकळ मानानं असं म्हणतां येईल कीं त्यांना मुंबई, पुणें, नागपूर इत्यादि शहरांतल्या ललना ह्या कांहीं दृष्टीनं आदर्श वाटतात.

त्या तशा आदर्श वाटाव्यात ह्याचं कारण म्हणजे शहरी जीवनांतला कृत्रिम झगझगाट! नागरी जीवनामुळं मुद्रेवर झळाळणारा तल्लखपणा, बोलण्याचालण्यांतली व वागण्यांतली सफाई, पदवीच्या डौलांत झुलणारा सोनेरी गोंडा, भगिनीसमाजांत झालेलीं भाषणं ऐकून आलेला बहुश्रुतपणा, वर्तमानपत्रांच्या व मासिकांच्या वाचनामुळं आलेला बौद्धिक चपखलपणा!

हीच बौद्धिकतेची झूल प्रामाणिकपणें तपासण्याची वेळ आतां आली आहे. आधुनिक स्त्रीची प्रगति निःसंशय समाधानकारक झालेली असली तरी उंबरठ्यावरच उभं राहून तिचं भागणार नाहीं. झालेल्या प्रगतीचं कठोरपणें मूल्यमापन करायला हवंच! हें करतांना स्त्रीदाक्षिण्याची कसबी अफूची गोळी वापरणं शेवटीं सर्वांनाच घातुक ठरेल. म्हणून परखड भाषेंत, गैरसमज होण्याचा धोका पत्करूनदेखील, मला माझे विचार स्पष्ट करावेसे वाटतात!

**बायकोला घेऊन फिरतोय!**

चाळीस पन्नास वर्षांपूर्वींची गोष्ट! पुण्याचे एक धीट गृहस्थ मुंबईला सपत्नीक आले. त्यांचा व्यासंग दांडगा! टाइम्स प्रेस् पहायला ते सपत्नीक

गेले. त्यावेळीं अक्षरशः ती बातमी वृत्तपत्रांत छापली गेली होती ! बायकोला घेऊन अक्षरशः फिरतोय—भटकतोय...अन् तेंहि प्रेस दाखवायला ! ह्याचं फार आश्चर्य वाटून ती प्रसिद्ध झाली होती. ह्या साध्या घटनेला बातमीचा दर्जा प्राप्त झाला होता !

हें वाचून जरी कुणी आतां नाकं मुरडलीं तरी त्यांतलं तात्पर्य आपण लक्षांत घ्यायला हवं ! शनिवारीं रात्रीच्या 'शो'ला सरावानं जाणाऱ्या आजच्या भार्येला ह्या बातमीनं आश्चर्य वाटणं साहजिक आहे. पण तीन पिढ्या ... म्हणजे त्या मानानं कांहीं फार नाहींत हं ! खूपच प्रगति झाली आहे ... मोकळीकहि खूप मिळूं लागली आहे.

त्यावेळीं स्त्रियांनीं पादत्राणं वापरणं हें जवळ जवळ निषिद्धच होतं. वडीलधाऱ्या मंडळीसमोर आपल्या लहानग्यांचं कौतुक करणंहि औद्धत्याचं मानलं जाई. दिवसभर खपल्यावर व कमालीचे शारीरिक कष्ट केल्यावर, काळोखांत जिना चढतां चढतां, तांब्या-फुलपात्र सांवरीत सांवरीत माडीवर पोहोंचलं म्हणजे स्वर्ग गांठला ! त्या दिवसापुरता घाणा बंद व्हायचा !

स्त्री-शिक्षण फोंफावलं. जागृति तेजाळली. अक्षरांनीं प्रकाश दाखविला. सामाजिक स्थित्यंतरं अनेक झालीं. दोन महायुद्धं नि स्वातंत्र्यप्राप्ति, यामुळं नव्या वांट्याला आलेल्या मताचा हक्क आपोआप प्रस्थापित झाला. घटनेनं समानता दिली. एक तारखेला कित्येक स्त्रिया— हजारों स्त्रिया ...स्वतः मिळविलेला पगार आणूं लागल्या ! आर्थिक स्वातंत्र्याचा पिसाट वारा पदरांपदरांतून बेगुमानपणानं फडफडूं लागला ! छान ! इथवर छान झालं !

हें होईतों युरोपमध्यें, अमेरिकेंतदेखील स्त्री संपूर्ण स्वयंसिद्ध झालेली होती. आमच्याकडची शैक्षणिक क्षेत्रांतली क्रांति तर अगदीं ठसठशीत झाली. आतां नवे प्रश्न उभे राहिले.

पहिला प्रश्न म्हणजे जीवनांतल्या वाढत्या स्पर्धेचा ! ह्या धकाधकीच्या मामल्यांत टिकाव धरूं शकतील अशा तऱ्हेची स्त्रियांची मानसिक तयारी करण्याची एखादी तरी शिस्तबद्ध योजना आहे काय ? आज आपल्याला फक्त स्त्रियांचाच विचार करायचा आहे हें पुन्हां एकदां सांगतों ! मी तर म्हणतों कीं 'संघर्षाची तयारी' वगैरे फार दूर राहिलं ! स्त्रियांत आज साधी धमक तरी उरली आहे काय ?

प्रत्यक्षांतलं हें चित्र भलतंच केविलवाणं दिसतं. कुणी एस्. एस्. सी. होतांच किंवा कुणाचं इन्टरला ( लॉजिक्मध्यें ) नापास झाल्यावर झट्कन् लग्न होतं. कुणी पदवीधर होतात ... कुणी त्याहि वरच्या पदव्या घेतात. ह्या प्रदीर्घ काळांत एक फार मोठा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळला जातो.

परीक्षेला उपयुक्त अशाच पुस्तकांचं वाचन होतं काय ? शालेय किंवा विश्वविद्यालयीन अवस्थेंतलं जीवन म्हणजे एक स्वप्नरंजन ! पदवीच्या कागदाकडे पाहून धडपडणारं, हंसणारं, खिदळणारं जीवन ! वर्तमानपत्रांचा बहुतेक कंटाळाच ! वाचलीच तर त्यांतली लघुकथा, रविवारचे पदार्थ, भविष्य, चित्रपटांविषयीं सांगोपांग माहिती, महिलांचं पान, भरतकाम, विणकाम...ह्यांत वेळ जायचा अन् मी म्हणतो तेंहि अगदीं साहजिक आहे.

पण आंधळी कोशिंबीर सुरू होते ती वेगळ्याच तऱ्हेनं ! ह्या निष्पाप जीवनांत प्रत्यक्षाची झळ कुठंच लागलेली नसते. रजतपटावर दिसतात तसा एखादा उमदा श्रीमंत तरुण आपल्यालाहि कदाचित् भेटेल असं कांहींचं स्वप्नरंजन असतं; तर खूप शिकलेला, घरचा ' बरा ', स्मार्ट्, एखादा मिळावा अशी कांहींची अपेक्षा असते. ही महत्त्वाकांक्षा कांहीं वाईट नाहीं ! पण डबल ग्रॅज्युएट् झाल्यावर कित्येक पोरांना दीडदोनशेंच्या आसपासच नोकरी करावी लागते...नोकरी करतांना सुरवातीला पगार हा अगदीं असा कमी असतो हें सत्य आपण लक्षांत ठेवायला हवं. निदान घरच्या वडिलधाऱ्या मंडळींचं तें सांगण्याचं काम आहे !

आपला बहुसंख्य सुशिक्षित समाज नोकरीप्रधान आहे हें सत्य नाकारण्यांत कांहीं अर्थ नाहीं ! वकील, डॉक्टर्स, इंजीनियर्स ह्यांचं प्रमाण लग्नाच्या मार्केटमध्यें एक टक्कासुद्धां भरणार नाहीं ! मग बाकीच्या ९९ टक्क्याचं करायचं काय ?

तेव्हां पहिला मुद्दा असा कीं, विश्वविद्यालयाच्या मोहक भिंतीबाहेर जें खरं जीवन आहे त्याचा निदान अदमास तरी घेतलेला असावा ! इंग्रजी ही चालू बोली असल्यामुळं निदान बोलण्याची सफाई आपल्यांत किती आहे तेंहि एकदां पडताळून पहायला हवं ! नोकरी करण्याची पाळी आली अन् ती करूं नयेच असं नाहीं—पण चार लोकांशीं नीट बोलतां तरी यायला हवं !

बहुतेक मुलींचा प्रत्यक्ष जीवनाशीं संबंध तुटलेला असतो. कॉलेजांत जाणारी मुलगी हें घरांतलं मोठं भूषण आहे असा भयंकर गैरसमज माजवून

आईवडीलहि फाजील कौतुकानं एकंदर मामला मोठा ‘पेचिदा’ करतात. होतं काय कीं बहुतेक चार वर्षांनीं ‘पक्का माल’ जो तयार होतो तोच अहंमन्य, आपल्या घरांतल्या माणसांनाच कमी लेखणारा व स्वतःविषयीं भलत्याच कल्पना करून घेतलेला ! याला अपवाद असतातच.

त्यांत पुन्हां अनंत प्रलोभनं ! चित्रपट, नाटकं, रहस्यकथा, रंगेल मासिकं, पिक्‌निकस्, सुगम संगीत ! म्हणजे माझं असं म्हणणं नाहीं कीं ह्यांचा त्याग करावा ! छे ! छे ! त्यांचा संपूर्ण उपभोगहि, पण योग्य त्या प्रमाणांत जरूर घ्यावा ! मला फक्त ह्या सर्व गोष्टींचे प्रत्यक्षांतले परिणाम सांगायचे आहेत.

अशा लाडावलेल्या कन्येचा विवाह हीहि एक फार कठीण समस्या होऊन बसते. आपण हेंहि लक्षांत ठेवायला हवं कीं सर्वसाधारण तरुण हा बिचारा धडपडणारा, गांजलेला व सामान्य स्थितींतला असतो. सौंदर्य हें दुर्मिळ असतं. सर्वसाधारण तरुण काय किंवा तरुणी काय, रूपानं सर्वसाधारणच असतात. तेव्हां ‘दिसायला आपला असा तसाच किंवा अशी तशीच’ हेंच सर्वत्र आढळतं ! अशा परिस्थितींत चित्रपटांतल्या नायकांचा आदर्श समोर ठेवला तर जन्मभर अविवाहित रहायची पाळी यायची !

कुणाला रहायला जागा नसते. कोण कुठं, तर कोण कुठं आपलं अंग टाकून रात्रीं झोंपून जातो. ह्याचीहि खूप जाणीव असायला हवी. अत्यंत प्रतिकूल अशी अवस्था आज आपल्या समाजाची आहे, हें कठोर सत्य कधींहि विसरून चालणार नाहीं ! सिनेमांत दिसणारीं मोठमोठीं दालनं सिनेमांतच राहतात. प्रत्यक्षांत असते एक अंधेरी खोली...पावसाळ्यांत गळणारी ! चांगली मोठी जागा घ्यायची ऐपत लागते. आजच्या पुरुषाचा पुरुषार्थ भयानक परिस्थितीमुळं बहुतेक साफ चिरडून टाकलाय् ! जागेची टंचाई, वाढती महागाई, कपड्याचं दुर्भिक्ष्य...रुपयाची आकसणारी किंमत— ह्याबरोबरच व्यस्त प्रमाणांत वाढणाऱ्या आणि वाढलेल्या अपेक्षा, दबून ठेवलेल्या महत्त्वाकांक्षा अन् चिरडलेलीं स्वप्नरंजनं यांचीहि दखल घ्यायला हवी.

पूर्वीच्या जांवईबापूंना दिवाळसणाला एक तोळ्याची अंगठी दिली कीं सर्वांच्याच अंगावर मूठभर नव्हे मणभर मांस चढल्यासारखं वाटे ! आतांचा एखादा ॲड्व्हान्स्ड जांवई, स्कूटरचा नाहींतर रेडिओचा हट्ट

धरतो. कर्ज काढून त्याचा हट्ट पुरविला गेला तरी जांवईबापूंची कुरकूर थांबणारी नसते ! असमाधान ! असमाधान ! सर्वत्र असमाधान !

हें असमाधान, ही असंतुष्टता, ही रुखरुख जगभर पसरलेली आहे. ह्याच्या ज्वालेंत सारं जग होरपळून निघत आहे. तेव्हां निदान त्या ज्वालांचं अस्तित्व मान्य करण्याइतका तरी डोळसपणा आपण ठेवला पाहिजे.

गरजा वाढल्यामुळं वाढणारा असंतोष वेगळ्या तऱ्हेचा ! तो धुमसणारा असंतोष शांत होतो फक्त पैशाचा वळवाच्या पावसानं. पूर्वी लग्नांत सनई-चौघडा असला कीं भागे ! आतां बँड्चीं पथकें लागतात ! लागावीं ! मी म्हणतों तीहि हौस करावी ! झुंबरंहि न्यावीत वरातींत ! फक्त प्रश्न आहे आपल्या ऐपतीचा !

विवाहित सुशिक्षित स्त्रियांचं आज काय होतं ? हा प्रश्न फारच व्यापक आहे. ठोकळ मानानं सांगतां येईल कीं बहुतेकजणी पदरांत पडलेलं गोड मानून घेतात. पहिल्याच अपत्यजन्माबरोबर यांची कंबर 'जाते ! ' आणि नंतर हळूहळू हिंमत जाते. जिद्द मरते, हौस कोमेजते ! पुढं बाहेर पडलीच तर कडेवर मूल, नाहींतर हातांत पिठाचा डबा ! घरचं बरं असेल तर भगिनी समाज ! दोन तास उथळ गप्पा ! हास्याचीं कारंजीं ! मी म्हणतों हेंहि कांहीं वाईट नाहीं !

प्रश्न येतो तो हा कीं, एखादीचा पति दुर्दैवानं अकस्मात् आटोपला तर मग काय होतं तिचं पुढं ? आपल्या नवऱ्याचा विमा किती होता, शिल्लक किती आहे, खर्च कसा झाला ... वगैरे व्यवहार कितीना नीटसे माहीत असतात ? सर्वच अशा अज्ञानी असतात असं नव्हे - पण बँका, शेअर्स, डिव्हिडंडस्, युनिट् ट्रस्ट्, स्मॉल सेव्हींग्ज् सर्टिफिकिटें वगैरेची किती जणींना माहिती असते ?

"हे पहातात सगळं कां ऽ ऽ हीं" म्हणून यापुढं चालणार नाहीं. 'हे पहातील' पण तुमचं काय ?

बहुसंख्य महाराष्ट्रीय बायकांचा संसार म्हणजे अगदीं एकखांबी तंबू ! तो वरून किनखापी वाटतो ... पण 'ते' असेपर्यंत ! दुर्दैवानें 'ते' उलथले तर मोठा भयंकर प्रसंग ! नंतर आहे संसार चालवायची तयारी ? असतात कांहीं कर्तबगार स्त्रिया ! त्या भग्न संसार सांधतात देखील ! पण किती प्रमाणांत ?

दिवाळीच्या स्नानाला आईनं जिला हळुवारपणें आपल्या प्रेमळ हातानं न्हाऊमाखू घातलं आहे अशा एखाद्या सुकन्येला तशी विधिघटना घडल्यावर दुसऱ्या घरच्या भाकऱ्या बडवाव्या लागतात! शिकवण्या करून घसा फोडून घ्यावा लागतो. विधवा–विवाह ही अजून रुळलेली बाब समजली जात नाहीं. विधुरानं विधवेशींच लग्न केलं पाहिजे असा कायद्याचाच दंडक असल्या-शिवाय तें होणं नाहीं!

असं असूनहि हें चित्र तसं संपूर्ण निराशाजनक आहे असं मी मुळींच म्हणत नाहीं. मूळ म्हणजे शिक्षणाचा प्रसार झपाट्यानं वाढल्यामुळं, आजच्या पिढींत तारतम्यभावाची, सारासार विचाराची कक्षा वाढलेली आहे. 'आतां हवं आहे तें प्रत्यक्ष मार्गदर्शन' किंवा खरं म्हणजे प्रत्यक्षांतलं मार्गदर्शन! पाय जमिनीवर ठेवून कसं चालावं याचं प्रात्यक्षिक! वाढत्या औद्योगिकरणामुळं सुखाच्या कल्पना बदलत आहेत. पृथ्वी आतां गणिताच्या हातांत गेली आहे! गुलाब, निशिगंध, चांफा, मोगरा, बकुली ह्याऐवजीं आजचीं फुलं म्हणजे युरेनियम् २३५, थोरीयम्...हेलीयम् ... यम्.... यम्!

'हा यम्' म्हणजे तुम्हां–आम्हांला गिळून टाकायला टपलेला साक्षात् यम आहे! माणूस आहेच तस्साच राहील...पण आपल्या तथाकथित शाश्वत मूल्यांना जबरदस्त धक्का बसण्याची आतां मोठी शक्यता निर्माण झाली आहे. मातृत्व उदरांत वाढायच्या ऐवजीं 'इंक्युबटेर' मध्यें वाढेल! पितृत्व नि मातृत्वच अरुंद कांचेच्या नळ्यांत सांठविलं गेल्यावर आपले शारीरिक व्यापार नि मनोव्यापार त्याबरहुकूम आपणाला बदलावे लागतील.

> उंबरठ्यावर माप ठेविलें
> मी पायानं उलथूनि आलें ऽ ऽ
> आलें तुझिया घरीं
> कराया तुझीच रे चाकरी ॥
>
> (मनमोहन)

ही स्वप्नरंजित भावगीतात्मक अवस्था भग्न होईल. आजची स्त्री... स्त्रीच काय, सर्व समाज, हा एका भल्या मोठ्या उत्क्रान्तीच्या उंबरठ्यावर ओठंगून उभा आहे. पण भगिनींनो! तुम्हांला हतबुद्ध व्हायचं कारण नाहीं! हॅं आतां कशा हंसलांत?

***

# १८

## भाईसाहेब !

गजूचा जेव्हां गजानन झाला तेव्हां त्याला फक्त वीस रुपये पगार होता. दहा रुपयांच्या आंत मिळणारी फिन्लेचीं तलम धोतरं जेव्हां तो वापरूं लागला तेव्हां त्याचा गजाननराव झाला. अन् कुठल्याशा अंग्रेज साहेबानं त्याला जेव्हां एकदम शंभर रुपये पगारावर नेला तेव्हां त्याला 'साहेब' ही उपाधि लाभली.

दादरसारख्या ठिकाणीं पंधरा-सोळा रुपयांत दोन मोठ्या खोल्या (आंत नळ!) मिळण्याचे ते दिवस होते. गजूच्या घरीं 'सुबत्ता' नांदत होती. रविवारीं एक रुपयांत कुटुंबाची चैन भागत होती. दोन रत्तल मटण (दहा आणे) बाजार (तळायला!) चार आणे अन् इतर दोन आण्यांत चैन! (म्हणजे मिरची, कोथिंबीर, लिंबे, टॉमेटो, लिमलेटच्या गोळ्या, दोन पाव!)

टॉमेटो तर त्या चाळींत गजूनंच आणला! त्याचे शेजारीं (असूयेनं) त्याचं कौतुक करीत असतांनाच, गजू चतुर्भुज झाला!

पांचशें, हजारांत लग्न दणक्यांत झालं होतं. आठ दिवस नातेवाईक पुरखा झोडीत होते. पण गजूला त्याची पर्वा नव्हती. शंभर रुपये म्हणजे काय लहानसहान रक्कम!

आर्थिक मंदीमुळं ब्रिटिश साम्राज्य व स्वस्ताई हिंदुस्थानांत स्थिरावली होती. गजू रेशमी शर्ट (५ते ६ आणे वार जपानी 'भोस्की') वापरीत

होता. कुणीकुणी ‘ उपद्व्यापी ’ मंडळी स्वराज्य, असं बडबडत असत. टिळक व सावरकर यांनीं सरकारला उगाचच सतवायचा चंग बांधला होता ! गांधीजीनं त्यांचच अनुकरण करावं ह्याचं गजूला वैषम्य वाटत असे. त्यांत त्याला सर्व आतां म्हणत भाईसाहेब !

सर्वसाधारणपणें, बहुतेक भाईसाहेब, सडपातळ, ( खरं म्हणजे अशक्तच ! ) गोरे व जाडसर आवाजाचे असतात. अण्णासाहेब शब्दांत कुठं तरी टक्कल सामावल्यासारखं वाटतं. अप्पासाहेब अस्ताव्यस्तपणा किंवा अव्यवस्थितपणा किंवा दोन्हीहि प्रकर्षांत पाळतात ! नानासाहेब त्यांतले जरा बहुतेक स्वतंत्र मतवादी ! ( म्हणजेच ‘ ट्रबल मेकर ’ ) पण भाईसाहेब बहुतेक न्यारेच ! सहिष्णु, मवाळ पण स्वतःपुरते पक्के !

पण पक्केपणावर मुलांची संख्या अवलंबून नसते. त्यामुळं घरांतल्या घरांत नांदत्या गोकुळाचं शिमगा संमेलनांत हळूहळू रूपांतर होऊं लागलं ! रविवारचा रुपया आकारांत नि मूल्यांत घटूं लागला !

बेबीचे फ्रॉकस् तिला पुरेच पडेनात ! रमेशचे कपडे त्याला नेहमींच घट्ट व्हायचे. टॉमेटोप्रमाणंच भाईसाहेबांनीं ‘ सँडील्स् ’ ( हा त्यांच्या पत्नीचा खास आवडता शब्द ! ) प्रथमच आणल्या तेव्हां त्या पहायला चाळ लोटली.

हिटलर नांवाचा एक चळवळ्या इसम होता म्हणे ! चांगल्या चार्ली चॅप-लीन्सारख्या मिशा ! सर्कसमध्यें रिंगमास्टरचं काम करायचं सोडून भलतंच बडबडत रहायचा ! भाईसाहेबांना एवढंच वाटायचं कीं तो हें सर्व एका छत्रीवाल्या इंग्रजसाहेबाविरुद्ध बोलतोय ! कोण, कोण म्हणायचे, “ वॉर होणार ! वॉर होणार ! ”

भाईसाहेबांनीं आयुष्यांत कुणाला गुद्दा मारला नव्हता ! लहानपणीं आबादुबी खेळतांना हातांत चेंडू आल्यावर ते चेंडूसुद्धां धांवणाऱ्या गड्याच्या हळूच पाठीवर ठेवीत ! त्याला लागायला नको नि चेंडूलाहि ! त्यांची अहिंसा फक्त मासळी बाजारांत नष्ट होत असे. कृष्णानं गीतेचं अंजन घालून अर्जुनाचे डोळे जसे झणझणीतपणें उघडले तसेंच भाईसाहेब जेव्हां मासळी बाजारांत ‘ बंदरकी भाजी ’ घ्यायला पिशवी फलकावीत जात असत तेव्हां त्यांच्या सौम्य व अहिंसक बुबुळांत बाजीप्रभु देशपांडे व मुरारबाजींची आरक्तता झळकत असे !

मी ' निस्तरंगा '... किंवा ' निर्बोबिल ' पृथ्वी करीन अशी परशुरामी जिद्द त्यांच्या गोऱ्यापान मुखावर झगमगायची! एखाद्या संडेला कोंबडीचा बेत! ( भाईसाहेब कोंबडी हा गांवठी शब्द कटाक्षानं टाळीत! ' चिकन् '! आपण चिकन् खातो. परळ, लालबागचे लोक कोंबडी खातात! असं त्यांचं मत त्यांना बजावीत असे! )

भाईसाहेब कोंबडी चांचपडत, तिचा गुबगुबीतपणा पारखून पाहीत! व चांगली भरलेली पारखून घेत! एरव्हीं अंगावर चढलेलं झुरळ शांतपणें उचलून तें केराच्या टोपलीच्या तळाशीं अलगदणें ठेवीत असत! वरून टाकलं अन् त्याचं ' फ्रॅक्चर ' झालं तर?

फ्रॉक्मधली बेबी पातळांत मिरवूं लागली. त्या सुमाराला होणार, होणार म्हणून गाजलेली वॉर, सुरू झाली होती! रमेश एकदांचा शालान्त परीक्षेंत नापास झाला होता.

तसं म्हणजे तो कुठल्याच परीक्षेंत आजवर सर्व विषयांत पास झालाच नव्हता! टॉमेटो अन् ' सँडील्स् ' प्रमाणंच चाळींत कॅरम् आणण्याचा पहिला मान भाईसाहेबांकडंच होता! कॅरम् खेळून ज्यॉमेट्री सुधारते असा त्यांचा भयंकर गैरसमज कुणीतरी करून दिला होता ( रमेशनंच! ) त्यामुळं कॅरम् सारखा खटखटायचा!

रविवारचा बाजार आतां क्लिष्ट झाला होता. गुबगुबीत कोंबड्या असत पण त्यांची किंमत देतांना यजमानाच्या फांसळ्या बाहेर पडायची पाळी यायची!

बेबी तर बेसुमार फॅशनेबल झाली. रोज तिचीं तीन पातळं! सुगंधी तेलं! चंदनी साबण! रमेशचे कडक कपडे! भाईसाहेबांनीं कपात सुरू केली! म्हणजे स्वतःपुरती! भाईसाहेबांची अर्धांगी दक्ष होती. तिचा जरा धाक असे! पाहुण्यांची वर्दळ तिनं थोपवून धरली होती. स्वतःचा खर्च भलताच आंवरला होता. भाईसाहेब ( घरीं ) लेंगा घालूं लागले होते! तलम धोतरं कायमचीं विरलीं होतीं!

त्यांत मग बेबीला नोकरी लागली! चार पैसे खुळखुळायला लागल्यावर ती जास्तच उद्दाम झाली. भाईसाहेबांचे पाय हल्लीं थुरथुरूं लागले होते. त्याच प्रमाणांत बेबी दणादणा चालूं लागली होती!

भाईसाहेब साईबाबांचं भजन गुणगुणत असतांनाच बेबी त्यांच्या तोंडावर 'प्रेम तुझ्यावर करत्ये मी ऽ रे ऽ ऽ ऽ' भिरकावून देत असे! कळीदार पातळ सद्रा (कडक!) घालून रमेशचं पराक्रम क्षेत्र प्लाझा सिनेमापासून ते दादर चौपाटी–इतकं विस्तृत झालं होतं. टेरेलीन्, डेक्रॉन् वगैरे नकारत्मक शेवट होणारे शब्द घरांत घुसले होते. अर्थात् रमेश इंटरला नापास झाला अन् तिथंच अडखळला!

दसऱ्याला शेजाऱ्यांनीं रंग लावला! आपण दिवाळींत लावलाच पाहिजे, असा हट्ट बेबी नि रमेश दोघांनीं धरलाच! केवळ नाईलाजानं भाईसाहेबांनीं त्यांचा हट्ट पुरवला! रंग लागला छान पण पैसे भरतांना भाईसाहेबांचे डोळे पांढरे व्हायची वेळ आली!

बेबीनं नाजुक साजुक विजेचे दिवे आणले. चित्रपटांतल्या नायिका दिव्याच्या आसपास घुटमळत आपल्या प्रियकराची मार्गप्रतीक्षा करीत असतात हे तिनं अनेकवार पाहिलं होतं. असलाच कांहींतरी हळुवार विचार मनांत येऊन एक तिहेरी दिवा तिनं आणला. भाईसाहेब म्हणाले, बाबांच्या फोटोखालीं लाव! पण बेबीला कल्पना नापसंत! बाबांच्या फोटोखालीं 'तसं' उभं रहायचं म्हणजे जरा कठिणच! त्याला 'बॅलन्स' करण्याकरतां रमेशनं आणखी एक दिवा लावला! भाईसाहेब मनांत म्हणत होते "लेकाच्यांनो हीं बिलं भरायचीं कुणी!"

रमेश अजून कांहींच करीत नव्हता! गेल्या वर्षीं मी 'ड्रॉप' घेतला असं एखाद्या स्कॉलरला शोभण्यासारखंच तो सांगत असे. केव्हांतरी कसातरी बेबीच्या लग्नाचा प्रश्न, दुसऱ्यांच्या लग्नपत्रिका आल्यावर निर्माण होत असे. बेबीच्या अपेक्षा – कादंबऱ्यांत असे तरुण आढळतात! तो बैठा बंगला – बाजूला चिमुकली, फुलती बाग, ते – ते शिकलेले, उंच, (स्मार्ट्!), घरचे श्रीमंत! (गांवाला शेती! सासूसासरे 'खलास' म्हणजे तो 'व्याप' नाहीं – एका बहिणीचं लग्न झालंय् – म्हणजे एक भुजंग घरांत कमी) ...अशापैकीं होत्या!

बैठा बंगला! अंबरनाथच्या पुढं असूं शकतो – फुलती बाग लोणावळ्याजवळ – ते – ते – शिकलेले. खूप, खूप शिकलेले (असले तर बहुधा उंच नसतात.) 'स्मार्ट्' असलेच (दिसायला) तर फार शिकलेले नसतात...

वरचे श्रीमंत अन् गांवाला शेती ह्यांत कुठंतरी एक करुणास्पद विरोधाभास आहे... सासूसासरे 'खलास' झाले असले तर बच्च्याला संभाळायला फुकटचे 'नोकर' मिळत नाहींत... अन् लग्न झालेली एकच बहीण असणं म्हणजे तर महदाश्चर्य ! या सर्व गोष्टींची बेबीला तर दादच नव्हती. म्हणून ती नोकरी करीतच होती व नोकरी करीतच होती म्हणून लग्न होतच नव्हतं !

रमेशचं 'लाईन मारणं' चालूच होतं. त्याच्याकडं कोण 'तसं' पहात होतं असं नव्हे ! तो पंक्तिप्रपंच करणारांपैकीं नव्हता. आपला सार्वजनिक पहात रहायचा. ह्यामुळं इंटरला दुसरा टोला खाल्लाच ! पण कडक इस्त्री लाजली नाही ! टेरेलीन्चा शर्ट काळवंडला नाहीं कीं चकाकते बूट शरमिंधे झाले नाहींत !

आईनीं हा संसार आटोपशीर करण्याची आपल्याकडून शिकस्त केली. पावसाळ्याआधीं चार महिन्याचं मिरकूट करून ठेवलं तर सोईचं पडतं व चार पैसे वांचतात ह्या अनुभवावर उलट अनुभव माऊलीला आला कीं मुलांच्या वाढत्या क्षुधेमुळं तें संपूं नये तितकं लवकर संपतं. शिवाय इतक्या सामानाचे एकदम पैसे देणं जिवावर येई तें वेगळंच ! 'लोन्' चं कापड रोजच्याला वापरण्याचा बेबीला व टेरीलीन्शिवाय बाहेर न पडणाऱ्या रमेशला या व्यथांची सुतराम् कल्पना नव्हती !

तलम धोतरांच्या मालकांच्या शरीराची आतां महागाईनं जाळी होत होती. तसं म्हणजे भाईसाहेब म्हणजे एका मुन्सफाचा मुलगा ! पण दिवस आले वाईट ! त्यांच्या दारीं गाईम्हशींचं खिल्लार होतं. आतां भाईसाहेब सकाळीं सहा वाजतां दुधाच्या बाटल्या खडखडवीत रांगेंत उभे असतात. बेबी कशी जाणार ? मुलगी पडली ना ती ? अन् तो ठोंब्या रमेश ? माय् गॉड् ! त्याची पोझिशन् डॅम् होईल ना ! तेव्हां भाईसाहेबच आपले दूध आणतात.

साबूच्या पेटींत, पाण्यांत विरघळणारा साबू, आईच बाहेर ठेवते. मुलांना वेळ नाहीं – नव्हे त्यांचं तें कामच नव्हे ! किंमती टूथ पेस्टची फिरकी बेबी नीट लावीत नाहीं – रमेश तर इकडं तिकडंच ठेवतो ! भाईसाहेब निमूटपणें मग ती लावतात !

आमचं ठीक चाललंय् – तसं कांहीं कमी नाहीं अशी आपल्या मनाची घोर प्रतारणा करीत भाईसाहेबांचा संसारशकट चालला आहे. त्यांच्या

ठेवणींतल्या लांब रेशमी कोटाला छिद्रं पडलीं आहेत. बासनांतली चंद्रकळा झांकळली आहे. कसंतरी आपलं शेवटीं ठीक होईल असा कुठलातरी दुर्दम्य आशावाद या कुटुंबाला हंसत ठेवीत आहे. टॅमेटो, 'सँडील्स', कॅरम् घरोघर झाले– रेडीओ, टयूबलाईट्स्–कॉप्टन्चा फॅन्–जिकडं तिकडं झगमगूं लागले...रमेशची आई मात्र फाटलेले ब्लाऊज् उलटे करून शिवीत आहे. अन् भाईसाहेब...गुबगुबीत कोंबड्यांचं मांस रापून पहाणारी त्यांचीं बोटं, उभटपणें उमटलेल्या आणि अशुभपणें डोकावणाऱ्या आपल्या फांसळ्यावर, हळुवारपणें फिरवीत बसले आहेत !

***

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७०० वि: निबंध
क्रमांक १५८८ नों दि: १०।८।६९

१९

# आम्हांला झालं आहे तरी काय?

सुरम्य लघुकथा लिहितां येईल अशी ही सत्यकथा आहे. निरगांठ, सुरगांठ आणि उकल... सर्व कांहीं त्यांत आहे. सत्यं शिवं सुंदरम्‌चा झंकार त्यांत घुमतो आहे. मी एका लघुकथेला मुकत आहे. जुन्या किंवा नव्या कुठल्याहि तंत्रांत ती बसणारी आहे आणि एवढं असूनहि ओघांत आलं म्हणून सांगणार आहे ती कथा !

इंटरपर्यंत शिकलेल्या एका खिश्चन बाईला तीनचार मुलं होतीं. यजमानांचा पगार दीडशेंच्या घरांत होता व कुटुंबाचे हाल चालले होते. दरवर्षीं मूल होत असल्यामुळं हिच्या शिक्षणाचा उपयोग होत नव्हता. विधात्यानं निष्कांचनाची व भरपूर संततीची सांगड पूर्वापार कालापासून घालून ठेवलेली आहे ...

कपबशा धूतधूत ती कॉलेजमधल्या कविता आठवायची आणि परिस्थितींतली ही तफावत पाहून तिला जीव द्यावासा वाटायचा ! मृत्यु ! गरिबांचा सखा ! पीडितांचा वाली ! दुःखितांचा आसरा ! तिला वाटे, कीं आपली धडपडती प्राणज्योत एका झपाट्यासरशीं विझवून टाकावी आणि व्हावं ह्यांतून मोकळं !... समुद्राखालचा काळोख भयाण आणि निबिड खरा. पण पाण्यांत मरायला फार वेळ लागतो ! विषप्रयोग जास्त सुलभ; पण पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखी जिवाची तडफड होते ! छे, नकोच तें. अग्नि !

सर्वभक्षक अग्नि ! पण तोहि नको ! अंगाची लाहीलाही होते. आणि आजूबाजूच्या लोकांनीं जळत्या जिवावरची आग विझवली तर धड ना जिवंत धड ना मृत अशा भयानक अवस्थेंत आयुष्य काढावं लागेल ! आगगाडी छान ! एक घाव दोन तुकडे ! त्यांतल्या त्यांत तेरा नंबरची पाहावी म्हणजे मरतां-मरतां त्या अशुभ गणल्या जाणाऱ्या आंकड्याला तेवढाच मान !

आगगाडीची धडधड आणि शिटी तिला कपबशा धुतांधुतां प्रत्यक्ष ऐकल्यासारखी वाटायची आणि लगेच कुठलं ना कुठलं तरी पोर केविलवाणं तोंड वर करीत म्हणायचं, " आई, पाव दे कीं मला ! "

केवळ ह्याच मोहपाशामुळं ती अडकून पडली होती. जगायचं हा निश्चय तिनं केला होता. पण ... पण ... वाटेंत अनेक महाभयंकर जबडे ' आ ' वासून त्या कुटुंबाचा एकच घांस घेण्यास टपून बसले होते !

यजमानांचा अपुरा पगार. त्यामुळं आलेलं दारिद्र्य ! शेजारीपाजारी श्रीमंत ... म्हणजे असं कीं तिची घरवाली वेश्या होती. ती सांगत असे तिला, " कशाला करतेस हा संसाराचा भयंकर उपद्व्याप ? माझ्याकडे बघ तर खरं. रेशमी साड्या, अत्तरं, खानापिना. सोनं झालंय् माझ्या आयुष्याचं ! " बिचारी ही पोरंबाळंवाली बाई रडकुंडीला आली होती !

' नाहीं ! मी पवित्र आहे ...पवित्र आहे – राहीन ! ' काळोखांत पडल्या-पडल्या तिनं भावी आयुष्याचे मनोरे रचले. ' मोठ्या तीन मुलांना एखाद्या चर्चच्या शाळेंत शिकायला व राहायलाच ठेवीन; एखादा पाद्री करील त्यांच्यावर दया ! आतां मुलांची ताटातूट होईल. पण गरीब मातांना का कुठं भावना असतात ... मातृप्रेम का असतं ? '

तिच्या प्रयत्नांना यश येत चाललं. मार्ग सुलभ झाल्यासारखा वाटूं लागला. बारक्या मुलाकरितां दाई ठेवून आपण नोकरी करायची ही तिची मनिषा. सर्व कांहीं सुरळीत झालं असतं मग !

पण ... ?

मुलांना ज्या गांवीं ठेवायचं होतं त्या गांवीं जाऊन यायचं म्हटलं तरी पाऊणशें रुपये गाडीखर्च आला असता आणि ही भलीथोरली रक्कम कुठनं आणायची हा होता तिच्यापुढला महाभयंकर पेंचप्रसंग !

लघुकथेमधले पेंचप्रसंग निराळे ! ... कथानायक सुहासनं नायिका सुहासिनीकडं पाहून काल आपले डोळे एकचतुर्थांश इंच वर उंचावले होते

व आज त्यानं अष्टमांश इंच वर केले, ह्यावरून सुहासिनीच्या अंतःकरणाची तडफड होऊन ती आपल्या सुशोभित दिवाणखान्याच्या खिडकींतून दिसणाऱ्या चंद्रम्याकडे पाहात उगाचच विरहाश्रु ढाळीत असते !

पण इथले अश्रु कडवट होते. जीवनांतलं नैराश्य त्यांत कालविलं गेलं होतं. दारिद्र्यनिर्मित कडवटपणा इथं थबथबला होता. उपेक्षेचा हिरवटपणा कोमेजलेल्या गालांवर पाझरत होता !

पंचाहत्तर रुपये ! कर्ज म्हणून कुणी देईना ! घरचं सामान विकून ती रक्कम जमवितां येईना ! सर्व मार्ग खुंटले. यजमानांची पत पाउणशें रुपयांच्या तोलाची नव्हती.

अरेरे ! हे पैसे मिळाले तर मुलांचं राहणं व शिक्षण फुकटांत पडून शिवाय नोकरी करून आपल्याला संसाराला हातभार लावतां आला असता; झालेलं कर्ज फेडतां आलं असतं. मुलांना धडके कपडे...ह्यांना एक तरी गरम निळी पँट व कदाचित् आपल्याला एक गुलाबी झगा ... गुलाबी स्वप्नं होतीं हीं व अवघ्या पाउणशें रुपयांवर तीं अवलंबून होतीं.

सर्व उपाय थकल्यावर ती बऱ्याच धार्मिक संस्थांच्या चालकांकडे गेली.

"मला भीक नको ... दानधर्म म्हणून नको ... कर्ज म्हणून अवघे पंचाहत्तर रुपये द्या ... पांच-पांच, दहा-दहा, जसे मिळतील तसे तुम्हांला परत करीन मी. नाहीं म्हणू नका...तीन मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे ... एका कुटुंबाच्या उन्नतीचा नाहीं तर अवनतीचा प्रश्न आहे. ... नका हो करूं माझी निराशा..." अनेक प्रकारें, अनेक ठिकाणीं तिनं मनधरणी केली. जाडजूड चष्म्यांतून तिच्या सुंदर मुखकमलाकडे रोखून पाहात बहुतेक कार्यवाहांनीं 'हें तें त्यांतलं काम दिसत नाहीं' म्हणूनच कीं काय तिला मोठ्या मिठ्ठास भाषेंत नकार दिला.

ती स्वतःशीं म्हणत होती, 'परमेश्वरा ! खऱ्याची ही दुनियाच नाहीं का ? प्रामाणिकपणाला कांहींच किंमत नाहीं का ? तूं माझी सत्त्वपरीक्षा अशी निर्घृणपणें कां बरं करूं पाहतोस ? तूं तर प्रत्यक्ष दयेचा अवतार ! एका निरंजन मातेची हांक तुला कशी बरं ऐकूं येत नाहीं ? की तेरा नंबरच्या आगगाडी-खालीं मी आत्महत्या करावी असं तुलाहि वाटतं ? शील आणि चारित्र्य हीं मानवनिर्मित थोतांडंच आहेत काय ? माझ्या घरची वारांगना, केशराचा विडा खाते आणि माझ्या तान्हुल्यांना सणावरी लिमलेटच्या चार गोळ्याहि

मला आणतां येऊं नयेत ? .... अशा या भयानक आर्थिक परिस्थितींत तूं मला ठेवून घेतलं आहेस. हेंच का माझ्या निष्कलंक चारित्र्याचं बक्षिस ? की वेश्येचंच म्हणणं बरोबर आहे ? उद्यां ... उद्यां आहे गुड्फ्रायडे ! जर मला पाऊणशें रुपये कुणींच दिले नाहींत, तर दोनतीन दिवस केवळ माझ्या मुलांच्या अंतिम सुखाकरिता मी खात्रीनं देहविक्रय करून पाऊणशें रुपयांची पुंजी जमा करीन आणि पाठवीन त्यांना शिकायला ! ह्याला जो धर्म पाप म्हणेल त्यावर माझा विश्वास नाहीं. '

आणि अशा परिस्थितींत ती माझ्याकडे आली. त्या वेळीं शुक्रवारची धडपड संपली होती. शनिवार होता तो ...

तो भयंकर शनिवार !

नीटनेटका पोषाख करून, तोंडाला लाली फांसून आलेली ही स्त्री कशाकरितां माझ्याकडे आली असेल त्याची मला कल्पनाच करतां येईना.

" मला पाऊणशें रुपये द्या...मिळवून द्यायची व्यवस्था करा ! नाहींतर... नाहींतर..." तिला बोलवेना. डोळे डबडबले. आवाज थरथरला. देह घुसळला गेला.

" नाहींतर...पाऊणशें रुपयांकरितां मला माझा देहविक्रय दोनतीन दिवसांकरितां करावा लागेल... "

ती ह्या थरापर्यंत कां गेली ह्याची माहिती मला सांगून मग ती म्हणाली, " म्हणून म्हणतें मी ! तुम्ही तरुण आहांत, गुलहौशी दिसतां. तुम्ही व्हा कीं पहिलं गिऱ्हाईक. माफ करा हं ! लाज सोडून बोलत आहे मी ! पण दोनतीन दिवस लाज...सोडायला नको का ? "

मी स्तिमित झालों. अरेरे ! जीवनांतलं नाट्य किती भयानक असतं ! !

ओघळणाऱ्या अश्रूंमुळं गालांवरची लाली पुसून जाऊन तिचा गहूंवर्ण दृग्गोचर होत होता ! आणि ह्या मातेला आपला शरीरविक्रय करायची पाळी आली होती ! मी तिच्याकडं पाहिलं. दया आली तिची ! तिच्या घरीं त्या वेळीं, कदाचित् जुनाट, घाणेरड्या बोळाच्या तोंडीं खेळत असलेलीं तिचीं तीनचार पोरं माझ्या नजरेसमोरून गेलीं ! आपल्या आईची तीं वाट पाहात असतील. कचेरींत यजमान कसल्या तरी क्षुद्र कामांत गढले असतील. आपली पत्नी कसला अतुल स्वार्थत्याग करण्यांत गुंतली आहे ह्याची त्या बिचाऱ्याला कल्पनाहि नसेल.

माझ्या निश्चल, शांत रोखून पहाण्यानं ती घाबरली. " कां ? तुम्हीं रागावलांत ? माफ करा हं ! मला वाटलं तुम्हीं ... "

" बाई, बसा ! मी रागावलों तर मुळींच नाहीं. पाऊणशें रुपये माझ्याकडे नाहींत; पण मिळवून द्यायची खटपट करतों मी... "

त्यानंतर कांहीं धर्मादाय संस्थांकडून अवघे पाऊणशें रुपये मिळविण्या-करितां मला किती मेहनत पडली त्याचा पाढा मी इथं वाचीत नाहीं. ज्या धर्मादाय संस्थांकडे लाखों रुपये कुजत पडले आहेत त्यांच्या अटी व नियम इतके भयानक होते, कीं असामान्य चिकाटी व थोडेंबहुत शिक्षण असल्या-खेरीज त्या पैशाचा फायदा गोरगरिबांना मिळणं अशक्यप्राय होतं. स्त्रियांच्या नाणावलेल्या संस्थांनीं ह्या बाईच्या बाबतींत पूर्ण अनास्था दाखविली. इतकंच नव्हे, तर कांहीं स्त्रियांनीं तिची निर्भर्त्सना व टिंगल केली. स्त्रियांनीं अनुकंपा दाखविली नाहीं व सहानुभूति पुरुषांकडूनच त्या बाईला मिळाली !

शेवटीं मी त्या बाईला पैसे मिळवून दिले. उड्या मारीत ती घरीं गेली.

आठ दिवसांनीं सतेज चेहऱ्यानं ती मला भेटायला आली.

" तुम्ही माझा पुनर्जन्म केलांत. मुलं गांवाला सुखरूप आहेत. दाई मिळाली. मला नोकरी लागली... हे घ्या तुमचे पाऊणशें रुपये ! "

" आनंद आहे ! "

ती गेली. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पहात होतों. मनांत विचार आला, अशा कित्येक स्त्रिया परिस्थितीमुळं आत्मयज्ञ करीत असतील. कशानंच आमचे डोळे उघडत नाहींत ... खरंच, आम्हांला झालं आहे तरी काय ?

* * *

# २०

# दीपकंदिलांचा दीपोत्सव

मुंबापुरींतल्या एका टोलेजंग इमल्यामागच्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर दीपकंदिलांचे ऐहिक देह इतस्ततः विखुरले आहेत......

**कंदील १ :** सुटलों बुवा त्या वकिलाच्या तडाख्यांतून !

**कंदील २ :** कां हो ? इतकं अगदीं......

**कंदील १ :** आमचा यजमान अगदींच चारशें वीस होता हो ! कायद्याला कलाटणी देऊन पैसे हडकणारा गुंड होता तो !

**कंदील २ :** अहो, तो परवडला ! माझे यजमान होते डॉक्टर आपल्याविषयीं हौस फार...म्हणून दवाखान्यांत मला लटकाविला होता. येशूच्या स्थितप्रज्ञतेनं मी त्यांचे सारे चाळे न्याहाळीत होतों. आणि...आणि आतां माझी खात्री झाली आहे कीं, दवाखान्यांत येणाऱ्या सर्वच स्त्रिया कांहीं आजारी नसतात ! ( एक पोऱ्या एक कंदील झोंकून देतो. )

**कंदील १ :** या ! रामराम पाव्हणं !

**कंदील ३ :** नमस्ते !

**कंदील २ :** क्षेम आहे ना ?

**कंदील ३ :** म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाहीं.

**कंदील १ :** हा अंतसमयीं केळकरी खाक्या कशाला ?

**कंदील ३ :** त्याचं असं आहे. आमचं वास्तव्य एका कविमहाराजांकडे होतं.

**कंदील २ :** महाद्‌भाग्य !

**कंदील ३ :** हा हन्त ! हन्त ! ... आमचा जन्मच भयानक तऱ्हनं झाला ! चितेवरचा बांबू हे आमचे जनक !

**कंदील १ :** आपल्या जीवनाची शोककथा जन्मापासूनच सुरू झाली तर !

**कंदील ३ :** मोठ्या माणसांचं नेहमीं अस्संच होतं. शेक्सपीअर, चार्लस्, डिकन्स् आणि मी; आमचं बालपण जरा चमत्कारिकच !

**कंदील २ :** हं ! पुढं !

**कंदील ३ :** कविराजानं कवितांचीं परतलेलीं बाडं वाण्याला दिलीं व रंगीत कपडे मला केले. एका वाण्यानं आपलं बाड इंद्रायणीच्या डोहांत समर्पण केलं तर दुसऱ्यानं वाण्याच्या रद्दीच्या डोहांत तें बुडविलं !

**कंदील २ :** पण हौशी खरा !

**कंदील ३ :** तर ! तर ! काव्याच्या तारेंत असायचा गडी. नवकाव्यांतून झिंगला नसल्यामुळं शब्दाच्या वेड्यावांकड्या कोलांट्या मारायचा व मराठी भाषेची वेळोवेळीं होणारी हत्या न बघवून मी आंतल्या आंत तडकायचा !

**कंदील १ :** काय म्हणायचा तरी काय तो ?

**कंदील ३ :** वानगीदाखल हें पहा.

रात्रीचा मंदील
दिपावलीचा कंदील
माझा दिल बेदील ......
डॉक्टरचें वाढतें बिल ......

**कंदील २ :** अहो हें काव्य आहे कीं टिंगल आहे. सारंच बिलबिलीत !

**कंदील ३ :** नवकाव्य व मॉडर्न आर्ट हीं तुमच्यासारख्या सामान्यांकरितां नाहींत ! (नवा कंदील झोंकला जातो.)

**कंदील २ :** या ! या ! नमस्ते.

**कंदील १ :** आपण कुठं होतां !

**नवा कंदील :** ओळखा पाहूं ? जीवनाचं चित्र ज्या इवल्याशा भूमीवर रेखाटलं जातं ... आयुष्याच्या तारांचा सूर जिथं हेरला जातो...जिंदगीचा जुगार जिथं बेधडकपणें दाखविला जातो ...

**कंदील १ :** म्हणजे आपण एखाद्या इस्पितळांत होतां कीं एखाद्या सारंगीवाल्याकडं कीं गोलपिठ्यावरच्या एखाद्या ...'

**नवा कंदील :** अफ़सोस ! क्या बकवास है ! रंगभूमि ! भाग्यशाली मराठी रंगभूमि ! त्या रंगभूमीवरच्या एका दैदीप्यमान् नटश्रेष्ठाच्या घरीं !

**कंदील १ :** मजा आली असेल नाहीं !

**कंदील ४ :** मजा ? हं ! कंदिलाची मजा आणि मजेचा कंदील !

**कंदील १ :** पण दिवस मजेंत गेले ना ?

**कंदील ४ :** काय सांगू मित्रा ! अरे, ज्यांनीं पांचपांचशें रुपयांच्या पैठणी रंगभूमीवर नेसल्या त्याच्या देहावर आज जाडंभरडं धोतर आहे. ज्यांनीं हजारों रुपयांचीं अत्तरं एका बैठकींत खरेदी करून अक्षरशः अत्तरांचे दिवे लावले तो वृद्धावस्थेंत साध्या खोबरेल तेलाला मोताद झाला आहे. ज्याच्या कंपनींतल्या माणसांनीं अखंड सुग्रास भोजनावर ताव मारला व केशरमिश्रित पानं चघळलीं, त्याची खोकल्याची ढांस थांबविण्याकरितां आज सुंठ मिळण्याची पंचाईत आहे रे ! पण ... पण त्यांच्याच घरीं .... त्यांच्या विपन्नावस्थेंत पांच दिवस काढले. माझ्याकडे ते अनिमिष नेत्रान केव्हांतरी बघत रहायचे व मंद पणतीच्या सोज्वळ प्रकाशांत ते खिन्नपणें हंसायचे. अरेरे ! भाग्यवंत सिंधु ! आटला बिचारा ! गीतेनं सांगितलं होतं ना, सदावर्तांत गेल्यास चार गोडधोडच घांस मिळतील ... तीच अवस्था ! पण मला शांति मिळाली व त्यांच्या नैराश्यपूर्ण हास्यांत क्षणभर कां होईना आनंद निर्माण केल्याबद्दल माझं जीवन सार्थकीं झाल्यासारखं मला वाटलं ...

( एक अति टुमदार व नाजुक कंदील अलगदपणें ठेवला जातो ! )

**कंदील ३ :** करूं नका गलबला अगदीं झोंपेचा हलका फूल ... अशा राजहंसी थाटांत आलेले कोण बरं हे ?

**कंदील १ :** जय हिन्द !

**नवा कंदील :** यस् !

**कंदील १ :** अहो यस् काय ?

**नवा कंदील :** सो व्हॉट —

**कंदील २ :** फारच मग्रूर दिसतां ?

**नवा कंदील :** प्रख्यात अभिनेत्रीकडचा आहे मी ! त्यांच्याबरोबर माझाहि फोटो आला होता छापून !

**कंदील ३ :** अस्सं ! अस्सं ! मजा आली ना ?

**कंदील २ :** मजा ? व्हाट ए टेरिफिक लाईफ ! आमच्याकडची कुत्रीं माणसांपेक्षां हजारपट मोलाचीं वाटतात आम्हांला. गाडी, बंगला, बाग, कुत्रीं, शूटिंग, मेकअप, आऊट डोअर, सिक्वेन्स, पोस्टर्स, कॉन्ट्रॅक्ट, सेन्सॉर, प्रोडयूसर ही आमची दुनिया; इतरांच्या दुःखाकडे बघायला अगदीं बाईसाहेबांना नो टाइम् ! (आणखी एक कंदील...)

**कंदील ३ :** या ! फारच जपून येताय् !

**नवा कंदील :** विमा एजंटाच्या घरचा मी ! जीवनाची ज्योत केव्हां मालवेल याचा ...

**कंदील १ :** हो हो ! माहीत आहे. आपल्या जाहिरातीवर असं कांहींतरी असतं !

**कंदील ६ :** ...याचा नेम नसतो. म्हणून प्रत्येकानं...

**कंदील २ :** ठाऊक आहे !

**कंदील ६ :** ...शिवाय बोनस मिळतो !

**कंदील ३ :** आपण कृपया गप्प बसा !

(एक मोठा कंदील ठेवला जातो.)

**कंदील ३ :** हें गांडीव धनुष्य कुणाकडचं ?

**कंदील २ :** कुणा श्रीमंताकडचे असावेत !

**नवा कंदील :** छे ! छे ! एका साध्या शाळामास्तरकडचा मी ! लेको पण हौसेला मोल नाहीं. बेट्यानं पंचवीस पोरें जमा केलीं. घरीं त्याचीं पोरं आजारी. पण उत्साह दांडगा. सर्वांनीं मला हौसेनं उत्तम सजविला. माझी बोळांत मिरवणूक काढली. बाळगोपाळांनीं टाळ्या पिटल्या. गुरुजींचा शर्ट फाटला होता पण माझे कपडे ठाकठीक ठेवण्यांत त्यांनीं पैशाची पर्वा केली नव्हती ! सर्वांनीं गाणीं म्हटलीं. लहान मुलांनीं पिंगा घातला. गुरुजी दिलखुलासपणें आनंदानं ओरडून मुलांशीं समरस झाले होते......

[बाकीचे कंदील सुस्कारे टाकतात. म्युनिसिपालिटीची गाडी येते. निर्दयपणें सर्व सांगाडे आंत भिरकावले जातात...गाडी फर्र्र् फर्र्र् आवाज करून निघून जाते !]

"Full many a flower is born to blush unseen
And waste its sweetness on the desert air."

—Gray

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.* स्थळप्र
अनुक्रम .................. दि:

२१

# आम्ही तरुण माणसं !

तारुण्य म्हणजे चैतन्य ! तारुण्य म्हणजे आनंद ! तारुण्य म्हणजे आशा ! जगांतल्या सर्वसाधारण तरुणांना अवलोकून त्यांच्याविषयीं ह्या ज्या हर्षोत्फुल्ल ऊर्मि 'तारुण्य' या शब्दाला आपण चिकटवितों, त्या हिंदजवानांच्या बाबतींत कितपत योग्य आहेत याची मला तरी जबरदस्त शंका वाटते.

१४ ऑगस्ट १९४७ चा महत्त्वपूर्ण दिवस. त्या दिवशींच्या मध्यरात्रीं अखिल भरतखंडाचं खग्रास ग्रहण संपून सारी हिंदी जनता स्वातंत्र्यदेवीच्या आगमनाकरिता बेहोष होऊन सज्ज ठाकली होती. संध्याकाळीं पांचचा सुमार असेल. एका कचेरींतला एक तरुण कारकून दुसऱ्या तरुण कारकुनाला म्हणाला, "अरे अभ्यंकर, आज तुला काम सुचतय् तरी कसं ?"

यावर अभ्यंकरनं मान वर न करतांच शांतपणानं विचारलं, "काम न सुचण्यासारखं असं काय विशेष झालं आहे ? मी काय ऑफिसर झालों आहे काम न सुचायला ?"

"अरे, आज रात्रीं स्वतंत्र होणार ना आपण ?"

"हात्तेच्या ! मला वाटलं, कीं तूं कांहीं महत्त्वाचं सांगणार होतास !" एवढंच बोलून त्यानं आंकडेमोडीला पुन्हा सुरुवात केली.

अशाच तऱ्हेचं भयानक औदासीन्य दर्शविण्याची एक अतिशय घातुक प्रवृत्ति आजकालच्या बहुतेक तरुणांमध्यें बळावत चालली आहे हें पाहून

मला फार विषाद वाटतो. त्यांना कशानंच मस्त आनंद होत नाहीं. कशानंच ते मनमोकळेपणानं हंसत नाहींत, कशानंच त्यांच्या अंतर्यामीं फुलपांखरांचा आविष्कार होत नाहीं असं वाटतं ! भव्य, दिव्य, सुंदर, उदात्त व लोकोत्तर अशी कसलीहि कलाकृति पाहून ते थक्क होत नाहींत ! 'मुकीं बिचारीं कुणी हांका' असा प्रकार चालल्यासारखा वाटतो.

अमेरिकेंतल्या खेडेगांवांतलं एक उदाहरण या वेळीं आठवतं. हजार वस्तीचा गांव होता. त्या डॉलरनगरींत शहराच्या रस्त्याला भिडेल व ज्यावरून मोटार जाऊं शकेल असा आठ मैल लांबीचा रस्ता नव्हता. गांवकऱ्यांनीं सभा बोलावली. कुणीतरी तिथल्या म्युनिसिपालिटीला अर्ज लिहावा म्हणून सुचविलं. सगळे तिथले तरुण उठले व त्यांनीं त्या ढुढ्ढाचार्याची नुसती टर उडविली.

व्हर्जिनिया तंबाखूचा ठांसून बार भरलेला एक लंबाचवडा अमेरिकन तरुण म्हणाला, "हें पाहा लोकहो, आपण उद्यांपासून आपापलीं कामं लौकर संपवून टोळ्याटोळ्यानं रस्ता बांधूं !"

झालं ! तरुण–तरुणी नि मुलेंमुलीच काय, पण म्हाताऱ्याकोताऱ्यासुद्धां त्या कार्यांत मोठ्या हौसेनं सामील झाल्या. सहा महिन्यांत कच्ची सडक झाली. तिथल्या वर्तमानपत्रांत सहकारी पद्धतीनं विनामूल्य बांधलेल्या या रस्त्याचा व गांवकरी मंडळींचा गवगवा व गौरव झाला. तिथल्या म्युनिसिपालिटीला लाज व आनंद या संमिश्र भावना एकदम जाणवल्या व सिमेंटचा गुळगुळीत रस्ता करण्याचं काम त्या गांवचा तसा अर्ज न येतांच त्या कार्यक्षम नगरपालिकेनं हातीं घेतलं. दोन महिन्यांत तो रस्ता पुरा होऊन जवळच्या शहरचे लोक मोटरचा रस्ता झाल्यामुळं त्या गांवांत छोट्या सफरी करण्याकरितां येऊं लागले व शहरवासीय गुलहौशी लोकांच्या रंगेल आगमनामुळं त्या गांवच्या लोकांची आर्थिक स्थिति कमालीची सुधारली. कारण, गांवकऱ्यांनीं सुंदर सुंदर खाणावळी काढल्या; फिरायला घोडे ठेवले, बेसबॉल खेळायला विस्तीर्ण मैदान तयार केलं.

म्हणजे उत्साहानं एकत्र येऊन हौसेनं काम केल्यामुळं एक उपेक्षिलेलें गांवच्या गांव सधन झाला ! याच्या उलट, आपल्याकडे चाकोऱ्याचाकोऱ्यांतून मोठमोठे दगड पडलेले असतील. रस्त्यावरच कशाला ? खुद्द

वरच्या अंगणांतच एखादा मोठा दगडोबा ठाण मारून बसलेला असेल; पण पणजोबा किंवा त्यांचे पूर्वज ज्यावर बसून थंडीच्या दिवशीं ऊन खात असतील त्याच दगडावर त्यांचा अशक्त, किडमिडा पणतू किंवा खापरपणतू वर्ष सहा महिन्यांत गांवीं गेला तर लेंग्याची इस्त्री सांवरत सांवरत त्यावरच बसून, केसांवरून आपला हडकुळा व नाजुक हात फिरवील आणि विश्व-विद्यालयीन शिक्षणाचा शिक्का स्वतःवर बसला आहे ह्याची स्वतःला खात्री करून देण्याकरिताच कीं काय, एखाद्या पाणी भरायला निघालेल्या शेत-कऱ्याच्या मुलीला पाहून गुणगुणेल, " घट तिचा रिकामा झऱ्यावरी ! "

माझे तरुण मित्र रागावतील. म्हणतील, " आमच्या उत्साहभंगाचं कारण आर्थिक आहे ! " क्रॅफ्ट् चीज् व सुंदर लेबलानं मढविलेले डबेच्या डबे फस्त करणाऱ्या अमेरिकनांची कार्यक्षमता आमच्यांत स्वातंत्र्य मिळतांच येणार नाहीं याची मला पूर्ण जाणीव आहे. भरल्यापोटीं त्या अमेरिकन तरुणांनीं ' जास्तींत जास्त जनतेचें जास्तींत जास्त कल्याण ' या तत्त्वाचें जें लोकोत्तर प्रात्यक्षिक करून दाखविलें तेवढ्या प्रमाणावर आम्हांला आजच कार्य करतां येणार नाहीं हें मला एकदम मान्य आहे. पण मला चीड येते अशा कांहीं तथाकथित सुशिक्षित व्यक्तींची, कीं ज्या तीस तारखेला घसा फोडून ओरडतात, कीं " गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमाला आम्ही आपलं तनमनधन लावूं ! " आणि एकतीस तारखेला सकाळीं साडेआठ वाजतांच आपलं धन मँचेस्टरचं टस्सरचं कापड घेण्याकरितां ओततात ! कितीतरी गांवांत शिरण्याचे राजरस्तेहि खडबडीत असतात. त्यांतले कांहीं तर इतके नाठाळ असतात, कीं आमच्यासारख्या बोलघेवड्या शहरवासीयांची पुट-पुटती जीभ दंतपंक्तींत काचकान् सांपडते व ग्रामीण जीवन फार दुष्कर असतं याचं कानाच्याऐवजीं जीभ पकडून एक प्रात्यक्षिक मिळतं ! चार गांवांतली मंडळी आठ दिवस एकत्र जमली तर सर्वांचंच काम होईल, सर्वांचाच त्रास कमी होईल. पण... पण लक्षांत कोण घेतो ?

' अन्यूझुअल ऑक्युपेशन्स ' ( विचित्र धंदे ) या नांवाचा चित्रपट एक अमेरिकन कंपनी काढीत असते. तो रंगीत व सर्वांगसुंदर असतो. लांबी असते हजार-बाराशें फूट ! मुख्य चित्रपटाबरोबर तो दाखवितात व त्याचे नवनवीन भाग नेहमीं तयार होत असतात. सर्वांना परिचित असलेल्या धंद्यांखेरीज जे नवीन धंदे टाकाऊ मालापासून कुणी पुरुष वा स्त्रिया करीत

असतील, त्यांचं चित्रण यांत केलेलं असतं. त्यांपैकींच एका सोळा वर्षांच्या अमेरिकन मुलीचा उद्योग मी सहसा विसरणार नाहीं.

गरीब घरांतली ही मुलगी. तिनं विचार केला, या अफाट जगांत काय बरं करावं आपण ? टायपिस्ट, नर्स, वेट्रेस ? छे, नांव नको ! तिनं अशी कल्पना प्रत्यक्षांत आणली. मासे पकडण्याच्या गळांना कांहीं खाद्यपदार्थांचे तुकडे लावतात. तिनं मच्छीमार वाङ्मय नजरेखालून घातलं. कुठल्या जातीच्या माशांना कोणत्या प्रकारचे कृमिकीटक व फुलपांखरं आवडतात याची तिनं नीट माहिती करून घेतली; प्राणिसंग्रहालयांत जाऊन त्या कृमिकीटकांच्या रंगाबरहुकूम हुबेहूब चित्रं काढून आणलीं व रेशमांचीं अगदी तश्शींच फुलपांखरं व कृमिकीटक तिनं बनविले. तयार केलेलं प्रत्येक फुलपांखरू, कृमि व कीटक तीं खऱ्याशीं पडताळून पाही. हौसेनं मासे पकडणाऱ्या लोकांत तिनं मग प्रचार केला. ह्या बुद्धिमान् व हुन्नरी मुलीनं तयार केलेलीं फुलपांखरं गळाला लावायचा अवकाश की मासे कसे पटापट अडकायचे ! तिची कीर्ति व धंदा सतत वाढत गेला. तिच्या हाताखालीं पांचपंचवीस मुली मुद्दाम तयार केलेल्या यंत्रांवर एकसारख्या फुलपाखरं व कृमि विणत बसतात ! लांबूनलांबून मालाला शेकड्यांनीं मागण्या येतात. लगेच ही पटकन् नेमका खोका काढते व माल रवाना होतो. आमच्या भगिनींनीं ( व बंधूंनींहि ) त्या मुलीचा तरी विचार जरूर करावा !

जुन्या पिढीपेक्षां नव्या तरुण पिढींत जातीयता कमी असा प्रवाद आहे; पण मला वाटतं, अशी तुलना करणं धोक्याचं आहे. जुन्या पिढींतला जातीयतावाद हा धार्मिक भावनेवर आधारला होता, तर नव्या पिढींतल्य जातीयवादाची मातोश्री ‘ राजकारण ’ ही आहे. ह्या बाबतींत एक विचित्र अनुभव मला नुकताच आला.

चर्चगेटच्या बाजूनं मी जात होतों. पाऊस मुसळधार पडत होता—चार-सहा फुटांवरचा मनुष्यहि दिसणार नाहीं असा होता. पावसाचा जोर अन् अशा पावसांत एक विदेशीय स्त्री फुलांचा ओव्हरकोट घालून या असल्या पावसांत उभी होती. मला अतिशय आश्चर्य वाटलं. या बाईनं एखाद्या इमारतींत कां नाहीं बरं आसरा घेतला ? सहसा मी स्त्रियांशीं बोलत नाहीं, ओळख नसल्यावर तर कधींच नाहीं. पण या बाईला मात्र मला विचारावंसं वाटलं, कीं अशी पावसांत उभी कां ? त्याप्रमाणं मी तिला विचारणार तोंच

तिनं मला खणखणीत आवाजांत विचारलं, "हें पाहा! त्या समोरच्या इमारतींत–खालीं दरवाजापाशीं एक कुणीतरी इसम बेशुद्ध होऊन पडला आहे; पावसांत भिजतो आहे तो. तुम्ही जरा उचलून आंत ठेवा ना त्याला!"

मी पाहतों तर एक भिकारी तंगड्या झाडीत पडला होता. त्या इमारतीच्या पठाण दरवानाला मी सांगितलं, कीं आपण दोघांनीं त्याला उचलून आंत ठेवू या. त्यावर त्यानं आपले हात कमरेवर ठेवले, एकदां डोळे बारीक करून त्या तडफडत्या निष्कांचनाकडे पाहिलं आणि तो म्हणाला, "हा तर हिंदु दिसतोय! याला नाहीं मी उचलणार!"

मी त्या गारव्यांत आणखीच सर्द झालों! त्या बाईनं ताबडतोब मला पृच्छा केली, कीं काय म्हणाला तो? तेव्हां सरळ मी थाप मारली, कीं त्या दरवानाचा उजवा हात लचकल्यामुळं त्याला वजन उचलतां येणं अशक्य आहे!

इतक्यांत चारसहा मंडळी भोंवतीं जमली. तीं सर्व सभ्य व सुशिक्षित दिसत होती. त्यांना उद्देशून मी म्हणालों, की आपण त्या माणसाला उचलू या. तेव्हां त्या सर्वांनीं डोळे बारीक करून त्या माणसाकडे पाहिलं आणि त्यांपैकीं एक सावकाश म्हणाला,

"मुसलमान दिसतो लेकाचा!"

आणि एवढंच बोलून ते चालायला लागल्यावर मात्र मी चवताळलों. मी त्यांना सांगितलं, कीं "ही विदेशीय स्त्री आपल्या ह्या नीच जातीयवादाचा डंका तिच्या देशांत वाजवील. देशाच्या इभ्रतीकरितां तरी त्याला उचला." तेव्हां त्यांतला एक पठ्या तयार झाला. भिकाऱ्याला आम्हीं आंत आणल्यावर थोड्याच वेळांत तो शुद्धीवर आला आणि अत्यंत मलीन वस्त्रं परिधान केलेला हा दरिद्रीनारायण जें बोलूं लागला तें अस्खलित इंग्रजींत! ऐकावं तें तें नवल.

"मी त्याला कांहीं खायला आणूं का?" त्या बाईनं मला विचारलं.

"जरूर! इथं जवळ हॉटेलहि नाहीं. आणलंत तर फार बरं होईल!"

इतक्यांत तो मनुष्य क्षीण स्वरांत म्हणाला, "गेल्या तीन दिवसांत अन्नाचा कण नाहीं खाल्ला मी!"

"बाईसाहेब, तुम्ही कॉफी आणि पाव आणा" मी त्या सहृदय बाईला सांगितलं.

टुण्टुण उड्या मारीत ती बाई पांचव्या मजल्यावर गेली व थोड्याच वेळांत आपल्या नोकरासह आली. त्यानं 'ट्रे' मध्यें बरेचसे पावाचे काप व भरपूर कॉफी आणली होती.

पण... पण तो नोकर एकदम दचकला ! आणि " मी भिकाऱ्याच्या हातांत हें देणार नाहीं; मी तुमचा नोकर आहे बाईसाहेब–भिकाऱ्याचा नाहीं. त्याला मी हें नेऊन दिलं तर माझ्या इभ्रतीला धक्का पोंचेल ना ! " असं निक्षून म्हणाला. मी थक्कच झालों. काय हीं एकावर एक आश्चर्य. सफाईदार इंग्रजींत बोलणारा बेशुद्ध भिकारी, तो हिंदु कीं मुसलमान याची किळसवाणी चर्चा व त्यानंतर त्या नोकराची इभ्रत व तिला लागणारा धक्का !

" आतां काय भानगड निघाली ? " त्या बाईला आपल्या नोकराचं म्हणणं न समजून तिनं मला विचारलं.

" जाऊं द्या हो ! " एवढंच मी म्हणालों व त्याच्या हातचा थाळा घेत त्याला मी सांगितलं, " हरकत नाहीं पठ्ठे. मी देईन त्याला कॉफी. तूं जा आपला. "

अन् तीन दिवस भुकेलेल्या त्या दुर्दैवी इसमापुढं मी तो थाळा ठेवला. इतका उपाशी माणूस कसा लांडग्यासारखा त्यावर तुटून पडेल हें पाहण्याकरितां मी अतिशय उत्सुक झालों ! पण... पण... हा 'पण' कांहीं संपत नव्हता !

त्या भिकाऱ्यानं तें अन्न खायचं साफ नाकारलं ! मी त्याला विचारलं, " हें कां खात नाहींस ? "

तेव्हा उसळी मारून तो म्हणाला, " तुम्ही मला कोण समजतां ? एके काळीं मी इतका श्रीमंत व भाग्यवान् होतों, कीं मी अन्नछत्रं नि सदावर्तं चालविलीं होतीं. शेकडों लोक, भणंग भिकारी जेवून संतुष्ट होत होते ! आतां दिवस फिरले. होत्याचं नव्हतं झालं ! मी भिकारी झालों...पण...पण भिकारी असलों तरी खानदान आहे. भिकेचं अन्न मी प्राण गेला तरी खाणार नाहीं !"

आतां मात्र मी स्तंभित झालों !

" काय झालं आतां ? " जरा चिडूनच त्या बाईनं विचारलं.

" हा म्हणतो कीं आपला स्वाभिमान इतका प्रखर आहे, की आपण कुणाचं दान घेत नाहीं ! "

" शाबास ! " जन्मापासून स्वतंत्र देशांत वावरलेल्या त्या तरुणीनं कौतुक केलं.

" हें पाहा ! तुम्ही सध्यां हें खाच ! हें दान नव्हे; हें खाऊन तुम्हीं मग हवी ती मेहेनत करून चार पैसे कमवा व ते ह्या बाईला कॉफी व पावाबद्दल द्या. ' मी तडजोड सुचविली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे दा. क्र. १४३५८६

त्या विचित्र गृहस्थानं ही अट त्या गोऱ्या बाईकडून कबूल करून घेतली व नंतरच कॉफीचा घोट घेतला.

त्या माणसाच्या स्थितप्रज्ञतेचं, दानशूरपणाचं, करड्या स्वभावाचं, दुर्दैवाचं मला राहून राहून आश्चर्य वाटत होतं. मी त्या बाईचे तिनं केलेल्या या मदतीबद्दल आभार मानले. ताबडतोब ती म्हणाली, " आभार कशाबद्दल ? प्रत्येकाचं कर्तव्य आहे की हें. रागावूं नका मिस्टर...पण एक गोष्ट विचारूं का तुम्हाला ? "

" विचारा कीं ! "

" एवढे लोक त्या माणसाचे हाल पाहात होते व ते पाहूनसुद्धां खुशाल आपले पुढं जात होते. तुमच्या देशबांधवांची मी निंदा नाहीं हो करीत; पण आमच्या अमेरिकेंत असं कधीं नाहीं पाहायला मिळायचं! खुद्द प्रेसिडेंटसाहेब जरी महत्त्वाच्या सभेला जात असले आणि त्यांनीं असा एखादा प्रकार पाहिला असता, तर त्यांनींहि असल्या इसमाला इस्पितळांत पाठविण्याची व्यवस्था केली असती ! "

" खरं सांगूं बाईसाहेब ? आमच्या इथं जिवाला मोल नाहीं अजून ! " शरमून मी कसंबसं म्हणालों व त्या श्रीमंत भिकाऱ्याकडे घाईनं एक दृष्टिक्षेप टाकून तिथून काढता पाय घेतला.

बा हिंद समाजा, उठ ! जागा हो ! काय ही तुझी विटंबना ! माणुसकीचे सहृदयतेचे, दिव्यतेचे, शांतीचे व प्रेमाचे पाठ देणाऱ्या प्रभावी वाङ्मयाची खाणच्या खाण तुझ्यापाशीं आहे. तुझी संस्कृति, तुझं विचारभांडार केवढं तरी समृद्ध आहे ! पण तें आहे गुलदस्तांत ! त्याचं उत्खनन करून जगापुढें मांडण्याची एक प्रचंड कामगिरी तरुणांपुढें आहे. संगीत, नृत्य, शिल्प, लेखन, चित्रकला, नाट्य व चित्रपटांच्या द्वारा हिंदची खरी व प्रभावी संस्कृति उलगडून दाखवावी लागेल ! निराश होण्याचं कारण नाहीं. कोलाहलांतूनच व्यवस्था निर्माण होईल. परकी सत्तेमुळं निष्प्रभ झालेला, मोडकळीला आलेला हिंदसमाज कालावधीनं सामर्थ्यवान् व समृद्ध होईल. पण ह्या प्रचंड कार्याचा पाया मात्र आम्हां तरुण माणसांना घालावा लागणार आहे. अगदीं बेशिस्त समाजहि योग्य कालांतरानं एकदम शिस्तबद्ध बनण्याचा संभव जास्त असतो, म्हणून मीहि हिंदसमाजाच्या भावी कालाबद्दल फार आशावादी आहे.

०००

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८५०० वि: निबंध

REFBK-0014374